# महाराष्ट्री प्राकृत

# मरहट्ठी पआसओ

## इयत्ता अकरावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास - २११६ (प्र. क्र. ४३ / १६) एसडी - ४ दिनांक २५.४.१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक १९.३.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९ - २० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# महाराष्ट्री प्राकृत

# मरहट्ठी पआसओ

## इयत्ता अकरावी

### (तृतीय भाषा)

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.**

L3J4M7

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्‌श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

**प्रथमावृत्ती : २०१९**
**पहिले पुनर्मुद्रण : २०२२**

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे**
या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**महाराष्ट्री–प्राकृत भाषा तज्ज्ञ समिती**
डॉ. सदानंद मोरे (अध्यक्ष)
डॉ. कमलकुमार जैन
डॉ. राजश्री मोहाडीकर
डॉ. विमल बाफना
डॉ. आर. टी. पाटील
डॉ. मैत्रेयी देशपांडे
डॉ. श्रीनंद बापट
डॉ. महावीर शास्त्री
श्री. बाळकृष्ण जोशी
श्रीमती संध्या उपासनी
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य सचिव)

**संयोजन :**
**श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी
**श्रीमती संध्या विनय उपासनी**
सहायक विशेषाधिकारी, हिंदी
**चित्रकार :**
श्री. तेजस गोगावले
**मुखपृष्ठ :**
श्री. विवेकानंद पाटील
**अक्षरजुळणी :**
बलदेव कंप्युटर्स, मुंबई

**कागद :** ७० जी. एस. एम. क्रीमवोव्ह
**मुद्रणादेश :**
**मुद्रक :**

**निर्मिती :**
**सच्चिदानंद आफळे,** मुख्य निर्मिती अधिकारी
**राजेंद्र चिंदरकर,** निर्मिती अधिकारी
**राजेंद्र पांडलोसकर,** सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक :**
**श्री. विवेक गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

# भारहस्स संविहाणं

## उद्देसिआ

अम्हे, भारहस्स जणा, भारहं संपुण्ण-पहुत्त-संपण्णं,
समाअवाइं, धम्मणिरवेक्खं, लोअतंतिअं गणरज्जं विहाउं,
तस्स समत्ता णाअरिआ अ
सामाइयं, अत्थिअं, राजणेइअं च णायं,
विआरस्स, अहिवत्तीए, अत्थाए, धम्मस्स, उवासणाए अ सातंतं,
पइट्ठाए, अवसरस्स अ समाणअं पाऊणिउं;
तेसु सव्वेसु अ
वत्तिगारवस्स रट्ठस्स अ एकआए,
अखंडआए अ सुणिच्छाइअं बंधुअं पवड्ढिउं;
कयदढसंकप्पा एआए अम्हाणं संविहाणसहाए
अज्ज, ईसवीए १९४९ तमे वस्से नवंबरमासस्स २६ तमे दिणे
(२००६ – तमे विक्कमसंवच्छरे मग्गसीसमासस्स सुक्कपक्खे सत्तमी-तिहीए)
एएण इणं संविहाणं अंगीकअं, अहिणियमिअं, अप्प-अप्पियं च करेमो।

## रट्ठगीअं

**जनगणमन–अधिनायक जय हे**
**भारत–भाग्यविधाता ।**
**पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,**
**द्राविड, उत्कल, बंग,**
**विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,**
**उच्छल जलधितरंग,**
**तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,**
**गाहे तव जयगाथा,**
**जनगण मंगलदायक जय हे,**
**भारत–भाग्यविधाता ।**
**जय हे, जय हे, जय हे,**
**जय जय जय, जय हे ।।**

## पइण्णा

भारहो मम देसो अत्थि।
सव्वे भारहवासिणो मज्झ बंधुणो संति।
मज्झ देसम्मि मम पेम्ममत्थि।
मज्झ देसंसि विज्जमाणाणं
समिद्धाणं विविहआए विहूसिआणं च
परंपराणं मे अहिमाणो अत्थि।
ताणं परंपराणं रक्खओ होउं समत्थो होज्ज त्ति
अहं णिच्चं पअत्तं करिस्सामि।
अहं मज्झ पालआणं गुरुअणाणं जेट्ठाणं च
सम्माणं काहिमि, पच्चेकेण सद्धिं
सुअणत्तणेण य आयरिस्सामि।
मम देस–बंधवाणं च णिट्ठारक्खणस्स अहं पइण्णं करेमि।
तेसिं कल्लाणे समिद्धीए अ
मज्झ सोक्खं समाविट्ठं भवइ।

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हा सर्वांचे इयत्ता अकरावीच्या वर्गात स्वागत आहे. महाराष्ट्री प्राकृत भाषेतील ''मरहट्ठी पआसओ'' हे पुस्तक तुम्हांला आवडेल, या विश्वासाने हे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देतांना अतिशय आनंद होत आहे.

मराठी आणि महाराष्ट्री प्राकृत भाषेचा संबंध खूप जवळचा आहे. आज आपण जी मराठी भाषा बोलतो तिचे महाराष्ट्री प्राकृत हे मूळ रूप आहे. या महाराष्ट्री प्राकृतच्या प्राचीनतेमुळेच आपण मराठी ही अभिजात भाषा आहे असे म्हणू शकतो. मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी ''महाराष्ट्री प्राकृत'' भाषेचा नक्कीच उपयोग होईल. ''मरहट्ठी पआसओ'' या पाठ्य-पुस्तकाच्या माध्यमातून महाराष्ट्री प्राकृतची प्रथमच ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार तृतीय ऐच्छिक भाषा विषयासाठी हे पुस्तक इयत्ता अकरावीसाठी तयार करण्यात आले आहे.

मित्रांनो, एकमेकांशी संवाद साधण्यासाठी आपण मराठी भाषेचा वापर करतो. मराठी ही आपल्या राज्याची राजभाषा आहे. आपले विचार, मते, कल्पना, भावभावना समोरील व्यक्तिसमोर योग्य प्रकारे आणि प्रभावीपणे मांडण्यासाठी त्या भाषेवर प्रभुत्व असणे गरजेचे आहे. या पुस्तकाचा अभ्यास केल्याने तुमचे महाराष्ट्री प्राकृतवरील, पर्यायाने मराठीवरील प्रभुत्व सुद्धा वाढेल.

प्राचीन महाराष्ट्री प्राकृत व आजची मराठी भाषा यांचा संबंध किती जवळचा आहे, हे या पुस्तकाच्या अभ्यासानंतर तुमच्या निश्चितच लक्षात येईल. प्राचीन काळापासून महाराष्ट्री प्राकृत ही सामान्य लोकांची बोलीभाषा होती. या भाषेमध्ये व्याकरण, कथा, गद्यपद्यमय चंपू व इतर साहित्यसुद्धा रचले गेले आहे. त्याद्वारे आपल्याला प्राचीन भारतीय समाजजीवन, संस्कृती समजण्यास मदत होते.

प्रत्येक पाठासंबंधी अधिक माहिती देण्यासाठी ॲपच्या माध्यमातून क्यू. आर. कोडद्वारे उपयुक्त दृक्श्राव्य साहित्य आपणास उपलब्ध होईल. त्याचा तुम्हांला अभ्यासासाठी निश्चितच उपयोग होईल.

भाषिक विकासाबरोबरच विचारक्षमता, अभिव्यक्ति-कौशल्ये आणि सृजनशीलता यांच्या विकासासाठी उपयुक्त असलेले हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्की आवडेल, असा विश्वास आहे.

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २० जून, २०१९
भारतीय सौर दिनांक : ३० ज्येष्ठ, १९४१

# महाराष्ट्री प्राकृत

## भाषाविषयक क्षमता

इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांकडे महाराष्ट्री प्राकृत भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.

| क्षेत्र | क्षमता |
|---|---|
| श्रवण | • महाराष्ट्री-प्राकृत साहित्यातील संदर्भ व भावार्थ समजून घेता येणे.<br>• महाराष्ट्री-प्राकृतातील विविध साहित्य प्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यातील स्वराघात, आरोह-अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे.<br>• महाराष्ट्री-प्राकृत भाषेतील औपचारिक व अनौपचारिक संवाद व संभाषण ऐकून चिकित्सक विचारांसह त्यात सहभागी होता येणे.<br>• परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषा ऐकून त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार तुलना करता येणे. |
| भाषण | • महाराष्ट्री-प्राकृतातील उच्चार-विशेषानुसार योग्य असे गाथांचे पठन आणि संभाषण करता येणे.<br>• महाराष्ट्री-प्राकृतातील कथासाहित्याच्या वैशिष्ट्यानुसार कथा-कथन व प्रबोधन करता येणे.<br>• महाराष्ट्री प्राकृत माध्यमात अध्ययनकृतींच्या विषयाला अनुसरून अनुभव कथन करता येणे.<br>• महाराष्ट्री प्राकृतचा अभ्यास करून विविध शब्द, वाक्प्रचार किंवा म्हणी या संबंधी अंताक्षरीवजा खेळ खेळता येणे.<br>• महाराष्ट्री प्राकृत भाषेत चर्चा करता येणे. |
| वाचन | • योग्य गतीने विरामचिह्नांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकट वाचन करून त्याचा आस्वाद घेणे.<br>• महाराष्ट्री प्राकृत साहित्यातील विविध साहित्य प्रकार समजून घेऊन, वाचून त्याचा आस्वाद घेणे.<br>• महाराष्ट्री प्राकृताच्या अध्ययनाने प्राचीन भारतीय संस्कृती समजून घेणे.<br>• संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या ई-साहित्याचे वाचन करून त्या माहितीचा स्वयं अध्ययनासाठी उपयोग करता येणे.<br>• गद्य-पद्य साहित्यकृतींचे वाचन करून भाषिक प्रभुत्व मिळविण्याचा प्रयत्न करणे. |
| लेखन | • लेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे.<br>• भाषा नियमांना अनुसरून संवाद/वर्णन/लघुपरिच्छेद लिहिता येणे.<br>• माध्यम भाषेतील भाषा-नियमाला अनुसरून अनुवाद करता येणे.<br>• महाराष्ट्री प्राकृतचा अभ्यास करून अभिजात आणि प्राचीन साहित्याची वैशिष्ट्ये मांडता येणे. |

| | |
|---|---|
| **अध्ययन कौशल्य** | • महाराष्ट्री प्राकृतात होणारे स्वर आणि व्यंजनांचे परिवर्तन समजून घेणे.<br>• कोणत्याही संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे.<br>• महाराष्ट्री-प्राकृत भाषेत शब्दजाल निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.<br>• महाराष्ट्री-प्राकृत भाषेत कथापूर्ती करता येणे.<br>• महाराष्ट्री-प्राकृत भाषेत अनुवाद करता येणे.<br>• अनेक भाषांचा परिचय करून घेण्याची जिज्ञासा निर्माण करता येणे.<br>• संगणकावर उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक उपयोजनांचा अभ्यासासाठी वापर करता येणे. |
| **भाषाभ्यास** | • अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे. शब्दसंपत्ती - तत्सम, तद्‌भव, देशी, समानार्थी, विरुद्‌धार्थी, विभक्ती प्रत्यय, काल-प्रत्यय आणि संधी यांचा अभ्यास करणे.<br>• महाराष्ट्री प्राकृत आणि मातृभाषेतील शब्दांचा तुलनात्मक अभ्यास करणे.<br>• महाराष्ट्री प्राकृत भाषेत सहजपणे संवाद करणे.<br>• एक ते पंचवीस (१-२५) अंक (क्रम) जाणून घेणे. |

## शिक्षकांसाठी

इयत्ता अकरावीचे महाराष्ट्री प्राकृतचे हे पाठ्यपुस्तक "मरहट्ठी पआसओ" आपणास अध्ययन-अध्यापनासाठी देतांना अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी संबंधित पाठ, कविता, कृती (स्वाध्याय) व आशयानुरूप चित्रे यासारख्या अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या भाषाविषयक क्षमतांचा विचार करून शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील भाषिक क्षमता अधिकाधिक विकसित होण्यासाठी पाठ्यपुस्तकातील कृतीबरोबरच इतर कृती आणि उपक्रम योजून ते विद्यार्थ्यांकडून करवून घ्यावेत.

क्षमता क्षेत्रातील भाषाभ्यास या शीर्षकाखाली दिलेल्या सर्व व्याकरण घटकांची उजळणी शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून करून घ्यावी. शिक्षकांनी स्वतः या व्याकरण घटकांच्या सरावासाठी विविध कृती योजाव्यात व त्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठामधील कठीण शब्दांचे अर्थ पाठाच्या शेवटी दिलेले आहेत. शिक्षकांनी आवश्यकतेनुसार पाठातील इतर शब्दांचे अर्थ समजून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करावा, तसेच विद्यार्थ्यांना संदर्भ म्हणून शब्दकोश पाहण्यासाठी प्रेरित करावे.

विद्यार्थ्यांमध्ये प्राकृत भाषेची गोडी उत्पन्न होईल असा प्रयत्न शिक्षकांनी करावा. रोजच्या व्यवहारातील प्राकृतशी मिळते-जुळते शब्द विद्यार्थ्यांना निदर्शनास आणून द्यावेत. मराठी व प्राकृतमधील देशी शब्दांची यादी विद्यार्थ्यांकडून करून घ्यावी. रोजच्या व्यवहारातील वस्तू, त्यांचे कार्य याविषयीचे प्राकृत शब्द विद्यार्थ्यांना सांगावेत. उदा. पथ - पह, यान - याण, पाठशाळा - पाढसाला, पुस्तक - पोत्थअ (पोथी), उपानह - वहाण (चप्पल).

या पुस्तकातील बहुतेक पाठ मूळ जैन प्राकृत ग्रंथातून घेतले असल्याने तिथे असलेल्या "य"श्रुती (क, ग, च, ज, त, द, प) च्या ऐवजी बहुतांश ठिकाणी "अ" ठेवला आहे तसेच "न" चा "ण" केला आहे.

प्राकृत साहित्यातील ग्रंथसंपदा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध आहे. (उदा. Jain e-library). तरी त्यांचाही उपयोग अभ्यासाकरिता हिताचा ठरेल. ज्या ग्रंथातून पाठ निवडले आहेत, ते मूळ ग्रंथ शिक्षकांनी स्वतः पहावेत तसेच विद्यार्थ्यांनासुद्‌धा दाखवावेत.

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | गज्ज-विहाओ | पान क्र. |
|---|---|---|
| | **सुगम प्राकृत** | १ |
| १) | परिस्समसीलो करिसओ | ७ |
| २) | णर-पसु-भेओ | १० |
| ३) | विज्जागहणं सुहंकरं | १३ |
| ४) | सेवावई संत-गाडगेमहाराओ | १६ |
| ५) | अमंगलिअ-पुरिसस्स कहा | १९ |
| ६) | पज्जावरणस्स माहप्पं | २२ |
| ७) | मअण-मरणं | २६ |
| | **पज्ज-विहाओ** | |
| १) | पाइअ-कव्वं | २९ |
| २) | कयग्घो माणुसो | ३२ |
| ३) | सिसुवाल-कहा | ३६ |
| ४) | सुहासिआइं | ३९ |
| ५) | सुकम्म-पुप्फ-सुवासो | ४२ |
| ६) | पुत्ताणं परिक्खा | ४५ |
| ७) | दया-धम्मो | ५० |
| **परिशिष्ट १** – अवांतर-वाचन | | ५१ |
| **परिशिष्ट २** – व्याकरण विवेचन | | ५९ |
| | (१) प्राकृत भाषेतील स्वर, व्यंजन (२) संधी (३) काळ (४) विभक्तिप्रत्यय व उपयोग (५) नाम (६) सर्वनाम (७) संख्या | |
| **परिशिष्ट ३** – लेखन कौशल्य | | ९१ |
| **परिशिष्ट ४** – निबंध लेखन, रेखाजाल | | ९५ |

# सुगम प्राकृत
## विविहाणि वत्थुणामाणि

विविहाइं वत्थूइं →



चित्तं



दप्पणं/आयंसो



घडो



कलसो



थालिआ



पडिमा/मुत्ती



घरं/गिहं/आलअं



विज्जालअं/पाढसाला



मंदिरं/देउलं/देऊलं



रहो



चक्कं



धणु-बाणो



संगणअं

वणप्फई-जाइओ →



अंबरुक्खो



लआ/वेल्ली/वल्ली



कट्ठं/दारू/लगुडं



तणं/तणाणि



वणं/अरण्णं/रण्णं



साहा/डाला



रुक्खो



फलाइं, फलाणि



पुप्फाइं/कुसुमाणि/सुमणाणि

**पसु-पक्खिणो** →



अस्सो/हओ/तुरओ



वाणरो/मक्कडो



मिओ/हरिणो



गओ/हत्थी/करी



णाओ/सप्पो/भुअंगो



सीहो/केसरी/हरी/वणराओ



मोरो/मऊरो



वग्घो/सद्दूलो



पंछिणो/पक्खिणो



हंसो



गिद्धो



सुओ/कीरो



पारावओ

**इत्थि-पुरिसा** →



राआ/णरवई/णिवो



वुड्ढो/थविरो/महत्तरो



इसी/रिसी



इत्थी/णारी



णरो/माणुसो/पुरिसो



साहू/मुणी/तवस्सी



भडो/सेणिओ



सिरिकण्हो/गोविंदो



किसओ/किसीवलो/करिसओ



वेज्जो/चिगिच्छओ

समुद्दआआस-संपआ →



रअणाणि



संखो



णई/सरिआ/णिण्णगा



समुद्दो/साअरो/रअणाअरो



सुज्जो/सूरो/सूरिओ/दिणअरो



मेहो/बद्दलो/अब्भो



आआसो/णहो/आयासो



चंदो/मिअंको/सोमो/इंदू

अवयवाणि →



णासो/णासिआ/णक्को


कण्णो/सवणो


जीहा/जिब्भा


अक्खी/णयणाणि/लोयणाणि


हत्था/करा/पाणिणो





पंचवाअणं


पंचाहिओ एअवाअणं


दसाहिओ दुवाअणं


सपाअ-सत्तवाअणं


वीसाहिओ चउवाअणं


पंचवीसाहिओ पंचवाअणं


सड्ढ-पंचवाअणं


मज्झण्हं/बारसवाअणं


छट्ठवाअणं


सत्तवाअणं

## वासर–णामाणि

| | | | |
|---|---|---|---|
| सोमवासरो | मंगलवासरो | बुहवासरो | गुरुवासरो/बिहप्फई |
| सुक्कवासरो | सणिवासरो | रविवासरो/सुज्जवासरो | |

## मास–णामाणि

| | | | |
|---|---|---|---|
| चेत्तमासो/चइत्तमासो | वइसाहमासो | जेट्ठमासो | आसाढमासो |
| सावणमासो | भद्दवओ मासो | अस्सिणमासो/आसोअमासो | कत्तिअमासो |
| मग्गसिस्समासो/मग्गसीसमासो | पोसमासो | माहमासो | फग्गुणमासो |

# सराव

### संख्या अक्षर आणि अंकामध्ये लिहा.

| अंका | अक्खराणि | अंका | अक्खराणि |
|---|---|---|---|
| ३ | | | णव/णउ |
| ५ | | १५ | |
| ६ | | १७ | |
| | अट्ठ | १९ | |
| १० | | | विंसइ/वीसा |
| ११ | | २१ | |
| | तेरस | २५ | |
| १४ | | | छव्वीस |

## चित्तपअकोसो







पसुणो
पक्खिणो
इत्थि-पुरिसा
किसी
समुद्दो
आआसो
फलाणि
अवयवाणि
सिंहाचे समानार्थी
सूर्याचे समानार्थी

# १. परिस्समसीलो करिसओ

प्रस्तुत पाठ परिश्रमाचे महत्त्व सांगण्यासाठी रचलेला आहे. मानवाने परिश्रम करत असतांना मनःपूर्वक करावेत. त्या परिश्रमाचे फळ केवळ स्वतःलाच मिळते असे नाही तर पुढच्या पिढीला तसेच समाजालाही उपयुक्त ठरू शकते, हाच विचार प्रत्येकाने करायला हवा. हा संदेश या पाठामध्ये वृद्ध शेतकऱ्याच्या उदाहरणातून दिला आहे.

सदर पाठात कर्तव्यदक्ष राजाचे स्वभाव चित्रण आलेले आहे. प्रजेच्या अडचणी समजून घेण्यासाठी राजा आपल्या सेवकांबरोबर फेरफटका मारत असतो. एकदा तो एका शेतकऱ्याच्या झोपडीजवळ येतो. स्वच्छ झोपडी बघून राजा त्याची प्रशंसा करतो. आजही 'स्वच्छ भारत' अभियान अस्तित्वात आहे.

राजा शेतकऱ्याचे परिश्रम व उदार मनोवृत्तीचीही प्रशंसा करतो व शेतकऱ्यावर खुश होऊन त्याला पारितोषिकाच्या स्वरूपात प्रोत्साहन देतो.

अह एगम्मि उडए णिवसइ को वि करिसओ। सअअं उज्जम-सीलो सो ण कयावि अलसो ठाइत्था। गच्छंतेण कालेण वुड्ढत्तं आवण्णो सो उडय-समीवं एव किमवि करेंतो कालं गमेइ। एगम्मि दिणे णियडवट्टिणा मग्गेण आगओ तप्पएसस्स णिवई। तं अणुसरिंसु बे वि रायपुरिसा। आसरुहा सकोउयं पासिंसु पयाणं परिस्समस्स फलाणि। तमुडयं दट्ठूण सो भूवई कहित्था, 'अहो सच्छं सुरइयं चेव उडयं।'



**पढमो रायपुरिसो :** एवं एयं, महाराय! अत्थ दीसंति फल-सहिया रुक्खा समीवट्ठा।

**बीओ रायपुरिसो :** देव! पीणा एए पसुणो एत्थ चरंति। पासउ, महाराय! सो वड्ढो करिसओ इओ एव आगच्छइ। महारायं णमिऊण अंजलिं बंधेइ।

**णिवई :** सत्थि तुब्भं, भो करिसअ। तुज्झ खेत्तं उडयं च दट्ठूणं अईव संतुट्ठो खु अहं। अहुणा तुमं किं करेसि?

**करिसओ :** अत्थ णूयणे अंब-रुक्खे आरोवेमि, महाराय!

**णिवई :** रे थविर! केत्तियं तुज्झ वयं?

**करिसओ :** चिरं जीवउ देव! असीइ-वरिसाणि वइक्कंताणि मम जायस्स।

**णिवई :** हंत! भो! असीइ-वरिसिओ तुमं! साहु, जरढ, साहु! धन्नो हं जं मम पया दिग्घाउं उवभुंजइ। अवरं च पुच्छामि, अस्स णवीणस्स अंबस्स फलाइं किं आसाएउं जीविस्ससि?

**करिसओ :** देव, णिय-काअव्वं एव करेमि। एयस्स अंबस्स आरोवणं ण केवलं अप्पणो उवभोगत्थं। अहं चक्खेमि पुव्वएहिं आरोवियाणं तरूणं फलाणि। तहेव मए आरोवियस्स तरुणो फलाणि

आसाइस्संति मे पुत्ता, पोत्ता, पपोत्ता य। एसेव लोयस्स परिवाडी।

**णिवई** : रे बंधू, समीईणा खलु तुज्झ मणोवित्ती। सुट्ठु सोहसि एएण सोहणेण



कज्जेण। गिण्हसु तुज्झ कायव्व-बुद्धीए पारिओसियं। (इइ दस-सुवण्ण-मुद्दाओ देइ)

**करिसओ** : (विणएण गिण्हिऊण) अहो किवालू गुणण्णू य भअवं। अणुग्गहिओ म्हि। सुट्ठु कहियं केणावि महापुरिसेण जं।

उज्जमेण हि कज्जाणि सिज्झंति ण मणोरहा।

अओ सया हि कायव्वो अप्पमाएण उज्जमो।।

## सद्दत्था

**उडए** – झोपडीत

**करिसओ** – कृषक, शेतकरी

**उज्जम-सीलो** – सतत कार्यमग्न

**आसरुहा** – घोडेस्वार

**आरोवणं** – लावणे

**आरोवियाणं** – लावलेल्या

**सत्थि** – क्षेमकुशल

**गच्छंतेण कालेण** – जसजसा काळ लोटत होता तसा

**वुड्ढत्तं आवण्णो** – म्हातारपण आलेला

**अणुसरिंसु** – मागोमाग आले

**पीणा** – धष्टपुष्ट

**सुरइयं** – व्यवस्थित

**उज्जम** – उद्योग

**णियडवट्टिणा** – जवळ असलेला

**सकोउयं** – कुतूहलाने

**केत्तियं** – किती?

**असीइ** – (संख्या वि.) ऐंशी

**मणोवित्ती** – मानसिकता

**अणुग्गहिओ म्हि** – मोठी कृपा झाली माझ्यावर, मी आभारी आहे

**साहु** – छान, उत्तम

**परिवाडी** – रूढी, परंपरा

**समीईणा** – उत्तम, सात्विक

**पया** – प्रजा

**थविर** – म्हातारा

**जरढ** – हे वृद्धा

**काअव्वं** – कर्तव्य

**गुणण्णू** – गुणाची कदर असणारा

**वइक्कंताणि** – उलटली

**वयस्स** – मित्र

**पोत्ता पपोत्ता** – नातवंडे, पतवंडे

**किवालु** – दयाळू

## सज्झाओ

१ **या पाठात आलेली भूतकाळी रूपे ओळखून त्यांचे व्याकरण लिहा.**

२ **पाठातील णमिऊण, दट्ठूण, गिण्हिऊण, बंधिऊण या पूर्वकालवाचक धातुसाधित अव्ययांच्या उपयोगांचे निरीक्षण करा व त्याप्रमाणे पुढील वाक्ये तयार करून त्यांचे अर्थ लिहा.**

१) जलं ........ सो सरोवरस्स समीवं गच्छइ (पास)।

२) कूवाओ पाणियं ........ सा रुक्खे सिंचइ (कड्ढ)।

३) पहूयं धणं ........ वि सो सेट्ठी न तुस्सइ (लह)।

४) भत्तं ........ छत्तो पाढसालं गओ (भुंज)।

५) पुप्फाइं ........ सा पइदिणं देउलं गच्छइ (गेण्ह)।

३ **पुढील विषयांवर कृती करा.**

१) राजा व राजपुरुष यांनी शेतकऱ्याच्या बाबतीत काय निरीक्षण केले?

२) शेतकऱ्याच्या कामाचे वर्णन करा.

३) राजाने शेतकऱ्याला विचारलेला प्रश्न सांगा.

४) शेतकऱ्याने राजाला दिलेले उत्तर सांगा.

५) राजाने शेतकऱ्याची केलेली स्तुती स्वत:च्या शब्दात मांडा.

६) राजाने दिलेल्या पारितोषिकाचे स्वरूप आपल्या शब्दांमध्ये मांडा.

७) शेतकऱ्याच्या कष्टाळू जीवनाचे वर्णन करा.

४. **'उज्जमेण हि कज्जाणि सिज्झंति ण मणोरहा' या उक्तीशी साधर्म्यवाचक कथा लिहा.**

५. **विशेषण-विशेष्यांच्या जोड्या लावा.**

१. सोहणेण अंबस्स ।

२. एयस्स कज्जेण ।

६. **क्रियापदतालिका पूर्ण करा.**

| अनु क्रं. | रूपे | काळ | पुरुष | वचन |
|---|---|---|---|---|
| १. | चरंति | | | |
| २. | आगच्छइ | | | |
| ३. | आरोवेमि | | | |
| ४. | जीवउ | | | |

❊❊❊

# २. णर-पसु-भेओ

दिगंबराचार्य श्रीविद्यानंद मुनी यांच्या प्रभावी प्रवचनातून ही कथा घेऊन त्याचे महाराष्ट्री प्राकृतमध्ये रूपांतर केले आहे. आचार्यश्रींचा जन्म बेळगाव जिल्ह्यातील रोडबाळ गावी एका जैन कुटुंबात २०-४-१९२५ साली झाला. हिंदीवर त्यांचे विशेष प्रभुत्व असून संस्कृत व प्राकृत ग्रंथांचे ते गाढे अभ्यासक आहेत.

तीर्थंकरांच्या प्रतिमेखाली पशू व पदार्थांचे चिन्ह असते. मानवजातीचे चिन्ह नसते. याचे कारण असे, की मनुष्याचा आकार एकसारखा असतो. विविध चिन्हांवरून तीर्थंकरांचा परिचय किंवा नाव समजण्यास मदत होते. या पाठात पशुपक्षी आणि माणूस यांच्यामधील महत्त्वाचा फरक आचार्यांनी समजावून सांगितला आहे. पशुपक्षी यांचे बाह्यरूप सारखे नसते; परंतु त्यांचे अंतरंग मात्र सारखे असते. माणसांचा बाह्य आकार सारखा असला तरी विचार, भावना मात्र वेगवेगळ्या असतात. हा फरक समजावून सांगण्यासाठी खालील गोष्ट आचार्यांनी रंजकपणे सांगितली आहे.

अत्थि एआ रमणीआ अडवी। सा य वड-ताल-चंदण-लिंबुंबर-जंबु-अंब-फणसाइ-रुक्खेहिं मालई-माहवी-मल्लिआ-मोग्गर-पाडल-जवाइ-लयाहिं च विसोहिया। तत्थत्थि सुमणोहरं जिणालयमेअं। तम्मि संति चउवीस-तित्थयराणं काउस्सग्गमुद्दाए पडिट्ठावियाओ पडिमाओ।

एअम्मि दियहे सुहेण हिंडंतो इक्को वाणरो तत्थागओ। सो उस्सुगमणेण तम्मि जिणालयम्मि पविसइ। कोउएण इक्केक्कं पडिमं पासमाणो सो एआए पडिमाए पुरओ सविम्हिओ ठिओ। तीए पडिमाए पायपीढस्सुवरि वाणर-चिंधं दट्ठूण सो वाणरो हरिसिओ जाओ। जायच्छरिएण णेण सयलाओ पडिमाओ णिज्झाइयाओ। ताणं पडिमाणं पि पाअपीढाणमुवरि वसह-गय-अस्स-हरिण-विसहर-सीह-संख-कुंभाइ-लंछणाणि पासिऊण तस्स चित्ते कोउहलमुप्पण्णं।

मणे किमवि चिंतिऊण सो वाणरो जिणालयाओ णिग्गओ। जाण जाण पाणीणं लंछणाइं दिट्ठाइं ते ते पाणिणो सद्दाविऊण संखाइ-पयत्था घेत्तूण तेण तहिं आणिया। जत्थ जस्स लंछणमत्थि तत्थ सो पाणी णिसण्णाविओ पयत्थो य ठविओ। सयं च सो वाणर-लंछणंकियाए पडिमाए पुरओ उवविट्ठो।

एत्थंतरम्मि जिणालयस्स पासाओ एया महिला गच्छइ। सा तित्थयराणं वंदणट्ठं तम्मि पविट्ठा। तत्थब्भिंतरे गय-अस्स-विसहर-सीहाइ-पाणिणो दट्ठूण सा भयभीया जाया, जिणालयाओ तुरियं णिग्गंतूण धावमाणी अप्पणो घरं गआ।



तयाणंतरं थेवेण समएण एक्को समणो तत्थागओ। सो वि जिण-वंदणट्ठं मंदिरंसि पविसइ। सीहाइ-भीसण-पाणिणो दट्ठूण वि ण सो वियलिओ भूओ। णिब्भय-मणेण सो परम-भत्तीए कमेणेक्केक्कं जिण-पडिमं वंदिउं लग्गो। जया सो सिरीअभिणंदण-सामिणो पडिमं वंदइ तया तस्स

वंदणेण तत्थ उवविट्ठो वाणरो पसण्णो होइ। 'ही हि' त्ति पायं उब्भं काऊण 'तुज्झ कल्लाणं होउ'त्ति तेण वाणरेण तस्स आसीसो दिण्णो।



तओ समणेण भणियं – किं मज्झ आसीसं देसि? ण मया तुमं भगवं ति मण्णिऊण वंदिओ।

तओ वाणरो पुच्छइ – 'जइ मं भगवं ण मण्णसि, ता किमेत्थ मम लंछणं उक्कीरियं? इमा कस्स पडिमा अत्थि?

'एसो चउत्थो तित्थयरो भगवं सिरी अभिणंदणो अत्थि।'

'कहं जाणिज्जइ?'

'वाणरस्स लंछणं दट्ठूण। जओ भगवओ सिरी अभिणंदणस्स वाणरो त्ति लंछणमत्थि।'

'अओ च्चिय अहमवि भगवं तित्थयरो'त्ति वाणरेण दिढसरेण वुत्तं।

तओ ते दुवे वि किंचि कालं विवायं कुणंति।

पच्छा समणो वाणरं जाणावेउं बोल्लइ– 'पसु–पक्खीणं बाहिराआरा विविहा। णराणमाआरो उण समसमाणो। अओ णरस्स लंछणं ण उक्कीरियं। तित्थयराणं पसु–पंछि–कुंभ–संखाइ–लंछणाणि उक्कीरियाणि।'

तं सोऊण वाणरो अप्पणो मणम्मि उप्पण्णं भावं पायडं करेइ – 'णराणं बाहिरायारो समाणो। अंतरम्मि उण ते समसमाणा णत्थि। पसु–पंछिणो बाहिरायारेहिं विविहा। अंतरम्मि उण एअसरिसा।'

समणो पसण्णमणेण भणइ– 'साहु! तुमए णर–पसूईणं भेओ सुट्ठु बोहिओ। धण्णो सि।'

## सद्दत्था

**अडवी** – अरण्य, वन

**मल्लिआ** – मल्लिका / जाईजुई

**जंबू** – जांभूळ

**पाडल** – गुलाब

**जवा** – जपा / जास्वंद

**विसोहिया** – शोभून दिसत होती.

**चउवीस** – चोवीस

**तित्थयर** – तीर्थंकर, जैनांचे जे २४ महापुरुष आहेत त्यांना तीर्थंकर म्हणतात.

**काउस्सग्गमुद्दाए** – कायोत्सर्ग मुद्रेमध्ये, कायोत्सर्गमुद्रा म्हणजे ध्यानमुद्रा.

**उस्सुगमणेण** – उत्सुक मनाने

**पासमाणो** – पाहणारा, बघणारा

**पडिमा** – प्रतिमा, मूर्ती

**पायपीढ** – पादपीठ, पाय ठेवण्याचा चौरंग, मूर्ति-प्रतिष्ठापनाचे आसन.

**चिंध** – चिह्न, खूण

**जायच्छरिएण** – आश्चर्यचकित होऊन (जाय + अच्छरिएण)

**णिज्झाइयाओ** – नीट निरखून पाहिल्या.

**वसह** – वृषभ, बैल

**लंछणाणि** – लक्षणे, चिह्ने

**पासिऊण** – पाहून

**सद्दाविऊण** – बोलावून

**पयत्था** – पदार्थ (अनेकवचन)

**णिसण्णाविओ** – बसवलेला

**वाणरलंछणंकियाए** – वानराचे चिह्न असलेल्या

**उवविट्ठो** – बसला

**वच्चइ** – जात असते, जाते

**णिग्गंतूण** – निघून, बाहेर जाऊन

**धावमाणी** – धावणारी

**थेवेण समएण** – थोड्या वेळाने

**तत्थब्भिंतरे** – तिथे आतमध्ये

**भीसण** – भीषण

**वियलिओ भूओ** – गर्भगळीत झाला

**पायं उब्भं काऊण** – पाय उभा करून, पाय उंचावून

**चउत्थो** – चौथे

**दिढसरेण** – दृढ स्वराने, ठामपणे

**उक्कीरियं** – कोरले

**जाणावेउं** – समजावून देण्यासाठी

**मण्णिऊण** – मानून

**सुट्ठु** – नीट, चांगल्याप्रकारे

**साहु** – छान

**बोहिओ** – कळाले

## सज्झाओ

१ **आकृती पूर्ण करा.**




२ **माध्यम भाषेत उत्तरे लिहा.**

१) वानराच्या कुतूहलाचे कारण सांगा.

२) ‘सो वाणर-लंछणंकियाए पडिमाए पुरओ उवविट्ठो’ - हे विधान स्पष्ट करा.

३) ‘वानराने साधूला आशीर्वाद दिला’ हे वाक्य स्पष्ट करा.

४) तीर्थंकरांची लक्षणे (चिह्ने) सांगा.

५) ह्या पाठाचा सारांश लिहा.

३ **संधी सोडवा.**

तत्थागओ, जिणालयमेअं, पायपीढस्सुवरि, कोउहलमुप्पण्णं, बाहिराआरा, णराणमाआरो

४ **प्राकृतभाषेत कृती करा.**

१) मी शाळेत जातो.

२) मी तीर्थंकरांना वंदन करते.

३) श्रीअभिनंदनस्वामींचे चिह्न वानर आहे.

५ **जोड्या लावा.**

| (अ) | (ब) |
|---|---|
| ताल | पडिमा |
| मल्लिया | रुक्ख |
| काउस्सग्गमुद्दा | लआ |

६ **पाठातील अव्ययांची यादी करा.**

❋❋❋

# ३. सुहंकरं विज्जागहणं

'उत्तरज्झयणसुत्तं' हे जैन आगमातील महत्त्वाचे मूलसूत्र आहे. यावर आचार्य नेमिचंद्रसूरी (देवेन्द्रगणी) यांनी इ.स. १०७३ मध्ये 'सुखबोधा' नावाची टीका संस्कृतमध्ये लिहिली. त्यांनी श्लोकांच्या स्पष्टीकरणाकरिता महाराष्ट्री प्राकृत भाषेत सविस्तर कथा लिहिल्या आहेत, हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. या कथेत एक सिद्ध पुरुष दयाळूपणाने गरीब पुरुषास मंतरलेला घडा देतो. तो गरीब मनुष्य त्या घड्याच्या सहाय्याने विविध सुखे भोगतो. एकदा दारूच्या धुंदीत प्रमादामुळे त्या पुरुषाचा घडा फुटतो. याप्रमाणे त्याचे सर्व वैभव नष्ट होते. त्याने जर ती मंत्रविद्या शिकून घेतली असती, तर त्याला नवीन घडा निर्माण करता आला असता व दुसऱ्यांची नोकरी करावी लागली नसती. या कथेत हे सांगितले आहे, की स्वतः ज्ञान प्राप्त करावे. त्यामुळे प्रत्येकाला आपले जीवन स्वबळावर सुखी करता येते.

एको गोहो अभग्गसेहरो अईव-दोगच्चेण बाहिओ। किसि-कम्माइं करेंतस्स वि तस्स ण किंचि फलइ। तओ वेरग्गेण णिग्गओ गेहाओ, लग्गो पुहइं हिंडिउं।



कुणइ अणेग धणोवज्जणोवाए, परं ण किंचि संपज्जइ। तओ सो णिरत्थअपरिब्भमणेणं णिव्विण्णो पुणरवि जओ पडिणियत्तो। एगम्मि गामे देवालए रत्तिं वासोवगओ।

तओ देवालयाओ एओ पुरिसो णिग्गओ चित्त-घड-हत्थ-गओ। सो एग-पासे ठाइऊण तं चित्तघडं पूइऊण भणइ, ''लहुं मे परम-रमणिज्जं वासहरं सज्जेहि।'' तेण तक्खणमेव कअं। एवं सयण-आसण-धण-धण्ण-परियणभोगसाहणाइं कारिओ। एवं जं जं भणइ तं तं करेइ चित्त-घडो जाव पहाए पडिसारइ।

तेण गोहेण सो दिट्ठो। पच्छा सो चिंतेइ, किं मज्झ बहुएण परिभमणेण? एयं चेव ओलग्गामि। तस्संतियं गंतूण तेण भण्णइ, 'अहं मंद-भग्गो, दोगच्चेण कयत्थिओ, तुम्ह सरणमागओ। ता तुम्ह पसाएण अहं एवं चेव भोगे भुंजामि।' सिद्ध-पुरिसेण चिंतिअं, 'अहो! एस वराओ अईव दारिद्द-दुहक्कंतो। दुहियाण वच्छला हवंति महा-पुरिसा। अण्णं च

संपत्तिं पावेउं काअव्वो सव्व-सत्त-उवआरो।
अत्तोवआललिच्छू उयरं पुरेइ कस्स वि।।
ता करेमि इमस्स उवआरं' ति।

तओ तेण भण्णइ, 'किं विज्जं देमि उयाहु विज्जाभिमंतियं घडयं?' तेण विज्जा-साहण-पुरच्चरण-भीरुणा मंद-बुद्धिणा भोग-तिसिएण भणिअं, 'विज्जाहिमंतियं घडं देहि'। तेण दिण्णो। सो तं गहाय हट्ठ-तुट्ठ-मणो गओ सगामं। चिंतियं च अणेण,

'किं तीए सिरीए पीवराए जा होइ अण्ण-देसम्मि।
जा अ ण मित्तेहिं समं जं चामित्ता ण पेच्छंति।।'

तत्थ बंधूहिं मित्तेहिं अ समं जहाभिरुइयं भवणं विउव्विऊण भोगे भुंजंतो अच्छइ।

सो कालंतरेण अइ-तोसेण घडं खंधे काऊण 'एयस्स पभावेण अहं बंधु-मज्झे पमोयामि' त्ति भणिऊण आसव-पीओ पणच्चिओ। तस्स पमाएण सो घडो भग्गो। सो विज्जा-कओ उवभोगो णट्ठो। पच्छा सो पलईभूअ-विहवो पर-पेसणाईहिं दुक्खाणि अणुहवइ। जइ पुण सा



विज्जा गहिया हुंता, तओ
भग्गे वि घडे पुणो करेंतो।

## शब्दार्थ

**गोहो –** (दे.) पुरुष

**सेहर –** शेखर, तुरा

**बाहिओ –** त्रस्त झाला

**वेरग्गेण –** कंटाळून

**अणेण –** त्याने

**ण किंचि संपज्जइ –** काहीच / थोडेही मिळविले नाही

**रत्तिं –** रात्री

**चित्त–घड–हत्थ–गओ –** चित्रित / रंगवलेला घडा हातात घेतलेला

**लहुं –** लवकर, लगेच

**वासहर –** निवासगृह

**तक्खणमेव –** (तक्खणं + एव) तत्क्षणी

**सयणासण –** सयण + आसण, शय्या म्हणजे अंथरुण व आसन

**ओलग्गामि –** नोकरी किंवा सेवा करतो

**मंद–भग्गो –** मंदभाग्य, कमनशिबी

**पसाएण –** प्रसादाने, कृपेने

**दारिद्द–दुहक्कंतो –** दारिद्द + दुह + अक्कंतो – गरीबीने गांजलेला

**वच्छला –** प्रेमळ, वत्सल

**अत्तोवआललिच्छू** (दे.)– स्वार्थलोलुप

**अभग्ग –** कमनशिबी

**दोगच्चेण –** दुर्दैवाने

**किसिकम्माइं –** शेतीची कामे

**हिंडिउं लग्गो–** (कृदंत) हिंडू लागला, फिरू लागला

**धणोवज्जणोवाए –** पैसे मिळवण्याचा उपाय

**णिव्विणो –** दुःखी

**वासोवगओ –** वास + उवगओ – निवास केला

**पूइऊण –** (कृदंत) पूजा करून

**परम–रमणिज्ज –** अत्यंत सुंदर

**सज्जेहि –** तयार कर, निर्माण कर (आज्ञार्थ)

**साहणाइं –** साधने

**तस्संतिय –** तस्सं + अंतियं = त्याच्याजवळ

**कयत्थिओ –** त्रासलेला

**वराओ –** (दे.) बिचारा, बापडा

**सव्व–सत्त–उवयारो –** सर्व प्राण्यांवर उपकार करणारा

**कस्स वि –** कोणाचीही

**विज्जाभिमंतियं घडं –** विद्येने मंतरलेला घडा

**उयाहु –** (अव्यय) अथवा

**हट्ठ–तुट्ठ–मणो –** आनंदित, संतुष्ट मनाचा/ने

**पुरच्चरण** – पुरश्चरण, सराव

**सिरीए** – लक्ष्मीचा, संपत्तीचा

**चामित्ता** – च + अमित्ता – आणि शत्रू

**जहाभिरुइयं** – जहा + अभिरुइयं – आपल्या आवडीप्रमाणे, यथेच्छ

**विउव्विऊण** – (कृदंत) दिव्य सामर्थ्याने निर्माण करून

**पमाएण** – निष्काळजीपणा

**पीवराए** – विपुल

**पणच्चिओ** – जोराने नाचू लागला

**णट्ठो** – नष्ट झाला, फुटला

**पलईभूअ** – नष्ट झालेले

**परपेसणाईहिं** – दुसऱ्यांची चाकरी करून

**आसव-पीओ** – दारू प्यायलेला (तो)

**विज्जा-कओ** – विद्येने मंतरलेला

## सज्झाओ

**१ पाठातून योग्य शब्द निवडून वाक्य पूर्ण करा.**

१) गोहो ........ बाहिओ।

२) पुरिसो चित्तघडं पूइऊण ........ भणइ।

३) महापुरिसा ........ वच्छला हवंति।

४) तस्स घडो ........ भग्गो।

५) गोहो ........ दुक्खाणि अणुहवइ।

**२ थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) पुरुषाच्या वाट्याला येणाऱ्या दुर्दैवाची कारणे लिहा.

२) देवालयातील अभिमंत्रित घड्याचे वैशिष्ट्य सांगा.

३) विद्याग्रहणाचे महत्त्व स्पष्ट करा.

४) ''पश्चात्तापाची वेळ येऊ नये'' हे विधान सिद्ध करा.

**३ खालील वाक्यातील हेतू स्पष्ट करा.**

१) किं मज्झ बहुएण परिभमिएण?

२) 'अहो! एस वराओ अईव दारिद्द-दुहक्कंतो।'

३) 'विज्जाहिमंतियं घडं देहि।

४) 'जइ पुण सा विज्जा गहिया हुंता, तओ भग्गे वि घडे पुणो करेंतो'।

**४ व्याकरण :**

**अ) खालील कोष्टक पूर्ण करा.**

| अनु. | शब्द | लिंग | वचन | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | देवालयाओ | | | |
| २. | पसाएण | | | |
| ३. | एयस्स | | | |

**ब) रूपे ओळखा :**

किसि-कम्माइं, गामे, देवालयाओ, वासहरं, दिट्ठो, पुरिसेण, चिंतेइ, भणिऊण, पमोयामि, मंद-बुद्धिणा

**५ संधी सोडवा :**

**अ)** वासोवगओ, तक्खणमेव, सरणमागओ, विज्जाहिमंतियं, सयणासण

**ब) संधी करा :**

तस्स + अंतियं, धण + उवज्जण + उवाए, दुह + अक्कंतो, जहा + अभिरुइयं, काल + अंतरेण

**क) या पाठातील क्रियापदांचा अर्थासहित संग्रह करा.**

❋❋❋

# ४. सेवावई संत-गाडगे-महाराओ

संत गाडगे महाराज हे आधुनिक भारतातील संत होत. स्वच्छतेविषयी प्रबोधन करण्यासाठी त्यांनी स्वतः हातात झाडू घेतला व आपल्या कृतीतून स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. मराठीत घड्याला गाडगे असे म्हणतात. नेहमी आपल्याबरोबर गाडगे वागवत असल्यामुळे महाराजांचे 'गाडगे महाराज' असे नाव प्रसिद्ध झाले. त्यांनी समाजासाठी विविध प्रकारचे सेवाकार्य केलेले आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची ओळख व्हावी यासाठी या पाठाची निवड केली आहे. आजही वलगाव (अमरावती) येथे त्यांची समाधी आहे. त्यांचे कार्य अनेक अनुयायी पुढे चालवत आहेत. गाडगेमहाराजांना अपेक्षित असणाऱ्या स्वच्छतेचे व सेवावृत्तीचे प्रत्यक्ष दर्शन येथे आपल्याला घडते.



एगया कआ वि विअब्भेसु 'दापुरा' गामस्स समीवे पुण्णाणईए परिसरे केवि गोवालदारआ भोअणट्ठं समागया। तत्थ केई दारआ पअदलिअत्तणेणं सहभोअणाओ बाहिं कया। ''एहिं समं एव भुंजामि'' त्ति विचिंतिऊण 'डेबूजी' णामं कोवि अट्ठवरिसवओ बालो तेसिं सआसं गंतूण तेहिं समं चेव भुंजित्था। एसो चेव बालो कालंतरेण 'गाडगेमहाराज' णामेण सुप्पसिद्धो जाओ।

२३ फेब्रुवारी १८७६ तमे दिणंके 'शेंडगाव' णाम गामे रअआणं कुले डेबूजी जाओ। 'झिंगाराजी' तस्स पिआ, 'सखुबाई' य तस्स माआ।

डेबूजिस्स बालवअंसि चेव तस्स पिआ कालं गओ। तओ एसो माईए समं गओ णिअमाउलस्स गेहं। किसिकज्जवाउडो य वंचिओ सज्झायाओ। तहिं गोवालणाइयं कुणंतो 'डेबुजी' पण्णरसे चेव वरिसे जाओ णिउणो किसीवलो। तस्स माउलेण 'तिडके' णामाओ कुसीआओ किं पि रिणं गहियं आसी। पच्चप्पिए वि रिणे सढेण तेण कुसीएणं सा धणरासी वुड्ढिरूवेण एव मग्गिआ। 'मूलं रिणं तुमए अज्जवि ण दिण्णं' ति पुणो पुणो सो कुसीदओ तं तज्जइ। अणेण णिट्ठुरेणं वंचणाघाएण डेबूजिस्स माउलो सहस त्ति कालगओ। तहा णिसंसो सो कुसीओ भिच्चेहिं समं खेत्तं बलेण हरिउं समागओ। एयं णअविरुद्धं कज्जं असहमाणेण डेबूजिणा सो सभिच्चो कुसीदओ तहा ताडिओ जहा अण्णे वि कुसीदआ भआउला जाआ। तआणंतरं च तेण कुसीएण तस्स खेत्तहरणस्स पआसो एव छड्डिओ।

विवाहाणंतरं तरुणे एव वयसि डेबूजिणा णिअगिहं सअणं च चइऊण परिब्भमणव्वअं गहिअं। तओ अ बारसवरिसाणंतरं पडिणिवुत्तो सो रिण-मोअणजत्ताए पंकपउरे मग्गे वालुअत्थरणे णिमग्गो दिट्ठो जणेहिं। तया तत्थागआ तस्स माआ जणसेवारअं सपुत्तं पासिऊण हट्ठतुट्ठा जाआ। अच्चंतपमुइआ सा तं गिहं पडिणिवट्टिउं विण्णवेइ। णिबद्ध-विण्णविओ वि सो गिहं पडिणिवट्टिउं णेच्छइ। जत्ता-समत्तीए पुणो वि परिभमिउं अण्णत्थ गओ। सो सया अप्पणो सह मट्टिआ घडं वहेइ अओ तस्स 'गाडगेमहाराज' इयं णामं पसिद्धं जाअं।

जिण्णचीवरवसणो घडकप्परधारओ 'संत-गाडगेमहाराज' ण कहिं पि दिणद्धयाहिअं कालं णिवसइ। जं गामं गच्छइ तत्थ पहाअम्मि सम्मज्जणकज्जं करिऊण जणसेवं करेइ। घडकप्परम्मि थोअं चेव भिक्खं गेण्हिऊण तं भक्खेइ। कआ वि तरुतले सुवइ। एवं जणसेवारओ सो कालं गमेइ।

जणसेवावअं आयरंतेणं एएण महप्पणा दीणाणाहाणं उवेक्खियाणं गिरिअणाणं, बालाईणं च कए उवजुत्ताओ धम्मसालाओ, आसमसालाओ, विज्जालयाइं, छत्तावासा,



वुड्ढस्समा, गोरक्खणसंठाओ इच्चाइयाओ संठाओ णिम्मियाओ।

तहेव च कित्तणेसुं एएण महप्पणा पाणिहच्चा, बालविवाहा, विवाहेसुं सुक्कग्गहणं, अंधसद्धाओ, मज्जपाणं, णिरक्खरआ इच्चाइयाओ लोअविहाइयाओ रूढीओ भंजिऊण लोअप्पबोहणं कअं। 'गाडगेमहाराज'स्स एएण लोअसेवाकज्जेण डॉ. आंबेडकराइओ वि पभावियाओ। तेण सह ते विआर-विमस्सं करेंति। एवं एसो गाडगेमहाराओ लोउत्तरो महापुरिसो क्खु।

सम्मज्जणिं कप्पर-वक्क-लट्ठिं, धारेऊण सो जिण्णविचित्तवेसो।

संकित्तणं लोअविबोहणत्थं सेवावअत्थं भमणं करेइ।।

---

## सद्दत्था

**सेवावई** – सेवाव्रती, सेवेचे व्रत घेतलेले

**पअदलिअत्तणेणं** – पददलित असल्यामुळे

**बाहिं कया** – बहिष्कृत केले

**माआ** – माता

**कालं गओ** – मृत्यू पावले

**माईए समं** – आईबरोबर

**सज्झायाओ** – अध्ययन किंवा शिक्षणापासून

**णिउणो** – निपुण, कुशल

**कुसीअ** – सावकार

**पच्चप्पिए** – परत दिल्यावर

**वुड्ढिरूवेण** – व्याजाच्या स्वरूपात

**वंचणाघाएण**– फसवणुकीच्या आघाताने

**णिबद्ध-विण्णविओ** – कळकळीची विनंती केलेला

**घडकप्परधारओ** – घड्याचे फुटलेले खापर घेतलेला

**दीणाणाहाणं** – दीण + अणाहाणं – दीन अनाथांची

**दिणद्धयाहिअं** – दिण + अद्धय + अहिअं – अर्ध्या दिवसांपेक्षा जास्त

**गोवालदारआ** – गुराख्यांची मुले

**सहभोअणाओ** – एकत्र (बसून) जेवण करण्यापासून

**अट्ठवरिसवओ** – आठ वर्षे वयाचा

**बालवअंसि** – बालपणात, लहानपणी

**किसिकज्जवाउडो** – शेती करण्यात गुंतलेला

**वंचिओ** – मुकला, वंचित झाला

**पण्णरसे** – पंधराव्या

**किसीवलो** – शेतकरी

**रिणं** – कर्ज

**सढ** – लुच्चा, लबाड

**तज्जइ** – त्रास दिला

**भआउला** – भयभीत

**जिण्णचीवरवसणो** – फाटके जुने कपडे घातलेला

**सम्मज्जणकज्जं** – स्वच्छताकर्म, स्वच्छतेचे कार्य

**लोअविहाइयाओ** – लोकविघातक

**सम्मज्जणिं** – झाडू

## सज्झाओ

१ **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा.**

अ) गाडगेमहारायस्स पिआ ........ ।

ब) गाडगेमहारायस्स माया ........ ।

क) गाडगेमहारायस्स मूलणामं ........ ।

ड) केई दारगा ........ सहभोयणाओ बाहिं कया।

इ) डेबूजिस्स ........ चेव तस्स पिया कालं गओ।

२ **खालील प्राकृत शब्दांसाठी मराठी शब्द द्या.**

माआ, पिआ, माउल, गोवाल, रिणं, सज्झाय, कुसीअ, गिहं, जत्ता, अच्चंत

३ **संधी सोडवा.**

भआउला, तत्थागआ, दीणाणाहाणं, बारसवरिसाणंतरं, दिणद्धयाहिअं

४ **रूपे ओळखा.**

बालो, गंतूण, भुंजित्था, भिच्चेहिं, घडकप्परम्मि, तरुतले

५ **या पाठातील नामे व सर्वनामे यांची यादी करा.**

६ **'संत गाडगे महाराज' यांच्या कार्याबद्दल तुम्हांला काय वाटते? ते स्पष्ट करा.**

❀❀❀

# ५. अमंगलिअ पुरिसस्स कहा

हा पाठ 'पाइअविण्णाणकहा' या कथासंग्रहातून घेतला आहे. या कथासंग्रहाचे लेखक विजयकस्तूरसूरीश्वर महाराज आहेत. त्यांनी चातुर्य कथा, व्यावहारिक कथा, बोधकथा, धर्मकथा इत्यादी विविध प्रकारच्या कथा लिहिल्या आहेत. या कथासंग्रहाची भाषा महाराष्ट्री प्राकृत असून या कथा समजायला सोप्या, मनोरंजक व बोधप्रद आहेत.

या पाठात एका अपशकुनी पुरुषाची कथा आहे. सकाळी या पुरुषाचे जो तोंड बघत असे त्याला जेवण मिळत नसे. त्याच्या या लक्षणावरून त्याला 'अमांगलिक' असे नाव पडले होते. राजाने त्याची परीक्षा घेण्याचे ठरवले. राजालाही तोच अनुभव आला. राजाने अमांगलिकाचे प्रत्यक्ष स्वरूप पाहिले व त्याला फाशीची शिक्षा ठोठावली. एका दयाळू पुरुषाने अमांगलिकाची व्यथा ऐकली. त्या दयाळू पुरुषाने अमांगलिकाला शिक्षेपासून बचाव करण्याचा कोणता मंत्र दिला व त्याची कशी सुटका केली याचे रसाळ वर्णन या कथेमध्ये आलेले आहे.

एअम्मि णअरे एओ मुद्धो पुरिसो आसी। सो एरिसो अत्थि, जो को वि पहायसमए तस्स मुहं पासइ सो तद्दिवसे भोअणं पि ण लहइ। एसो तस्स गुणो जणेसु विक्खाओ जाओ। तओ लोएहिं तस्स 'अमंगलिओ' त्ति गुणणिप्फण्णं णामं कअं। णयरजणा पच्चूसे तस्स मुहं ण पेक्खंति। तं मग्गेण एंतं दट्ठूण णयर-लोआ तस्स दंसणं परिहरिउं उज्जमंति। एसा वत्ता मुहपरंपरेण राअस्स कण्णं पत्ता। णरिंदेण परिक्खणत्थं सो अमंगलिअपुरिसो आणिओ। पभाअकाले तस्स मुहं दिट्ठं।



भोअणवेलाए राआ भोअणत्थं उवविट्ठो। जया पढममेव कवलं रण्णा मुहे पक्खित्तं तया णअरे अकम्हा परचक्कभएण हलबोलो जाओ। तया राआ वि भोअणं उज्झिऊण सहसा उत्थाय ससेण्णो णयराओ बहिं णिग्गओ। भयकारणं अदट्ठूण पुणो णअरं पविट्ठो। पासाअं पविसिऊण णरिंदो चिंतेइ- 'अमंगलिअस्स सरूवं मए पच्चक्खं दिट्ठं, तओ एसो हंतव्वो'। एवं चिंतिऊण अमंगलियं बोल्लाविऊण वहत्थं चंडालस्स अप्पिओ।



अमंगलिओ रुअंतो सकम्मं णिंदंतो चंडालेण सह गच्छइ। तया एओ कारुणिओ बुद्धिमंतो पुरिसो वहत्थं णिज्जमाणं तं दट्ठूण पुच्छइ- ''भो भद्द, केण कारणेण तुमं वहिज्जसि''? अमंगलिओ भणइ- 'अज्ज पभाए रण्णा मम मुहं दिट्ठं। तओ तेण भोअणं पि ण लद्धं। 'एयस्स अमंगलिअस्स मुहदंसणेण एव मए भोयणं ण लद्धं' त्ति



चिंतिऊण रण्णा मे वहो आणत्तो। मंदभग्गो अहं संपइ अप्पाणं एव णिंदामि। अहुणा ण किं पि मम सरणं अत्थि।'' अमंगलिअस्स एयं वअणं सोऊण तेण दयालुणा पुरिसेण तस्स कण्णे किं पि कहिअं। अमंगलिओ संतुट्ठो जाओ। चंडालेण सह वहट्ठाणं चलिओ।

जया सो वहत्थंभे ठाविओ तया सो चंडालेण पुट्ठो– ''जीविअं मोत्तूण जइ तव का वि अण्णा इच्छा अत्थि ता मग्गसु''। अमंगलिओ भणइ– ''पढमं मं णरिंदसमक्खं णेहि, तया मग्गामि''। णरिंदसमीवं आणिअं तं राआ पुच्छइ– ''किमेत्थ आगमणप्पओयणं''? सो भणइ– ''भो णरिंद, एयं सच्चं जं पच्चूसे मम मुहदंसणेण तुह भोअणं ण लद्धं। किंतु तुह मुह-पेक्खणेण मम मरणं पत्तं। पउरा किं कहिस्संति? 'पहाए राअदंसणं अमंगलियस्स वहकारणं जाअं' ति। अओ णाअरा वि पहाए तुह मुहं ण पासिस्संति' एवं तस्स वअणजुत्तीए संतुट्ठो राआ वहाएसं पडिसंहरेइ। अमंगलिअं च पारितोसिअं दाऊण गिहं पेसेइ।

## सद्दत्था

**अमंगलिओ** – अपशकुनी
**विक्खाओ** – प्रसिद्ध
**पच्चूसे** – पहाटे
**परिहरिउं** – (परि + हृ) टाळण्यासाठी
**वत्ता** – बातमी
**अकम्हा** – एकाएकी
**उज्झिऊण** – टाकून, सोडून
**रुअंतो** – रडणारा
**वहिज्जसि** – मारला जाशील
**वअणजुत्तीए** – वचन कौशल्याने
**मुद्धो** – भोळा
**गुणणिप्फण्णं** – गुणांमुळे प्राप्त झालेले
**एंतं** – येणारा
**उज्जमंति** – प्रयत्न करीत होते
**कवलं** – घास
**हलबोलो** – गडबड, गोंधळ, आवाज
**अप्पिओ** – स्वाधीन केला, दिला
**कारुणिओ** – दयाळू
**अहुणा** – (अ.) आता
**पडिसंहरेइ** – मागे घेतो

## सज्झाओ

**१ थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) 'अमंगलिअ' पुरुषाचा विशिष्ट गुण सांगा.
२) राजाने त्याला ठार मारण्याची आज्ञा देण्याचे कारण सांगा.
३) दयाळू बुद्धिमान पुरुषाने अमंगल पुरुषाच्या कानात जे सांगितले ते लिहा.
४) अमंगल पुरुषाला राजाने पारितोषिक देण्याचे कारण स्पष्ट करा.
५) या पाठाचे तात्पर्य सांगा.

**२ आकृतीबंध पूर्ण करा.**




**३ रूपे ओळखा :**

१) पुरिसो, णरिंदेण, णअराओ, भोअणं

२) पासइ, परिहरिउं, उज्जमंति, णिंदामि

**४ पुढील शब्द वापरून प्राकृत वाक्ये तयार करा.**

१) वत्ता २) कवलं ३) अहुणा ४) पच्चूसे ५) सह

**५ वर्तमानकाळातील एकवचनी क्रियापदे पाठातून शोधून लिहा.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

❋❋❋

# ६. पज्जावरणस्स माहप्पं

पर्यावरणाचा शास्त्र या दृष्टीने झालेला विकास काही वर्षांतील घटना आहे. निसर्ग व मनुष्य यांच्यातील संबंध सामंजस्यावर आधारित असेल तरच दोघांचे जीवन सुखाचे होऊ शकेल. लोकसंख्येत सतत होणारी वाढ व सुखासीन आयुष्य जगण्यासाठी मानवाने केलेल्या सुधारणा यामुळे निसर्गाचा समतोल ढासळत आहे. पर्यायाने पर्यावरण दूषित होत आहे. पर्यावरण हा शब्द अलिकडचा असला, तरी त्यासंबंधी विचारधारा प्राचीन भारतीय साहित्यातही प्रतिबिंबित झालेली आढळते. प्रस्तुत संवादात्मक पाठात मानवाच्या कल्याणासाठी पर्यावरणाचे रक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे हे सांगितले आहे.

**(पत्ताणि – जणओ, कण्णा कमला)**

**जणओ** : कमले, अयि कमले! अहो! ण जाणामि कत्थ गआ एसा। कल्लं चेव सा पज्जावरणविसए मं किंचि पुच्छित्था। कमले सिग्घं आगच्छ।

**कमला** : ताअ, एसा आगआ।

**जणओ** : कमले, दिग्घकालं जाव हं तुमं हक्कारेमि। अवि अज्जतणिअं वत्तपत्तं तुमे पढिअं? कल्लं एव पाढसालाए पज्जावरणपाढो अज्झाविओ त्ति तुमे वुत्तं।

**कमला** : सच्चं एअं। तस्स किं?

**जणओ** : तं चेव वोत्तुं इच्छामि। पज्जावरणविसए एव इमा वट्टा। सुण, पज्जावरणविक्खेवकारणा गिद्धविसेसाणं कवोअविसेसाणं च जाइओ लुप्पप्पाया णट्ठप्पाया अ हवंति।

**कमला** : अहह! कहमिणं जाअं।

**जणओ** : कमले, एत्थ जाव माणवस्स रसणालोलुवत्तणं आखेडाइसओ य कारणा वट्टंति। मणुस्सो भक्खणट्ठं मोराणं कवोआणं च वहं करेइ। एवं अप्पेणेव कालेणं वग्घजाई वि दुल्लहदंसणा भविस्सइ त्ति मे चिंता। जओ वग्घस्स चम्मं णहाणि य मणुस्सो णिअअलाहत्थं पउंजइ। पुरा जस्सिं भारहे चत्तालीससहस्साहिया वग्घा आसी, तत्थ दाणिं णवरं चउसहस्सवग्घा उव्वरिया। अईव दुहावहमेयं।

**कमला** : ताअ, वग्घाणं विणासं णिरुंधिउं सासणेण वग्घरक्खण-पअप्पा उवक्कंता।

**जणओ** : सच्चमेव तं। कमले किं तुमं जाणसि, वग्घविसए अम्हं पुव्वएणं किं भणिअं? हं पढामि –

णिव्वणो हण्णइ वग्घो णिव्वग्घं छिज्जइ वणं।
वग्घो वणं हि रक्खेज्जा वणं वग्घं च रक्खउ ।।१।।

वग्घाइणो पसुणो सआहरियाणि य वणाणि महणिज्जाणि एव।

**कमला** : ताअ, किंतु वत्तपत्तेसु भूओ भूओ पढिज्जइ जं वग्घा णयरवसहिं पविसिऊण पसुणो माणवा य भक्खेंति । सहाव-काअरेहिं णरेहिं किं कायव्वं? वग्घाणं हणणं विणा का अण्णा गई?

**जणओ** : णेयं उइअं। जह माणवा तह अण्णे वि पसुपक्खिणो पयइ-देवयाए अवच्चाणि संति। वणाइं केवलं पसुपक्खीणं णिवासत्थं उवकप्पिआइं। तत्थ वि सत्थलोलुवेण णरेण अक्कमणं कअं। एवं ठिए तवस्सिणो पसुपक्खिणो किं णाम कुज्जा। सव्वे वि पाणिणो णियजीविअजत्तं सुहेण जीविउं इच्छंति। एत्थ माणवो खु पज्जावरणविक्खेवकारणा अवरज्झइ।



**कमला :** कहमेयं?

**जणओ :** पस्स –

अवणीं अवणीकाउं उज्जुत्तो खलु माणवो।
अप्पाणं आवइगत्ते खिवइ त्ति ण संसओ ।।२।।

वणाणं विणासेण पाउसमाणं पि खिज्जमाणं दीसइ। एवं पज्जावरणपण्हो जडिलो कओ मणुस्सेणं।

**कमला :** किं किं मणुस्सेणं? कहमेयं?

**जणओ :** पज्जावरणविक्खेवस्स पहाणं कारणं अत्थि पऊसणं। तं च तिविहं। वाउपऊसणं, जलपऊसणं, झुणिपऊसणं च। पऊसणं माणवो एव करेइ।

**कमला :** ताय, पऊसणणिराकरणत्थं अत्थि को वि उवाओ?

**जणओ :** एत्थ सासणं करेइ जहासत्तिं उवाअजोअणं। पज्जावरणदिणं, वसुंधरादिणं, वणमहूसवो, अभयारण्णपकप्पा एव अणेगा उवक्कमा सासणेण समारद्धा। पज्जावरणविसओ अज्झयणक्कमे वि समावेसिओ। किं तु णेयं पज्जत्तं। णरेण अवस्सं अवहारणिज्जं – जहा एयं पुहवीअलं माणवस्स कए होइ तहा तं अण्णेसिं कए वि वट्टइ। सव्वेसिं अविरोहेण जइ सो णिवसेज्जा ता पज्जावरणस्स पण्हो ण पुणो उब्भविस्सइ। अवणीए अवणं णाम रक्खणं अम्हेहिं एव करणिज्जं जेण सा वि अवणी अम्हं अवणं कुज्जा।

**कमला :** ताअ मए पज्जावरणस्स माहप्पणं सम्मं जाणिअं।

**जणओ :** साहु! साहु! अओ हं भणामि –

साहुरक्खिअं पज्जावरणं भवइ,

भुवणकल्लाणकारअं। करेह पज्जावरणरक्खणं
सअललोअहिअमहासाहणं।।

अत्थु, इदाणिं पाढसालागमणवेला संवुत्ता।
तयत्थं सिद्धा हव।

(उभआ वि णिक्कंता)

## सद्दत्था

**पुच्छित्था** – विचारले
**वत्तपत्तं** – वार्तापत्र, वृत्तपत्र, समाचारपत्र
**अज्जतणिअं** – आजचे
**वुत्तं** – सांगितले
**विक्खेव** – हस्तक्षेप
**कवोअ** – कबूतर
**रसणालोलुवत्तणं** – जिभेचे चोचले पुरविण्याची वृत्ती
**भक्खणत्थं** – खाण्यासाठी
**तक्को** – तर्क
**लाहत्थं** – फायद्यासाठी
**चत्तालीससहस्साहिया** – चाळीस हजाराहून अधिक
**णिरुंधिउं** – थांबविण्यासाठी
**उवक्कंता** – सुरू केल्या आहेत
**पज्जावरणं** – पर्यावरण

**हक्कारेमि** – बोलावतो आहे
**अवि** – अपि वाक्याच्या सुरुवातीला आल्यास प्रश्नार्थक
**अज्झाविओ** – शिकविला
**वट्टा** – वार्ता
**गिद्ध** – गिधाड
**लुप्पप्पाया** – जवळजवळ लोप पावलेले
**आखेडाइसओ** – शिकारीत होणारी वाढ
**दुल्लहदंसणा** – दिसणे कठीण होईल
**चम्मं** – चामडे
**पउंजइ** – वापरले जाते
**चउसहस्स** – चार हजार
**पअप्पा** – प्रकल्प, योजना
**णिव्वणो** – वनरहित, निर्वन

**श्लोक १ भावार्थ** – जंगलातून बाहेर पडलेल्या वाघाला ठार करतात, जंगलात वाघ नसेल तर जंगलतोड करतात. खरोखर, वाघाने जंगलाचे रक्षण करावे व वनानेही वाघाचे रक्षण करावे.

**महणिज्जाणि** – महत्त्वपूर्ण
**णयरवसहिं** – शहराची वस्ती
**सहाव–काअरेहिं** – स्वभावतः भित्रा
**उइअं** – योग्य, उचित
**अवच्चाणि** – अपत्ये, संतती
**सत्थलोलुव** – स्वार्थलोलुप
**कुज्जा** – करावे
**अवरज्झइ** – अपराधी आहे

**पढिज्जइ** – वाचण्यात येते
**पविसिऊण** – प्रवेश करून
**अण्णा गई** – दुसरा मार्ग, गत्यंतर
**पयइ** – निसर्ग, सृष्टी
**उवकप्पियाइं** – योजलेली आहेत
**तवस्सिणो** – गरीब बिचारे
**जीविअजत्तं** – आयुष्यक्रम
**अवणीं** – पृथ्वीला

**श्लोक २ भावार्थ** – पृथ्वीला जंगलरहित करण्यास (अवणीकाउं) उद्युक्त झालेला मनुष्य खरोखर स्वतःला (अप्पाणं) संकटाच्या खाईत (आवईगत्ते) लोटतो (खिवइ) यात संशय नाही.

**पण्हो** – प्रश्न

**पहाणं** – मुख्य, प्रधान

**जहासत्तिं** – कुवतीनुसार, यथाशक्ती

**पज्जत्तं** – पुरेसे, पर्याप्त

**माहप्पणं** – माहात्म्य, महत्त्व

**जडिलो** – जटिल, बिकट

**झुणि** – ध्वनी

**समारद्धा** – सुरू केले आहेत

**अवहारणिज्जं** – लक्षात ठेवले पाहिजे

**साहुरक्खिअं** – चांगल्याप्रकारे रक्षण केले

## सज्झाओ

**१ पाठातील योग्य शब्द निवडून वाक्ये पूर्ण करा.**

अ) पज्जावरणविक्खेवकारणा ........, ........, ........ हवंति।

ब) माणवो ........, ........, ........ वहं करेइ।

क) पुरा भारहे ........ वग्घा आसी, दाणिं ........ उव्वरिया।

ड) वग्घा णयरवसहिं पविसिऊण ........, ........ य भक्खंति।

इ) वणाइं केवलं ........, ........ उवकप्पिआइं।

**२ कंसात दिलेले अर्थपूर्ण क्रियापद वापरून वाक्य पूर्ण करा.**

अ) मणुस्सेणं पज्जावरणपण्हो जडिलो ........। (करेइ, किज्जइ, कओ)

ब) सव्वे वि पाणिणो णियजीविअजत्तं सुहेण जीविउं ........। (इच्छंति, इच्छेज्जा)

क) वणाणं विणासेणं पाउसमाणं पि खिज्जमाणं ........। (दिट्ठं, दीसइ, दीसत्था)

ड) ताअ! मए पज्जावरणस्स माहप्पणं सम्मं ........। (जाणामि, जाणियं, जाणिऊण)

**३ खालील वाक्यांच्या अनुषंगाने योग्य ते स्पष्टीकरण द्या.**

अ) जह माणवा तह अण्णे वि पसुपक्खिणो पयइ-देवयाए अवच्चाणि संति।

ब) वग्घाणं विणासं णिरुंधिउं सासणेण विविहा उवाअजोअणा आरंभिया।

क) पज्जावरणविक्खेवस्स पहाणं कारणं पऊसणं अत्थि।

ड) माणवस्स रसणालोलुवत्तणं।

इ) पज्जावरणरक्खणं सयललोअहिअमहासाहणं।

**४ रूपे ओळखा.**

वणाइं, णिरुंधिउं, अवणीए, पण्हो, णरेण, कमले, माणवस्स, आगच्छ, पुच्छित्था, एसा, पाढसालाए, वग्घा, अवरज्झइ

**५ पर्यावरणसंबंधी स्वमत सांगा.**

**६ खालील मराठी शब्दांसाठी पाठातून प्राकृत शब्द शोधा.**

| | |
|---|---|
| पिता = | |
| पर्यावरण = | |
| लुप्तप्राय = | |
| वाघ = | |
| पशुपक्षी = | |

❋❋❋

# ७. मअण-मरणं

१९ व्या शतकातील जैनमुनी विजयकस्तूरसूरी यांनी जैनधर्माचे आचार, सिद्धांत आणि व्यवहार सामान्य लोकांना समजावून सांगण्यासाठी अत्यंत सरळ व सोप्या महाराष्ट्री प्राकृत भाषेत अनेक उपदेशात्मक लोककथा लिहिल्या. या कथांचा संग्रह 'पाइअ-विण्णाण-कहा' या नावाने दोन भागांमध्ये प्रसिद्ध झालेला आहे. त्यातील 'मदनाचे मरण' ही लोककथा निवडली आहे.

एका नगरात एक कुंभार होता. त्याची पत्नी भद्रा. भद्रा व महाराणी यांची मैत्री होती. भद्रेजवळ एक गाढवीण होती. कालांतराने गाढवीने श्वेतवर्णाच्या शिंगरुला जन्म दिला. तिने त्याचे नाव मदन ठेवले. त्याच्यावर भद्रेचे पुत्राप्रमाणे प्रेम होते.

एकदा महाराणीची दासी भद्रेचे क्षेम-कुशल विचारण्यास आली तेव्हा भद्रा अंगणात बसून गळा काढून रडत होती कारण त्याच दिवशी 'मदन' मृत्यू पावला होता. तिला बघून कुंभारही रडू लागला. दुरूनच ते पाहून दासीला वाटले भद्रेच्या घरी कोणाचातरी मृत्यू झालेला आहे. दासी शीघ्रतेने गेली व महाराणीला सांगितले. ऐकताच राणीही भद्रेच्या घरी आली व तिच्या शेजारी बसून रडू लागली. हळू-हळू ही बातमी संपूर्ण नगरात पसरली. राजा, प्रधान, मंत्री, सेनापती, कोतवाल, नगरश्रेष्ठी अनेक नागरिक तेथे गेले व रडू लागले. एका वाटसरूने हे पाहिले व विचारणा केली असता कळले, की खरी हकीकत कोणालाच माहीत नव्हती.

शेवटी राणीने भद्रेला विचारले असता असे कळले, की मदनाचा मृत्यू झाला म्हणून ती रडत होती. यावरून असे लक्षात येते, की कोणतीही घटना किंवा वार्ता पूर्णपणे कळली नसेल तर त्याची संपूर्ण सत्यता पडताळून पाहाणे आवश्यक आहे अन्यथा अंधानुकरण मूर्खपणाचे ठरते. हा बोध या कथेतून प्राप्त होतो.

कम्मि वि णयरे कुंभारस्स भज्जाए सह णरिंदरण्णीए सहित्तणं अहेसि। कुंभआरभज्जाए एगा गद्दही अईव वल्लहा आसि। गद्दहीए पुत्तो जायइ, किंतु सो जायमेत्तो मरइ। तेण कुंभआरभज्जा सएव झूरेइ। एअया तीए गद्दहीए, पुत्तो संजाओ। सो अईव सेअरूवो अत्थि। तीए तस्सुवरिं बहू णेहो अत्थि, तओ तस्स णामं मअणु त्ति दिण्णं। सा मअणं सम्मं पालेइ, एगंमि वासे जाए समाणे सो वि मअणो मच्चुं पत्तो। तआ सा कुंभआरी अईव रोवइ। तीए रोवमाणीए तप्परिवारो वि रोवेइ। तंमि काले णरिंदभज्जा किंपि कारणत्थं कुंभआरी-गेहे दासिं पेसेइ। सा दासी तत्थ आगया सपरिवारं च कुंभआरिं रुवंतिं दट्ठूण चिंतेइ – 'णूणं इमीए गेहे कोवि मओ, तेण सव्वे रुवंति'।

तया सा दासी सिग्घं तत्तो णिस्सरिअ रण्णिं कहेइ– 'तीए गिहे को वि मरिओ।' तं सुणिऊण सदासी रण्णी कुंभआरीए गेहे गंतूण, रुवंतीए तीए समीवे उवविसिऊण सा रोविउं लग्गा, णरिंदो वि तत्थ महिसीए गमणं सुणिऊण, सो सप्पहाणो तत्थ गओ, पच्छा सेणावई, कोट्टवालो, णअरसेट्ठी, पउरजणा वि गंतूण रोविउं लग्गा। को एत्थ मउ त्ति' केवि ण पुच्छंति, सव्वे रुवमाणा संति।

तइआ तत्थ एको वइएसिओ आगओ, सो अण्णं पउरजणं पुच्छइ – 'को एत्थ मओ'? सो कहेइ – 'अहं मित्तस्स पच्छा आगओ, तेण मम मित्तो जाणेइ।' सो मित्तं पुच्छइ, सो अण्णं दंसेइ, एवं कमेण एएण पउरजणेणुत्तं – 'अहं णअरसेट्ठिणो पच्छा आगओ' णअरसेट्ठी कोट्टवालं, कोट्टवालो सेणावइं, सेणावई पहाणं दंसेइ। पहाणो वि कहेइ – 'णरिंदस्स पच्छा अहं आगओ'। पहाणो णरिंदं पुच्छइ – 'एत्थ को मच्चुं पाविओ'। णरिंदो कहेइ – 'अहं ण जाणामि जओ अहं महिसीए पच्छा आगओ'।



णरिंदो महिसिं पुच्छइ– 'को एत्थ मओ'। सा वएइ– 'अहं ण जाणामि, किंतु दासी जाणेइ'। तया रण्णी दासिं पुच्छइ – 'को एत्थ मच्चुं पाविओ?' दासी कहेइ– अहं ण जाणामि, परंतु तव सहिं कुंभारिं रुवंतिं दट्ठूण मए उत्तं– 'तव सहीए गेहे को वि मओ'। तया महिसी कुंभआरिं णियसहिं पुच्छइ – 'को तव गेहे अज्ज मओ? सा बोल्लेइ– ''अज्ज मम गद्दहीपुत्तो मअणो णाम बालगद्दहो मओ, बालगद्दहो एसो मम अइवल्लहो आसि, तेणाहं रोवेमि'' एवं मअणस्स मरणं परमत्थं अणच्चा गआणुगइआ सव्वे आगआ समाणा हसणीआ संजाया।

तओ लोगुत्तमे धम्मे सद्धम्मं सम्मं जाणिऊण पयट्टिअव्वं, ण गयाणुगइयत्तणेण।

## सद्दत्था

**भज्जाए** – पत्नीच्या

**सहित्तणं** – मैत्री

**गद्दही** – गर्दभी, गाढवी

**जायमेत्तो** – जन्मत:च

**सेअरूवो**– श्वेत, पांढऱ्या रंगाचा

**मअणो** – मदन (मदन म्हणजे कामदेव, सौंदर्याचे प्रतीक)

**मच्चुं पत्तो** – मृत्यु पावला

**तत्तो णिस्सरिअ** – तेथून निघून

**णरिंदरण्णीए** – राजाच्या राणीचे

**अहेसि** – होते

**सएव** – सदैव

**झूरेइ** – दु:खाने क्षीण होणे

**णेह** – स्नेह

**एगंमि वासे जाए समाणे** – एक वर्षाचा झाल्यावर

**णूणं** – नक्कीच

**सुणिऊण**– ऐकून

**गंतूण** – जाऊन

**महिसीए–** महाराणीचे

**कोट्टवाल** – नगररक्षक

**मउ / मओ** – मरण पावला

**पच्छा** – पश्चात, मागून

**पउरजणेणुत्तं** – पउर + जणेण + उत्तं – नागरिकाने सांगितले

**बालगद्दहो** – छोटे गाढव, शिंगरू

**अणच्चा** – न समजल्याने

**हसणीआ** – हास्यास्पद

**रुवंतीए** – रडत असणाऱ्या

**सप्पहाणो–** प्रधानाबरोबर

**रोविउं** – रडू

**वइएसिओ** – यात्रेकरू, विदेशी

**अण्णं दंसेइ–** दुसऱ्याला दाखविले

**णरिंदस्स** – राजाच्या

**अइवल्लहो** – अत्यंत प्रिय

**गआणुगइआ** – गतानुगतिक, विचार न करता अनुसरणे

## सज्झाओ

**१ रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) भद्रा कुंभारिणीची मैत्रीण ........

२) भद्रा कुंभारिणीच्या गाढवाचे नाव ........

**२ पुढील शब्द वापरून प्राकृतात वाक्य तयार करा.**

१) पउर–जणा २) परमत्थ ३) सेअ

**३ रूपे ओळखा.**

| | |
|---|---|
| दट्ठूण | |
| रोवइ | |
| महिसीए | |
| पुत्तो | |
| हसिउं | |

**४ थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) अविचारी दासीने राणीस काय सांगितले ?

२) कोणतेही कार्य विचारपूर्वक करावे असे का म्हटले आहे ?

**५ वर्णविषयक बदल स्पष्ट करा.**

| | |
|---|---|
| मओ | |
| पहाण | |
| मअण | |
| पियसही | |
| अईव | |

❋❋❋

# १. पाइअ-कव्वं

प्राकृत काव्याची महती काय वर्णावी? त्याची महती सांगणारी सुभाषिते, गाथासप्तशती, गउडवहो, वज्जालग्गं इत्यादी महाराष्ट्री प्राकृत ग्रंथांमधून निवडून या पाठात एकत्र करण्यात आलेली आहेत. प्राकृत पद्य सरळ, सुलभ, वृत्तबद्ध आणि मधुर आहे, असे विद्वानांनी प्राकृत काव्याचे गुणगान केले आहे.

पाइअकव्वस्स णमो, पाइअकव्वं च णिम्मिअं जेण।
ताहं चिअ पणमामो, पढिऊण य जे वि याणंति।।१।।

देसिय-सद्द-पलोट्टं, महुरक्खर-छंदसंठिअं ललियं।
फुड-वियड-पायडत्थं, पाइअकव्वं पढेअव्वं।।२।।

पाइअकव्वम्मि रसो जो जायइ तह व छेयभणिएहिं।
उवअस्स व वासियसीअलस्स तित्तिं ण वच्चामो।।३।।

णवमत्थ-दंसणं संणिवेस-सिसिराओ बंधरिद्धीओ।
अविरलमिणमो आ-भुवण-बन्धमिह णवर पअअम्मि।।४।।

सअलाओ इमं या विसंति एत्तो अ णेंति वाआओ।
एंति समुद्दं च्चिअ णेंति साअराओ च्चिय जलाइं।।५।।

गूढत्थ-देसि-सहिअं सुललिय-वण्णेहिं विरइअं रम्मं।
पाइअ-कव्वं लोए कस्स ण हियअं सुहावेइ।।६।।

पाइअ-भासा-रइआ मरहट्ठय-देसि-वण्णय-णिबद्धा।
सुद्धा सअल-कह च्चिअ तावस-जिण-सत्थ-वाहिल्ला।।७।।

अमिअं पाउअ-कव्वं पढिउं सोउं अ जे ण याणंति।
कामस्स तत्ततंतिं कुणंति ते कहं ण लज्जंति।।८।।

एमेअ मुद्ध जुअइ-मणोहरं पाअआए भासाए।
पविरल-देसि-सुलक्खं कहसु कहं दिव्व-माणुसिअं।।९।।

## सद्दत्था

**पाइअकव्वस्स** – प्राकृत काव्याचे

**सद्द** – शब्द

**महुरक्खर** – महुर + अक्खर - मधुर अक्षर

**ललियं** – सुंदर, आकर्षक

**वियड** – कठीण

**पढेअव्वं** – वाचावे

**जायइ** – उत्पन्न होणे

**उवअस्स व** – पाण्याप्रमाणे

**वासियसीअलस्स** – वासिय (ठेवलेले शिळे अन्न पदार्थ) आणि थंडगार अन्नाचे

**ण वच्चामो** – मिळत नाही (पोहोचत नाही)

**दंसण** – दर्शन, दृष्टी (सौंदर्य)

**सिसिराओ** – शिशिर ऋतूमध्ये

**अविरलमिणमो** – अविरलं + इणमो - हा पूर्णपणे

**आ–भुवण–बंधमिहं** – संपूर्ण विश्वाविषयीचे हे काव्यबंध किंवा रचना

**सअलाओ** – सकल, सर्व

**या** – ज्या

**एत्तो** – येथून

**वाआओ** – वाणी, बोलीभाषा

**समुद्दं** – समुद्रात

**साअराओ** – सागरातून

**गूढत्थ** – गूढ किंवा रहस्यमय अर्थ

**विरइअं** – रचलेले, रचना केलेले

**लोए** – जगात

**हिअअं** – हृदय

**मरहट्ठय** – महाराष्ट्री

**सुद्धा** – शुद्ध

**तावस** – तपस्वी साधू

**सत्थ** – तांडा, समूह

**याणंति** – जाणतात, समजतात

**पलोट्टं** – खूप, भरपूर

**छंदसंठिअं** – छंदात असलेले

**फुड** – स्पष्ट

**पायडत्थं** – स्पष्ट करण्यासाठी

**रसो** – रस, रुची

**छेयभणिएहिं** – चतुर किंवा विद्वानांनी स्पष्ट केलेले

**तित्तिं** – तृप्ती किंवा समाधान

**णवमत्थ** – नवीन अर्थ

**संणिवेस** – रचना (प्राकृतिक)

**बंधरिद्धीओ** – काव्यबंधाचे वैभव

**णवर** – केवळ, फक्त

**पअअम्मि** – प्राकृत भाषेत (प्रकृती म्हणजे निसर्गाप्रमाणे)

**इमं** – ह्या

**विसंति** – मिसळतात, प्रवेश करतात, भेटतात

**णेंति** – घेऊन जातात, नेतात, निघतात

**एंति** – येतात

**च्चिअ** – (अव्यय) निश्चयवाची

**जलाइं** – पाणी (अनेकवचन)

**देसि** – देशी शब्द

**वण्णेहिं** – अक्षरांमुळे

**रम्मं** – रम्य, मनोहर, सुंदर

**सुललिय** – अत्यंत सुंदर

**कस्स ण सुहावेइ** – कोणाला सुखाविणार नाही?

**वण्णय–णिबद्धा** – वर्णन केलेले आहे

**सअल–कह** – सकल कथा

**जिण** – तीर्थंकर

**वाहिल्ला** – व्याधिग्रस्त, रुग्ण

**एमेअ** – एम + एअ - अशी ही

**जुअइ** – युवती

**दिव्व** – देवतासंबंधी
**माणुसिअं** – मनुष्यसंबंधी
**पविरल** – विस्तृत, पसरलेली
**कहसु** – सांगा
**पाअआए भासाए** – प्राकृत भाषारूपी (युवती)
**मुद्‌धा** – भोळी भाबडी, निर्दोष
**मणोहरं** – सुंदर, आकर्षक
**सुलक्खं** – शुभ लक्षणांनी युक्त
**कहं** – कथा ('कहा' या शब्दाची द्‌वितीया विभक्ती)

## सज्झाओ

१ **अ) खालील शब्दांमधील अक्षरांच्या बदलाविषयीचे नियम सांगा.**

प्राकृत (पाइअ), काव्य (कव्व), प्रणम (पणम), अक्षर (अक्खर), शब्द (सद्द), अर्थ (अत्थ), सार्थ (सत्थ ), वर्णक (वण्णअ), मुग्ध (मुद्ध), सुलक्ष(ण) (सुलक्ख), दिव्य (दिव्व), हृदय (हिअअ), समुद्र (समुद्द).

**ब) पुढील शब्दांतील व्यंजनांचे बदल सांगा.**

विअड, सीअल, भासा, बाहि, सुह, साअर, वाआओ, कहा, तावस

**क) या पाठातील देशी, तद्‌भव व तत्सम शब्दांची यादी करा.**

**ड) या पाठाच्या आधारे 'य-श्रुति'चा नियम स्पष्ट करा.**

**इ) 'प्राकृतभाषा' या विषयावर माध्यम भाषेत १० ओळींचा निबंध लिहा.**

२ **पुढील पद्य पूर्ण करा.**

१. देसिय-सद्‌द ................................................................ ।
................................................................ पढेअव्वं ।

२. गूढत्थ-देसि ................................................................ ।
................................................................ हिअअं सुहावेइ ।

३. अमिअं पाउअ-कव्वं .......................................... ................. ।
................................................................ ण लज्जंति ।।

❋❋❋

# २. कयग्घो माणुसो

सुमारे आठव्या शतकात एका अज्ञात कविने 'मणिपतिचरियं' हे प्राकृत काव्य रचले. 'एका जैन मुनीवर चोरीचा खोटा आळ घेतला गेला' या विषयवस्तूला अनुसरून या १६ कथा प्रश्नोत्तराच्या स्वरूपात आढळतात. या काव्यसंग्रहाचे प्राकृत, संस्कृत आणि गुजराथी भाषेत अनेक पाठभेद उपलब्ध आहेत.

प्रस्तुत काव्यात पशू हा मानवापेक्षा कसा वेगळा आहे, हे पटवून दिले आहे. कुत्र्यासारखे प्राणी स्वामिनिष्ठ असतात. याचा प्रत्यय सर्वांनाच येतो. या पाठात एक वानरी आपले वचन निष्ठेने पाळते व आपल्या शरणार्थीचा जीव वाचवते; परंतु मनुष्य मात्र आपला जीव वाचविणाऱ्या वानरीचा विश्वासघात करतो. सुदैवाने वानरीचे जीवन सुरक्षित राहते.

मनुष्य स्वार्थी प्रवृत्तीचा असतो. तो उपकारकर्त्याच्या बाबतीत कृतघ्नपणा दाखवितो. कृतज्ञते व कृतघ्नतेवर आधारित क्रमशः गुण व अवगुणांचे मार्मिक स्वभाव चित्रण या कथेत आलेले आहे. जंगलात लाकूड गोळा करणारा पुरुष व वानरी यांच्या प्राकृत भाषेतील समजण्यास अत्यंत सोपा वाचकांसाठी संतोषप्रद आहे.

एओ वट्टइ पुरिसो, कट्ठ-णिमित्तं तु सो गओ अडविं।
तेण य दिट्ठो सीहो, तस्स भएणं दुमे चडिओ।।१।।

तुंगे तम्मि दुमम्मि, अहिरूढं वाणरिं विलोइत्ता।
भअ-पेरंतय-गत्तो, चिंतइ 'उभयंतरे पडिओ।।२।।

सो एस वग्घदुत्तडिणाओ जाओ महं' तओ भणिओ।
वाणरियाए, 'पुत्तअ, मा भीअसु, मा अ कंपेसु।।३।।

संजाओ वीसत्थो, सीहो चिट्ठेइ रुक्ख-मूलम्मि।
जाआ रअणी, तत्तो णिद्दायइ वणयरो सो अ।।४।।

भणिओ अ वाणरीए, 'मह उच्छंगे सिरं करेऊणं।
सुवसु' इमं तेण कअं, सीहो तं वाणरिं भणइ।।५।।

'गाढं छुहाउलो हं, मुयसु इमं माणुसं अहं तुज्झ।
होहामि य वरमित्तं, कयावि तुह उवअरिस्सामि।।६।।

किं तुह एयस्स, दुट्ठ-माणुसस्स रक्खाइ हय-कयग्घस्सं।
भणिअं च वाणरीए, 'णाहं सरणागअं देमि'।।७।।

पडिलोमाणि बहूणि, भणिऊण ठिओ हरी वि णिव्विण्णो।
पडिबुद्धो य वणयरो जंपइ 'अंबे, तुमं सुयसु'।।८।।

तस्सुच्छंगे काउं, सा सिरं वाणरी वि अ पसुत्ता।
सीहो जंपइ, 'माणुस, मम एयं वाणरिं देहिं।।९।।



भक्खित्ता अहमेअं वच्चिहामि तवावि होइ पहो'।
मणुएणं अक्खित्ता कडीओ वाणरी तेण।।१०।।

सा डालाए लग्गा छेअत्तणओ तओ भणइ सा उ।
'धी, धी, माणुस-भावस्स तुज्झ माणुस-कअग्घस्स'।।११।।

तेण पहेण महंतो सत्थो चलिओ तस्स सद्देणं।
तत्तो अ अइक्कंतो हरी, गओ वणअरो गेहे।।१२।।

**(मणिपतिचरियं, गा. ११४४ ते ११५५)**

## सद्दत्था

**कयग्घो माणुसो** – कृतघ्न माणूस
**कट्ठ–णिमित्तं** – लाकूड आणण्यासाठी
**दिट्ठो** – पाहिला
**तुंगे** – अत्यंत उंच
**विलोइत्ता** – बघून
**उभअंतरे** – दोघांच्यामध्ये
**वग्घ–दुत्तडि–णाओ** – इकडे वाघ तिकडे दुथडी भरलेली नदी, द्विधा अवस्था
**वीसत्थो** – विश्वस्त, निश्चिंत
**रअणी** – रजनी, रात्र
**उच्छंगे** – मांडीवर
**छुहाउलो** – भुकेने व्याकूळ
**होहामि** – होईन
**उवअरिस्सामि** – उपकार फेडेन
**णाहं** – ण + अहं – मी नाही
**पडिलोमाणि** – प्रतिकूल
**णिव्विण्णो** – दुःखी
**जंपइ** – म्हणाला
**पसुत्ता** – गाढ झोपली
**भक्खित्ता** – खाऊन
**अक्खित्ता** – ढकलून दिली
**डालाए** – फांदीला
**छेअत्तणओ** – हुशारीने
**भावस्स** – भावाचा (भावना)
**महंतो** – विशाल, खूप मोठा
**सद्देण** – आवाजाने
**वट्टइ** – होता
**अडविं** – जंगलात
**दुमे** – झाडावर
**अहिरूढं** – चढलेल्या
**भअ–पेरंतय–गत्तो** – थरथर कापणाऱ्या शरीराचा (भीतीने त्याचे शरीर थरथरू लागले)
**भणिओ वाणरियाए** – वानरी त्याला म्हणाली
**गेहे** – घरी
**चिट्ठेइ** – थांबला किंवा बसला होता
**णिद्दायइ** – झोप आली
**सुयसु** – झोप
**मुयसु** – सोड
**वरमित्तं** – चांगला किंवा उत्तम मित्र
**हअ–कयग्घस्स** – दुष्ट व कृतघ्न माणसाचे
**सरणागअं** – सरण + आगअं – शरण आलेला
**हरी** – सिंह
**पडिबुद्धो** – जागा झाला
**अंबे** – माते
**देहि** – दे
**वच्चिहामि** – निघून जाईन
**कडीओ** – कडेवरून
**लग्गा** – बिलगली, धरली
**धी धी** – धिक्कार असो
**पहेण** – मार्गाने
**सत्थो** – (यात्रेकरूंचा) समूह
**अइक्कंतो** – निघून गेला

## सज्झाओ

**१ रिकाम्या जागा भरा.**

१) अरण्णम्मि गओ पुरिसो ........ चडिओ।
२) भीओ पुरिसो वाणरीए भणिओ ........, .........., .........।
३) सीहेण वाणरिआ विण्णविआ ........।

## २ निर्देशाप्रमाणे कृती करा.

१) मनुष्याच्या दुष्ट आचरणाचे निवेदन करा.

२) ‘कयग्घो माणुसो’ या कथेतील बोध स्पष्ट करा.

## ३ प्राकृत प्रतिशब्द द्या.

| | | |
|---|---|---|
| १) अडवि | – | |
| २) दुम | – | |
| ३) हरी | – | |

## ४ वर्ण विषयक बदलाचे नियम सांगा.

रुक्ख, छुहा, सद्द, रअणी, दुट्ठ

## ५ रूपे ओळखा.

| | |
|---|---|
| होमि | |
| जंपइ | |
| उवयरिस्सामि | |
| मुयसु | |
| तस्स | |
| गेहे | |
| वाणरीए | |

## ६ कंसातील योग्य रूप वापरून वाक्य पुन्हा लिहा.

१) अंबे तुमं ........। (सुयसु, सुवामि, सुत्तो)

२) भक्खित्ता अहं ........। (वच्चइ, वच्चामि, वच्चिहामि)

३) ण अहं सरणागअं ........। (देह, दामि, देमि)

४) सीहो तस्स भएणं दुमे ........। (चडामि, चडसि, चडिओ)

५) ........ तुज्झ वरमित्तं होहामि। (अम्हे, तेण, अहं)

❊❊❊

# ३. सिसुवाल - कहा

शिशुपाल हा कृष्णाचा आतेभाऊ होता. त्याला जन्मतःच चार हात होते. त्याला बघून त्याची आई काळजीत पडली. प्राकृत साहित्यात तिचे नाव माद्री असे येते. ह्याबाबत तिने ज्योतिषाला विचारले. तो म्हणाला, 'ज्याला पाहिल्यावर याचे चारपैकी दोन हात गळून पडतील, त्याच्याकडून याला धोका आहे.' श्रीकृष्णाने त्याला पाहिल्यानंतर शिशुपालाचे चारपैकी दोन हात गळून पडले. माद्रीने श्रीकृष्णाला केलेली विनंती, श्रीकृष्णाने त्याच्या १०० अपराधांबद्दल केलेली क्षमा व अखेरीस सुदर्शनचक्राने केलेला शिरच्छेद, हा सर्व वृत्तांत या पाठात आला आहे.



वसुदेव-सुसाए सुओ, दमघोस-णराहिवेण मद्दीए।
जाओ चउब्भुओऽब्भुअ-बल-कलिओ कलह-पत्तट्ठो।।१।।

दट्ठूण तओ जणणी, चउब्भुअं पुत्तमब्भुअमणग्घं।
भअ-हरिस-विम्हय-मुही, पुच्छइ णेमित्तिअं सहसा।।२।।

णेमित्तिएण मुणिऊण, साहिअं तीए हिट्ठ-हिअआए।
जह एस तुब्भ पुत्तो, महा-बलो दुज्जओ समरे।।३।।

एयस्स अ जं दट्ठूण, होइ साहाविअं भुआ-जुयलं।
होही तओ चिय भअं, सुअस्स ते णत्थि संदेहो।।४।।

सा वि भअ-वेविरंगी, पुत्तं दंसेइ जाव कण्हस्स।
ताव च्चिय तस्स ठिअं, पयइत्थं वर-भुआ-जुयलं।।५।।

तो कण्हस्स पिउच्छा, पुत्तं पाडेइ पाअ-पीढम्मि।
अवराह-खामणत्थं, सो वि सअं से खमिस्सामि।।६।।

सिसुवालो वि हु जुव्वण-मएण णारायणं असब्भेहिं।
वअणेहिं भणेइ सा वि हु, खमइ खमाए समत्थो वि।।७।।

अवराह-सए पुण्णे, वारिज्जंतो ण चिट्ठई जाहे।
कण्हेण तओ छिण्णं, चक्केणं उत्तमंगं से।।८।।

---

## सद्दत्था

**सुसाए –** बहिणीला

**मद्दीए –** वसुदेवाची बहीण, माद्री हिला ( ही माद्री, नकुल, सहदेव या पांडवांची आई माद्री, हिच्यापेक्षा वेगळी आहे)

**अब्भुअबलकलिओ –** अचाट सामर्थ्याने युक्त

**पुत्तमब्भुअमणग्घं –** पुत्तं + अब्भुअं + अणग्घं - अद्भूत, अत्यंत कौतुकाचा महामोलाचा पुत्र

**हिट्ठ –** आनंदित

**होही –** (भ.का.) होईल

**पयइत्थं –** स्वाभाविक

**कण्हस्स –** कृष्णाची

**पाअपीढम्मि –** पाय ठेवण्याच्या चौरंगावर

**सो वि सअं से खमिस्सामि –** तो (कृष्ण) म्हणाला याला शंभर अपराधांबद्दल मी क्षमा करीन

**वि हु –** (अ.) जरी खरोखरच

**णारायणं –** कृष्णाला

**वारिज्जंतो –** अडवून किंवा मनाई करून सुद्धा

**दमघोसणराहिवेण –** दमघोष राजाने

**चउब्भुओ –** चार बाहूंनी युक्त, चार हात असलेला

**कलहपत्तट्ठो –** भांडखोर

**भअहरिसविम्हयमुही –** वि. भीती, आनंद व विस्मययुक्त मुख असलेली

**अणग्घं –** मौल्यवान (येथे, मोठ्या कौतुकाचा)

**णेमित्तिअं –** लक्षण शास्त्र जाणणाऱ्याला

**भुआजुयलं –** बाहूंची जोडी, दोन हात

**भअवेविरंगी –** भयाने जिचे शरीर थरथर कापत आहे अशी

**पिउच्छा –** आत्या

**अवराहखामणत्थं –** अपराधांच्या क्षमेसाठी

**जुव्वणमएण –** तारुण्याच्या मस्तीने

**अवराहसए पुण्णे –** (सति सप्तमीची रचना), शंभर अपराध पूर्ण झाल्यावर

**उत्तमंगं –** मस्तकाला

**ण चिट्ठई जाहे –** जेंव्हा (अपराध करण्याचा) थांबला नाही तेंव्हा

## सज्झाओ

१ **या पद्यातील शिशुपालकथा आपल्या शब्दात लिहा.**

२ **जोड्या लावा.**

| | 'अ' गट | | 'आ' गट |
|---|---|---|---|
| १) | द्वितीया | अ) | मुणिऊण, दट्ठूण |
| २) | तृतीया | आ) | णेमित्तिअं, णारायणं |
| ३) | पंचमी | इ) | पाअपीढम्मि |
| ४) | षष्ठी | ई) | ठिअं, छिण्णं |
| ५) | सप्तमी | उ) | एयस्स, कण्हस्स |
| ६) | कर्म. भू.धा.वि. | ऊ) | तओ |
| ७) | पू.का.धा.अ. | ऋ) | हिट्ठहिअआए, जुव्वणमएणं, वअणेहिं |

३ **पुढील प्राकृत शब्दांचे मराठीत अर्थ लिहा.**

१) चउब्भुओ २) जुव्वण ३) पिउच्छा ४) कलहपत्तट्ठो ५) उत्तमंग

४

पुत्रप्राप्तीनंतर माद्रीची झालेली अवस्था
- भयभीत
- ______
- ______
- ______

५ **प्राकृतात समानार्थी शब्द लिहा.**

१) सुओ – ______

२) विम्हय – ______

३) हरिस – ______

४) जणणी – ______

६ **पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१) पुत्त x ______

२) सुही x ______

३) कम्म x ______

४) सच्च x ______

५) धम्म x ______

७ **पुढील गाथेचा माध्यमभाषेत अर्थ सांगून, गाथेतील कल्पना कथेच्या संदर्भात स्पष्ट करा.**

पासपरिसंठिओ वि हु गुणहीणे किं करेइ गुणवतो।

जायंधयस्स दीवो हत्थकओ णिप्फलो च्चेय।।

(पासपरिसंठिओ – जवळ असलेला, जायंधय – जन्मान्ध, गुणवतो– गुणवान, हत्थकओ – हातात असलेला)

❋❋❋

# ४. सुहासिआइं

राजा सातवाहन हा हाल कवी या नावानेही ओळखला जातो. दुसरे किंवा तिसरे शतक हा त्याचा काळ मानला जातो. सातवाहन हे एका राजघराण्याचे नाव असून ते राजे प्रतिष्ठानात (सध्याचे पैठण) राज्य करीत होते. त्या राजांचा प्राकृत भाषांकडे फार ओढा होता. त्यांनी प्राकृत प्रसारासाठी प्रयत्न केले. ते अंत:पुरात प्राकृतमध्ये बोलत असे म्हणतात. हाल नावाच्या सातवाहन राजाने प्राकृतमधील सुभाषितरत्नांचा संग्रह केला आणि तोच सरस व वाचनीय काव्यसंग्रह 'गाथासप्तशती' या नावाने ओळखला जातो. या संग्रहात त्याने स्वतः रचलेल्या गाथाही आहेत. गाथासप्तशतीच्या प्रारंभी मंगलाचरणात त्याने सूर्याला नमस्कार केला आहे. त्यावरून तो सूर्योपासक होता असे वाटते. हेमचंद्र आणि मेरुतुंग यांनी हाल हा नागार्जुनाचा शिष्य होता असे म्हटले आहे.

'गाथासप्तशती' हे शृंगाररसप्रधान असे मुक्तक काव्य आहे. ग्रामवासियांच्या जीवनात हरघडीस घडणारे प्रसंग येथे चित्रित केले आहे. निसर्गचित्रण, लोकव्यवहार व शाश्वत मानवी भावनांचे गोड आविष्कार रंगविणाऱ्या गाथा विलोभनीय व आनंद देणाऱ्या आहेत. नीती व व्यवहार याविषयी अनेक अर्थपूर्ण व रेखीव सुभाषिते गाथासप्तशतीत मोत्याप्रमाणे विखुरलेली आहेत. हालाने प्राकृतमधील सर्वश्रेष्ठ कवींच्या उत्कृष्ट काव्यातून उत्तमोत्तम सातशे गाथा निवडून त्यांचा संग्रह केला आहे. त्या संग्रहाला पूर्वी गाथाकोश असे म्हणत असत. मूळ गाथाकोश हा सुमारे १००० गाथांचा संग्रह असावा व पुढे कमी होत होत ७०० गाथांचा संग्रह राहिला जो आज विद्यमान आहे. उपमा, रूपक इत्यादी अलंकारांनी नटलेल्या या गाथा महाराष्ट्री प्राकृतात आर्या छंदात रचलेल्या आहेत.

भारतीय सांस्कृतिक जीवनावर सुभाषितांचा फार प्रभाव आहे. मानवी वृत्ती, सांस्कृतिक मूल्ये यांचे वास्तव दर्शन एखाद्या उपमा दृष्टांताच्या माध्यमातून अत्यंत पारिणामिकरित्या सुभाषितांमध्ये चित्रित केलेले असते. त्यांच्या रचना सत्यवचनांवर आधारित असून अल्पाक्षरे असतात व त्यांचा अर्थ विशाल असतो. त्यांचा उपयोग वैश्विक पातळीवर होत असतो.

१) तुंगो च्चिअ होइ मणो मणंसिणो अंतिमासु वि दसासु।
अत्थमणम्मि वि रइणो किरणा उद्धं चिअ फुरंति।।

२) फलसंपत्तीअ समोणआइँ तुंगाइँ फलविपत्तीए।
हिअआइ सुपुरिसाणं महातरूणं व सिहराइं।।

३) जाएज्ज वणुद्देसे कुज्जो वि हु णीसाहो झडिपत्तो।
मा माणुसम्मि लोए ताई रसिओ दरिद्दो अ।।

४) विण्णाणगुणमहग्घे पुरिसे वेसत्तणं पि रमणिज्जं।
जणणिंदिए उण जणे पिअत्तणेणावि लज्जामो।।

५) छज्जइ पहुस्स ललिअं, पिआइ माणो, खमा समत्थस्स।
जाणंतस्स अ भणिअं, मोणं च अआणमाणस्स।।

६) सुअणो ण कुप्पइ व्विअ, अह कुप्पइ विप्पिअं ण चिंतेइ।
अह चिंतेइ ण जंपइ, अह जंपइ लज्जिओ होइ।।

७) कीरंती व्विअ णासइ उअए रेह व्व खलअणे मेत्ती।
सा उण सुअणम्मि कआ अणहा पाहाणरेह व्व।।

८) अहिआअमाणिणो दुग्गअस्स छाहिं पअस्स रक्खंती।
णिअबंधवाणँ जूरइ घरिणी विहवेण एन्ताणं।।

९) णूमेंति जे पहुत्तं कुविअं दासा व्व जे पसाअंति।
ते व्विअ महिलाण पिआ, सेसा सामि व्विअ वराआ।।

१०) सो अत्थो जो हत्थे, तं मित्तं जं णिरंतरं वसणे।
तं रूअं जत्थ गुणा, तं विण्णाणं जहिं धम्मो।।

---

## सद्दत्था

**च्चिअ** – निश्चय सांगणारे अव्यय
**अत्थमणम्मि** – अस्त होत असतांना, नाश होत असतांना
**फुरंति** – स्फुरण पावतात, प्रकाशित होतात, प्रकट होतात
**हिअआइ** – हृदये
**णीसाहो** – फांद्या नसलेले
**झडिपत्तो** – पानगळ झालेला
**रसिओ** – रसिक, चांगल्या गोष्टींची आवड असणारा
**विण्णाणं** – विशेष ज्ञान
**पिअत्तणेण** – प्रेमभाव असल्याने, प्रेमळपणामुळे
**अआणमाणस्स** – न जाणणाऱ्याचे
**विप्पिअं** – वाईट, अप्रिय
**कीरंती** – करतांना
**खलअणे** – दुष्ट व्यक्तीबरोबर
**पाहाणरेहा** – दगडावरील रेघ
**दुग्गअ** – गरीब
**छाहिं** – छाया, तेज, सावली (इथे ‘तेज’)
**णूमेंति** – लपवितात
**पसाअंति** – प्रसन्न करतात
**वसणे** – संकटामध्ये
**मणंसिणो** – मोठे मन असणारा
**रइणो** – रवीचे, सूर्याचे
**समोणआइँ** – नम्र होतात
**सिहराइं** – शिखरे
**ताई** – त्यागी
**कुज्जो** – छोटा, खुजा
**महग्घे** – मौल्यवान, महनीय
**वेसत्तणं** – वैर, द्वेष
**छज्जइ** – शोभते, शोभून दिसते
**कुप्पइ** – रागवतो
**जंपिअं** – बोललेले
**उअए** – पाण्यामध्ये
**अणहा** – (दे.) अक्षत, स्थिर, न पुसली जाणारी
**अहिआअमाणिणो** – उच्च कुलाचा अभिमान असणाऱ्याच्या
**जूरइ** – खिन्न होते/होतो
**पहुत्तं** – मालकीहक्क, स्वामित्व
**अत्थो** – धन
**रूअं** – रूप

## सज्झाओ

### १ थोडक्यात उत्तरे लिहा.

१) सज्जनांच्या आणि दुर्जनांच्या मैत्रीमधील फरक सांगा.

२) दारिद्र्याच्या दुःखाचे वर्णन करा.

३) सज्जनांच्या गुणांचे वर्णन करा.

४) सेसा सामि व्विअ वराआ' - हे विधान स्पष्ट करा.

५) अर्थ, मित्र, रूप आणि विज्ञान यांचे स्वरूप स्पष्ट करा.

### २ खालील कृती करा.

१) पाठात आलेल्या क्रियापदांची सूची द्या.

२) पाठात आलेल्या नामे व सर्वनामांची यादी करा.

**३) खालील मराठी शब्दांसाठी या पाठातून प्रतिशब्द शोधा.**

सूर्य, अवस्था, स्फुरणे, हृदय, शिखर, फांदीरहित, झडलेले, विशेषज्ञान, प्रेमळपणा, शोभणे, क्षमा, सज्जन.

**४) खालील प्राकृत शब्दांचा माध्यम भाषेत अर्थ लिहा.**

तुंग, अत्थमण, फलसंपत्ती, रमणिज्ज, समत्थ, जाणंत, अआणमाण, लज्जिअ, अणहा, पाहाणरेहा.

५) मराठीमध्ये वापरात असलेले दहा देशी शब्द लिहा.

### ३ पुढील गाथा पूर्ण करून शुद्ध लिहा.

१) फलसंपत्तीअ ............................................................ ।
............................................................ व सिहराइं ।।

२) कीरंती ............................................................ ।
............................................................ व्व ।।

३) सो अत्थो ............................................................ ।
............................................................ जहिं धम्मो ।।

४) छज्जइ ............................................................ ।
............................................................ अआणमाणस्स ।।

५) जाएज्ज ............................................................ ।
............................................................ दरिद्दो अ ।।

❋❋❋

# ५. सुकम्म-पुप्फ-सुवासो

वज्जालग्गं हा एक महाराष्ट्री प्राकृत भाषेतील काव्यसंग्रह या सदरात मोडणारा महत्त्वाचा ग्रंथ आहे. यातील अनेक शब्द अर्वाचीन मराठीशी अगदी मिळतेजुळते आहेत. गाथासप्तशतीप्रमाणे 'वज्जालग्गं' ग्रंथातील प्रत्येक गाथा स्वतंत्र व परिपूर्ण असल्यामुळे हे मुक्तक काव्य या संज्ञेला पात्र आहे. 'वज्जालग्गं' ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील गाथांचे विषयाला अनुसरून केलेले वर्गीकरण हे होय. हा सुभाषित संग्रहांचा समूह असून यामध्ये सज्जन-प्रशंसा, दुर्जन-निंदा, दान, शील, तप इ. ७०० विषयांमध्ये गाथांचे वर्गीकरण केले आहे. १३ व्या शतकात होऊन गेलेले जैन संप्रदायातील जयवल्लभ हे या ग्रंथाचे कर्ता आहेत. **वज्जा** म्हणजे पद्धती व **लग्गं** म्हणजे लग्न किंवा जोड अर्थात् विविध काव्य पद्धतींचा समूह असे याचे स्वरूप आहे. व्यक्तीमध्ये कोणते अवगुण नसावेत व त्याने कोणते गुण ग्रहण करावेत या संबंधीच्या 'वज्जालग्गं'मधील अत्यंत बोधप्रद निवडक गाथा येथे देत आहोत.

तं णत्थि घरं तं णत्थि देउलं राउलं पि तं णत्थि।
जत्थ अकारणकुविया दो तिण्णि खला ण दीसंति।।१।।

लवणसमो णत्थि रसो विण्णाणसमो अ बंधवो णत्थि।
धम्मसमो णत्थि णिही कोहसमो वेरिओ णत्थि।।२।।

मा होसु सुअग्गाही मा पत्तिय जं ण दिट्ठं पच्चक्खं।
पच्चक्खे वि अ दिट्ठे जुत्ताजुत्ते विआरेह।।३।।

कह वि तुलग्गावडिअं महुपडलं चक्खिऊण मा खिज्जं।
हियइच्छियाइ कत्तो अणुदिअहं करह लब्भंति।।४।।

वच्चिहिसि तुमं पाविहिसि सरवर-रायहंस किं चोज्जं।
माणससरसारिक्खं पुहवि भमंतो ण पाविहिसि।।५।।

ता रूवं ताव गुणा लज्जा सच्च कुलक्कमो ताव।
ताव च्चिअ अहिमाणो देहि त्ति भण्णए जाव।।६।।

विंझेण विणा वि गआ णरवइभवणेसु गोरविज्जंति।
विंझो ण होइ अगओ गएहि बहुएहि वि गएहिं।।७।।

बेण्णि वि रण्णुप्पण्णा बज्झंति गआ ण चेव केसरिणी।
संभाविज्जइ मरणं ण गंजणं धीरपुरिसाणं।।८।।

डहिऊण णिरवसेसं ससावयं सुक्खरुक्खमारूढो।
किं सेसं ति दवग्गी पुणो वि रण्णं पलोएइ।।९।।

गुणहीणा जे पुरिसा कुलेण गव्वं वहंति ते मूढा।
वंसुप्पण्णो वि धणू गुणरहिए णत्थि टंकारो।।१०।।

पक्खाणिलेण पहुणो विरमउ मुच्छ त्ति पासपडिएण।
गिद्धंतकड्ढणं दूसहं पि साहिज्जइ भडेण।।११।।

गाढासणस्स कस्स वि उयरे णिहयस्स मंडलग्गेण।
जद्धं महीइ पडिअं तुरंगपिट्ठिट्ठिअं अद्धं।।१२।।

उदअं भुवणक्कमणं अत्थमणं एक्कदिवसमज्झम्मि।
सूरस्स वि तिण्णि दसा का गणणा इअरलोअस्स।।१३।।

भग्गं पुणो घडिज्जइ कणयं कंकणं य णेउरं णवरं।
पुण भग्गं ण घडिज्जइ पेम्मं मुत्ताहलं जच्चं।।१४।।

## सद्दत्था

**कुविया** – चिडलेले
**विण्णाणसमो** – विज्ञानसमान
**वेरिओ** – शत्रू, वैरी
**पत्तिय** – विश्वास ठेव
**जुत्ताजुत्ते** – योग्य-अयोग्य
**तुलग्गावडिअं** – योगायोगाने जुळून आलेली
**हियइच्छियाइ** – मनात इच्छिलेले
**पाविहिसि** – प्राप्त करशील
**पुहवि** – पृथ्वी
**ताव** – तोपर्यंत
**जाव** – जोपर्यंत
**गोरविज्जंति** – गौरविले जातात
**बज्झंति** – बांधले जातात/मारले जातात
**डहिऊण** – जाळून
**सुक्खरुक्ख** – सुकलेले झाड
**वंसुप्पण्णो** – वेळूपासून किंवा बांबूपासून बनविलेले, चांगल्या वंशात जन्मलेला
**पक्खाणिल** – पंखाचा वारा
**दीसंति** – दिसतात
**कोहसमो** – क्रोधासमान
**सुयग्गाही** – ऐकलेले खरे मानणारा
**पच्चक्खं** – प्रत्यक्ष
**विआरेह** – विचार करा
**चक्खिऊण** – चाखून
**वच्चिहिसि** – जाशील
**चोज्जं** – (दे.) आश्चर्य, नवल
**भमंतो** – भ्रमण करताना
**भण्णए** – म्हटले आहे
**विंझेण विणा** – विंध्यपर्वताशिवाय
**अगओ** – गजरहित
**गंजणं** – अपमान, कलंक
**ससावयं** – श्वापदासह
**पलोएइ** – पाहतो
**गुणरहिए** – गुणरहित, प्रत्यंचारहित
**विरमउ** – थांबू दे, संपू दे

**मुच्छ** – मूर्च्छा/बेशुद्धी
**गिद्धंतकड्ढणं** – गिधाड आतडी ओढून काढते (ते दुःख)
**अत्थमणं** – सूर्यास्त
**कणयं** – सोन्याचे
**पासपडिएण** – जवळ असलेले
**साहिज्जइ** – सांगितले जाईल
**घडिज्जइ** – घडविले जाते
**मुत्ताहल** – मोती

## सज्झाओ

**१ पाइय–भासाए उत्तरं देह / पुढील प्रश्नांची प्राकृतात उत्तरे लिहा.**

१) खला कुत्थ दीसंति?

२) गुणहीणा किं करंति?

३) सूरस्स तहा इअरलोअस्स का दसा?

**२ थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) क्रोधामुळे होणाऱ्या नुकसानाचे वर्णन करा.

२) 'देहि त्ति' हे विधान स्पष्ट करा.

३) जीवनातील विविध प्रसंगांची सोन्याच्या दागिन्यांशी तुलना करा.

**३ क्रियापदतालिका पूर्ण करा.**

| अनु. | क्रियापद | पुरुष | वचन | काळ |
|---|---|---|---|---|
| १ | दीसंति | | | |
| २ | पाविहिसि | | | |
| ३ | गोरविज्जंति | | | |

**४ पुढील सुभाषिते पूर्ण करा.**

१) तं णत्थि ............................................................ ।
.................................................................... ण दीसंति ।।

२) ता रूवं ............................................................ ।
.................................................................... भण्णए जाव ।।

३) गुणहीणा जे ............................................................ ।
.................................................................... णत्थि टंकारो ।।

४) भग्गं पुणो ............................................................ ।
.................................................................... मुत्ताहलं जच्चं ।।

# ६. पुत्ताणं परिक्खा

'आख्यानकमणिकोशवृत्ती' हा कथासंग्रह आचार्य आम्रदेवसूरींनी इ.स. १०७२ ते इ.स. १०८३ च्या दरम्यान लिहिला आहे. हा ग्रंथ नेमिचंद्रसूरींच्या मूळ ५३ गाथांवर आधारित आहे. या कथासंग्रहात ४१ अधिकार व १४७ कथा आहेत. प्रत्येक कथा उदाहरणकथा आहे. या कथांच्या माध्यमातून नैतिक व धार्मिक मूल्यांची शिकवण अत्यंत परिणामकारक पद्धतीने पटवून दिलेली आहे. प्रस्तुत पाठात शेठजी आपल्या तिन्ही मुलांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे पद देतो. या दृष्टांताच्या आधारे प्रस्तुत कथेत मनुष्य आपल्या चांगल्या वाईट मनोवृत्तीप्रमाणे केलेल्या शुभाशुभ कर्मामुळे चांगला अथवा वाईट जन्म प्राप्त करतो. हे स्पष्ट करण्यासाठी ही कथा सांगितली आहे. नयसार व्यापारी आपल्या तीन मुलांना भांडवल देऊन परीक्षा घेतो. मुद्दल सुरक्षित ठेवणे म्हणजे मनुष्य जन्माचे रक्षण करणे, नफा कमावणे म्हणजे देवगती प्राप्त करणे व मुद्दल गमावणे म्हणजे नरकात किंवा पशुयोनीत जन्म घेणे हे या उदाहरण-कथेच्या आधारे पटवून दिले आहे.

णयरम्मि वसंतपुरे णायरजणाण गोरवट्ठाणं।
णिवसइ सुइववहरणो णयसारो णाम पुरसेट्ठी।।१।।

अह अण्णआ अ को किर कुडुंबपअसमुचिओ महं होही।
इय चिंताए तिण्हं पुत्ताण परिक्खणणिमित्तं।।२।।

णियसयणबंधुपमुहं णायरयजणं णिमंतिउं गेहे।
भोयाविऊण विहिणा तस्स (ताण) समक्खं भणइ सेट्ठी।।३।।

एएसिं मह सुयाण तिण्हं पि हु को कुडुंबपयजोगो।
तं चेव विसेसेणं जाणसि जोग्गो त्ति तेणुत्तं।।४।।

इय एवं ता तुम्हाणं समक्खमेए अहं परिक्खेमि।
इय भणिउं वाहरिआ तिण्णि वि ते पउरपच्चक्खं।।५।।

पत्तेअं पत्तेअं लक्खं दाऊण दविणजायस्स।
ववहारत्थं देसेसु पेसिआ तस्समक्खमिमे।।६।।

तो तेसिं पुत्ताणं चिंतियमेकेणमम्हमेस पिआ।
पाएण दीहदरिसी धम्मपिओ सुइसमायारो।।७।।

पाणच्चए वि अम्हाणमुवरि ण कआ वि चिंतइ विरूवं।
केणावि कारणेणं ता णूणं एत्थ भवियव्वं।।८।।



इय परिभाविअ तहियं तह कहवि हु णिअमईए ववहरिअं।
जह विढविऊण कोडी वरिसंते पूरिआ तेण।।९।।

बीएण चिंतियमिमं मम पिउणो विज्जए पहूअधणं।
ता किं किलेसजाले पाडेमि मुहाए अप्पाणं?।।१०।।

जइ सव्वं पि य विलसामि ता गओ कह मुहं पदंसिस्सं।
तम्हा मूलं रक्खिय सेसं भक्खेमि किं बहुणा?।।११।।

तइएणमजोगत्ता विकप्पियं णियमणम्मि मह जणओ।
वुड्ढत्तणदोसेहिं संपइ कोडीकओ जम्हा।।१२।।

दिट्ठा लज्जाणासो भयबाहुल्लं विरूवभासित्तं।
पाएण मणुस्साणं दोसा जायंति वुड्ढत्ते।।१३।।

अण्णह कहमम्हे पट्ठवेइ देसंतरम्मि सइ विहवे?।
इय परिभाविअ सव्वं वरिसंते भक्खिअं दव्वं।।१४।।

संपत्ता सव्वे वि हु ते णिअसमए वण्णियस्सरूवा ते।
पुणरवि तहेव विहिऊण सेट्ठिणा भोअणाईयं।।१५।।

सअणाईण समक्खं पुट्ठा ते ताण ववहारं।
तेहिं वि कहिअं तहा जहा जहा चिंतिअं स-मणे।।१६।।

सअणाईण समक्खं पढमो संठाविओ कुडुंबपए।
बीओ भंडारपए तइओ किसिमाइकज्जेसु।।१७।।

मज्झत्थेण जणएण णिअसुआ जह इमे जणसमक्खं।
सकयाणुरूवपअवीए ठाविआ बुद्धिमंतेण।।१८।।

तह चेव धम्मविसए जीवे ठावेइ कम्मपरिणामो।
सकयाणुरूवसरिसे पअम्मि भणिअं च जेणमिमं।।१९।।

जहा तिण्णि वणिअसुआ मूलं घेत्तूणं णिग्गआ।
एकोऽत्थं लहइ लाभं एको मूलेण आगओ।।२०।।

एको मूलं पि हारित्ता आगओ तत्थ वाणिओ।
ववहारे उवमा एसा एवं धम्मे विआणह।।२१।।

माणुसत्तं भवे मूलं लाहो देवगई भवे।
मूलच्छेएण जीवाणं णरअतिरिक्खत्तणं भवे।।२२।।

**(आख्यानकमणिकोशवृत्ती)**

---

## सद्दत्था

**णायरजणाण** – नागरिकांचे
**सुइववहरणो** – न्याय व नीतिपूर्वक व्यापार करणाऱ्याचे
**पुरसेट्ठी** – नगरशेठ
**कुडुंबपअसमुचिओ** – कुटुंबाचा भार सांभाळण्यासाठी योग्य
**भोयाविऊण** – जेवण देऊन, जेवायला घालून
**वाहरिआ** – बोलावले
**दविणजायस्स** – द्रव्य सामग्री
**समिक्खमिमे** – समिक्खं + इमे – समक्ष त्यांना (मुलांना)
**मूलच्छेएण** – मूळ रक्कम गमावलेल्याप्रमाणे
**पाएण** – बहुत करून
**सुइसमायारो** – शुद्ध आचरणाचा
**णयसारो नाम** – (अत्यंत ज्ञानी) नयसार नावाचा
**णियसयणबंधुपमुहं**– आपले स्वजन बंधू इत्यादी प्रमुखांना
**परिक्खणणिमित्तं** – परीक्षा घेण्यासाठी
**जोग्गो** – योग्य
**पउरपच्चक्खं** – जनतेसमोर
**पेसिआ** – पाठविले
**चिंतियमेकेणमम्हमेस** – (चिंतियं + एकेणं + अम्हं + एस) एकाने विचार केला ‘हा आमचा (पिता?)
**दीहदरिसी** – दीर्घ दृष्टी असणारा
**णरअतिरिक्खत्तणं** – नरकातील व पशुपक्ष्यांचा जन्म

**पाणच्चए वि** – प्राण किंवा जीव गेला तरी

**विरूवं** – विरुद्‌ध, प्रतिकूल किंवा वाईट

**भवियव्वं** – असले पाहिजे

**तहियं** – त्याप्रमाणे

**णिअमईए** – स्वबुद्‌धीने

**चिंतियमिमं** – चिंतियं + इमं - असा विचार केला

**किलेसजाले** – संकटात

**अप्पाणं** – स्वतःला

**गओ** – गेल्यावर, गेला

**तम्हा मूलं रक्खिय** – तेव्हा मूळ (रक्कम) तशीच्या तशी ठेवून

**किं बहुणा** – जास्त विचार करून काय उपयोग?

**विगप्पियं** – विचार केला

**कोडीकओ** – कोट्याधीश

**संपइ** – आता

**लज्जाणासो** – निर्लज्जपणा

**विरूवभासित्तं** – विपरीत बोलणे

**कहमम्हे** – कहं + अम्हे - आम्हाला कां?

**देसंतरम्मि** – परदेशात

**वरिसंते** – वरिस + अंते = वर्षाच्या शेवटी

**पुणरवि** – पुण + अपि - पुन्हा

**विहिऊण** – तयार करवून

**सअणाईण** – सयण + आईण - स्वजनादी

**तहा** – त्याप्रमाणे

**संठाविओ** – स्थापित केला, नियुक्त केला

**किसिमाइकज्जेसु** – किसिं + आइ + कज्जेसु = शेती इत्यादी कामात, कृषी इत्यादी कार्यामध्ये

**मज्झत्थेण** – माध्यस्थ भावाने

**ठाविया** – नियुक्त केले

**कम्मपरिणामो** – कर्माचे परिणाम किंवा फळ

**एकोऽत्थं** – एको + अत्थं = एक द्रव्य किंवा संपत्ती

**गोरवट्ठाणं** – प्रसिद्‌ध, गौरवाचे स्थान

**अम्हाणमुवरि** – अम्हाणं + उवरि = आमच्यावर

**कं पि कारणं** – कोणते तरी कारण

**परिभाविय** – विचार करून

**तह कहवि हु** – नंतर परिश्रमाने

**विढविऊण** – कमावून, कमाई करून

**विज्जए** – आहे

**मुहाए** – व्यर्थ, विनाकारण

**विलसामि** – चैन किंवा मौजमजा (करतो)

**कह मुहं पदंसिस्सं** – मी तोंड कसे दाखवू?

**सेसं भक्खेमि** – बाकी खर्च करतो

**माणुसत्तं** – मनुष्यत्व

**तइएणमजोगत्ता** – तइएणं + अजोगत्ता - तिसऱ्या (मुलाने) योग्यता नसल्यामुळे

**वुड्ढत्तणदोसेहिं** – वृद्‌धापकाळाच्या दोषामुळे

**दिट्ठा** – दिसतात, दिसले

**भयबाहुल्लं** – अनेक भय

**अण्णह** – अन्यथा

**पट्ठवेइ** – पाठविले असते

**सइ विहवे** – वैभव असताना

**संपत्ता** – आले

**तहेव** – तहा + एव - त्याचप्रमाणे

**भोअणाईयं** – भोअण + आईयं - भोजनादी

**पुट्ठा** – विचारले

**जहा** – ज्याप्रमाणे

**भंडारपए** – भांडारप्रमुख

**सकयाणुरूवपयवीए** – सकय + अणुरूव + पयवीए - आपापली योग्यता असलेल्या पदावर

**वियाणह** – जाणावी

**तह चेव** – (चेव - च + एव) त्याचप्रमाणे

**जेणमिमं** – जेणं + इमं = जे याप्रमाणे (समजावे)

**हारित्ता** – हरवून, गमावून

## सज्झाओ

१ **पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

अ) नयसार-शेठचे दोन किंवा तीन वाक्यात गुणवर्णन करा.

ब) पुत्रांची परीक्षा घेण्यासंबंधीचा विचार बरोबर आहे की नाही यावर तुमचे मत सांगा.

क) 'मुलांना किंवा इतर व्यक्तींना त्यांच्या योग्यतेप्रमाणे पद द्यावे हे महत्त्वाचे आहे.' यावर तुमचे मत सांगा

ड) 'मनुष्य जन्म दुर्लभ आहे' या विषयावर निबंध लिहा.

इ) 'धर्म व जीवन' या विषयावर चिंतनात्मक विचार मांडा.

२ **जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| णयसारो | वणियसुआ |
| दीहदरिसी | संठाविओ |
| बीओ भंडारपए | नेमिचंद्रसूरि |
| तिण्णि | पिआ |
| आख्यानकमणिकोशवृत्ती | पुरसेट्ठी |

३ **संधी सोडवा.**

कहमम्हे, चिंतियमेकेण, तइएणमजोगत्ता, वरिसंते, तहेव

४ **संधी करा.**

समक्खं + इमे, अम्हं + एस, जेणं + इमं,
पुण + अपि, च + एव

५ **या पाठातील अकारान्त शब्दांच्या विभक्तींचा संग्रह करून त्यांचे अर्थ लिहा.**

६ **आकृतीबंध पूर्ण करा.**



# ७. दया - धम्मो

'दया-धम्मो' या पाठातील गाथा 'कुमारपाल-प्रतिबोध' या प्राकृत कथासंग्रहातून घेतल्या आहेत. आचार्य सोमप्रभ या ग्रंथाचे लेखक आहेत. आ. हेमचंद्रांनी राजा कुमारपाल याला जैन धर्माचा उपदेश दिला म्हणून या कथासंग्रहाचे नाव 'कुमारपाल-प्रतिबोध' असे आहे.

यादव कुलातील राजा समुद्रविजय यांच्या पुत्राचे नाव कुमार अरिष्टनेमी होते. कुमार अरिष्टनेमीचे लग्न उग्रसेन राजाची पुत्री राजिमती हिच्याशी ठरले. कुमार विवाह करण्यासाठी थाटामाटात निघाला व उग्रसेन राजाच्या महालाजवळ पोहोचला. त्यावेळी पशूंचे करूण स्वर ऐकून त्याने पाहिले, की अनेक पशू तिथे बांधून ठेवलेले आहेत. चौकशी केल्यावर त्याला समजले, की लग्नात आलेल्या लोकांना, राजा उग्रसेन त्या बिचाऱ्या प्राण्यांना मारून, भोजन देणार आहे. 'माझ्या एकट्याच्या विवाहानिमित्ताने हजारो निरपराध प्राण्यांची हिंसा होणार आहे' यासाठी कुमाराने धिक्कार नोंदविला. त्याने सारथ्याला रथ मागे फिरवण्यास सांगितले व वनात जाऊन संन्यास घेतला. त्यानंतर स्वतःला कमनशिबी समजून राजीमतीने अरिष्टनेमींप्रमाणे संन्यास घेतला.

आजही समाजात देव-देवतांना प्रसन्न करण्यासाठी निरपराध प्राण्यांचा वध केला जातो. प्राण्यांचा नाश म्हणजे पर्यावरणाच्या घटकांचा विनाश आहे. प्राणी सुद्धा एक प्रकारची नैसर्गिक संपत्ती आहे. त्यांचे रक्षण करणे म्हणजे पर्यावरणाचे रक्षण तर आहेच; परंतु पर्यायाने स्वतःचेही रक्षण आहे. सर्वप्राणीमात्रांवर दयाभाव ठेवणे कसे आवश्यक आहे हे या काव्यातून स्पष्ट केले आहे.

बारवईए पुरिए समुद्दविजयाइणो दस-दसारा।
आसि असि-भिण्ण-अरिणो जाअव-कुल-विंझ-गिरि-करिणो।।१।।

तत्थ दसमो दसारो वसुदेवो, तस्स णंदणो कण्हो।
सो आसि तत्थ राआ ति-खंड-महि-मंडलस्स पहू।।२।।

पुत्तो समुद्दविजयस्स आसि कुमारो अरिट्ठणेमि त्ति।
बावीसइमो तित्थंकरो त्ति चारित्त-कअ-चित्तो।।३।।

करि-तुरअ-रहारूढेहिं कण्ह-पमुहेहिं पवर-सयणेहिं।
सहिओ समागओ उग्गसेण-णिव-मंदिरासण्णं।।४।।

सोऊण करुण-सद्दं जाव दिट्ठिं देइ तत्थ ता णियइ।
रुद्धे पसु-सस-सुअर-उरब्भ-हरिणाइणो जीवे।।५।।

तस्सद्द-जग्गिय-दओ किमिमे रुद्ध त्ति पुच्छए कुमरो।
तो सारहिणा भणियं, 'कुमार, सुण कारणं एत्थ।।६।।

हणिउं इमे वराए इमाण मंसेण भोअणं दाही।
तुज्झ विवाहे वेवाहियाण सिरि-उग्गसेण-णिवो'।।७।।

तो भणिअं कुमरेणं, 'धिद्धी! परिणअणं एरिसं जत्थ।
भव-कारागार-पवेस-कारणं कीरए पावं'।।८।।

भोगे भुयंग-भोगे व्व भीसणे दूरओ लहुं मुत्तुं।
संसार-सागरुत्तरण-संकमं संजमं काहं।।९।।

तो वज्जरियं इमिणा इत्तो सारहि! रहं णिअत्तेसु।
चालेसु मंदिरं पइ तेणावि तहेव तं विहिअं।।१०।।



दट्ठुं कुमरमुविंतं रविं व णलिणी विसट्ट-मुह-कमला।
जा आसि पुव्वमिण्हिं तु पिच्छिउं तं णियत्तं सा।।११।।

राइमई खेअ-परा परसु-णिअत्त व्व कप्प-रुक्ख-लआ।
मुच्छा-णिमीलिअच्छी सहस त्ति महीअले पडिआ।।१२।।

सत्थी-कआ सहीहिं बाह-जलाविल-लोअणा भणइ।
'हा! णाह! किमवरद्धं मए जमेवं णिअत्तो सि।।१३।।

जइ वि तुमए विमुक्का अहं अहण्णा तहा वि मह णाह!।
तुह चलण च्चिअ सरणं' त्ति णिच्छिउं सा ठिआ बाला।।४।।

दाऊण वच्छरं दाणमुज्जयंते पवण्ण-चारित्तो।
चउ-पण्णास-दिणंते लहइ पहू केवलणाणं।।१५।।

तो णअरायर-गामाइएसु पडिबोहिऊण भविअ-जणं।
सो वास-सहस्साऊ, इहेव अअले गओ मुक्खं।।१६।।

## सद्दत्था

**बारवईए** – द्वारकेमध्ये

**दस दसारा** – दहा दशार्ह, दहा जणांकडून सन्मानित असे दहा, म्हणजेच पूज्य

**णंदणो** – मुलगा, पुत्र

**ति-खंड-महि-मंडलस्स-पहू** – तीन खंडाने युक्त पृथ्वीमंडलाचा प्रभू किंवा स्वामी

**कण्ह-पमुहेहिं** – कृष्ण इत्यादि प्रमुखांनी

**सहिओ** – बरोबर

**रुद्धे** – अडकवलेले (पिंजऱ्यात)

**तस्सद्द-जग्गिय-दओ** – त्यांच्या आवाजाने दया उत्पन्न झालेला

**सारहिणा** – सारथ्याने

**दाही** – देणार आहे

**भव-कारागार** – संसाररूपी तुरुंग

**भुयंग-भोगे** – सर्पाचा फणा

**संकमं** – पलिकडे जाणे

**णिअत्तेसु** – माघारी घे

**कुमरमुविंतं** – कुमरं + उविंतं – कुमाराला येताना

**खेअ-परा** – अत्यंत दुःखी, खेदित

**असि-भिण्ण-अरिणो** – तलवारीने शत्रूंचा नाश करणारा, पराक्रमी

**कण्हो** – कृष्ण

**करि-तुरय-रहारूढेहिं** – (रह + आरूढेहिं) हत्ती, घोडे, रथावर चढलेल्यांच्या (सह)

**पवर-सयणेहीं** – विशिष्ट नातेवाइकांनी

**णिव-मंदिरासण्णं** – मंदिर + आसण्णं राजाच्या महालाजवळ

**किमिमे** – किं + इमे – यांना कशाला

**वराए** – बिचाऱ्यांना

**वेवाहियाण** – विवाहात आलेल्या लोकांना

**भोगे** – इंद्रियसुख

**सागरुत्तरण** – सागर + उत्तरण – समुद्र पार करणे

**वज्जरियं** – बोलावणे

**चालेसु** – चालव

**विसट्ट** – विकसित

**परसु-णिअत्त** – तलवारीने (कापलेली) वेगळी केलेली

**सहस** – अचानक

**मुच्छ–णिमीलियच्छी –** णिमीलिय + अच्छी – मूर्छेने डोळे बंद झालेली
**सत्थी–कया –** आश्वस्त केली
**किमवरद्धं –** किं + अवरद्धं – काय अपराध केला
**विमुक्का –** त्याग केली गेलेली
**चलण –** चरण, पाय
**वच्छरं –** संवत्सर, वर्ष
**पवण्ण–चारित्तो –** संयम किंवा संन्यास घेतलेला
**अअले –** पर्वतावर
**बाह–जलाविल–लोयणा –** अश्रुपूर्ण डोळे असलेली
**जमेव –** जं + एव – याप्रमाणे
**अहण्णा –** अधन्या, कमनशिबी
**णिच्छिउं –** निश्चय करून
**दाणमुज्जयंते –** दाणं + उज्जयंते – उज्जयंत (गिरनार) पर्वतावर

## सज्झाओ

१ **अरिष्टनेमींचे चरित्र लिहा.**

२ **खालील विषयांवर संक्षिप्त टीपा द्या.**

अ) अरिष्टनेमी व कृष्ण यांचे नाते.
ब) अरिष्टनेमींचा विवाह.
क) अरिष्टनेमींचे वैराग्य.
ड) राजिमतीची मूर्च्छा.
इ) राजिमतीची दीक्षा.

३ **ससंदर्भ स्पष्टीकरण द्या.**

१) किमिमे रुद्ध त्ति।
२) हणिउं इमे वराए इमाण मंसेण भोयणं दाही।
३) 'धिद्धी! परिणअणं एरिसं जत्थ।
४) हा! णाह! किमवरद्धं मए जमेव णिअत्तो सि।

४ **वर्णविषयक बदल स्पष्ट करा.**

बारवई, कण्ह, सिरि, वच्छर, अहण्ण, मुच्छा, कप्परुक्ख, जायव, चलण.

५ **रूपे ओळखा.**

तस्स, सोऊण, सारहिणा, काहं, गओ, भणइ, कण्हो, विजयस्स.

६ **संधी सोडवा.**

मंदिरासण्णं, किमिमे, कुमरमुविंतं, णिमीलियच्छी, जलाविल, दिणंते, इहेव.

❋❋❋

# परिशिष्ट-१
# अवांतर - वाचन
## १. पाउस-कालो

एसो पाउसकालो। पाउसकाले मेहा आकासाओ जलं वरिसंति। णअरे पउरा सव्वत्थ जलं पासंति। णईओ सरोवराइं च जल-पुण्णाइं भवंति। जणा णावाए णइं तरंति। किसीवलो सगडं आरोहइ खेत्तं च गच्छइ। समणो पाउसकाले गामाओ गामं ण गच्छइ। किंतु एकम्मि गामे वा णयरे वा वसइ। सो जणाणं धम्मं कहेइ। राआ सइण्णेण सह आगच्छइ धम्मं च सुणइ। समणो भणइ - जो धम्मं आयरइ सो सुही होइ।

अरण्णे हरियं तणं वड्ढइ। मिआ तणं चरंति। वाणरा रुक्खाणं साहासु वीसमंति। पाउसकाले अरण्णस्स सोहा वड्ढइ। पिक्काइं फलाइं महीयले पडंति। किसीवलो खेत्ते परिस्समं करेइ पभूयं च धण्णं लहइ। सो दइवस्स दोसं ण देइ। सो रिणं फेडेइ। वेज्जो तस्स ओसहं देइ। किसीवलो संतोसेण कालं णेइ। केणइ सह वेरं ण करेइ।

---

### सद्दत्था

**पाउसकालो** – पावसाळा
**वरिसंति** – वर्षाव करतात
**सरोवराइं** – सरोवरे
**किसीवलो** – शेतकरी
**खेत्तं** – शेत, शेतात
**णयरे** – नगरात
**आअरइ** – आचरण करतात
**हरिअं** – हिरवेगार
**मिगा** – मृग, हरिण (अनेकवचन)
**पिक्काइं** – पिकलेले
**पभूयं** – पुष्कळ
**रिणं** – कर्ज
**ओसहं** – औषध
**मेहा** – अनेक ढग, मेघ
**सव्वत्थ** – सर्वत्र
**णावाए** – नौका
**सगडं** – गाडी (बैलगाडी)
**समणो** – साधू, श्रमण
**धम्मं** – धर्म
**सुही** – सुखी
**तणं** – गवत
**साहासु** – फांद्यांवरती
**महीयले** – जमिनीवर
**धण्णं** – धान्य
**फेडेइ** – फेडणे
**णेइ** – नेतो, घालवतो
**आकासाओ** – आकाशातून
**णईओ** – नद्या
**तरंति** – ओलांडतात
**आरोहइ** – चढतात, आरूढ होतात
**वसइ** – रहातो
**भणइ** – म्हणतात
**सुणइ** – ऐकतो/ऐकते
**वड्ढइ** – वाढते
**सोहा** – शोभा
**परिस्समं** – मेहनत, श्रम
**लहइ** – मिळणे, मिळविणे
**वेज्जो** – वैद्य
**वेरं** – वैर

---

- **खालील कृती करा.**

१) **कंसात दिलेल्या शब्दांचा उपयोग करून उतारा पूर्ण करा.**

किसीवलो ..... आरोहइ .....च गच्छइ। .......संतोसेण ........ ..........।

(खेत्तं, कालं, किसीवलो, णेइ, सगडं)

२) **शेतकऱ्याच्या आयुष्यातील पावसाचे महत्त्व सांगा.**

❋❋❋

# २. वणं

वणे रुक्खा वड्ढंति। तत्थ वग्घा, सीहा, वाणरा, मिगा य वसंति। मिगा रण्णे तणं खायंति पाणिअं च पिबंति। वग्घा मिगे भक्खंति। वग्घेहिंतो पसूणं महब्भयं वट्टइ। वणम्मि विविहाइं फलाइं सुंदराइं पुप्फाइं, पभूअं च जलं अत्थि। तावसा वि वणे वसंति। ते तत्थ आसमे कुमारे पाढेंति। कुमारा वणाओ सुक्काइं कट्ठाणि, णईओ य जलं आणेंति। आसमस्स समीवे एकं उज्जाणं अत्थि। उज्जाणे अणेके रुक्खा अणेकाओ लआओ, णीलाइं, पीआइं, रत्ताइं, धवलाइं च कुसुमाणि संति।

सरोवरेहीं वणं रमणीयं होइ। हंसा, चक्कवाया, मऊरा य सरोवरस्स तीरे विहरंति। वणाओ लोअस्स बहुलाहो होइ। अम्हे वणाओ कट्ठाइं, फलाइं, च लहामो। वणरहिआ भूमी दुक्कालं आणेइ। अओ वणरक्खणं वण-संवड्ढणं च अम्हाणं जुत्तं।

सुभाषित-

गेहं जाण तरुतलं फलाइ असणं सिलाअलं सअणं।<br>
मित्तं च मयकुलाइं अहो कयत्था अरण्णम्मि।।

---

**सद्दत्था**

**पाणियं** – पाणी

**विविहाइं** – अनेक प्रकारचे, पुष्कळ प्रकारचे

**पाढेंति** – शिकवतात

**कट्ठाणि** – लाकडे

**असणं** – भोजन, खाणे

**उज्जाणं** – बाग

**रत्ताइं** – लाल, लालभडक

**दुक्कालं** – दुष्काळ

**जुत्तं** – योग्य

**मयकुलाइं** – पशुंचा समूह

**पुप्फाइं** – फुले

**तावसा** – तपस्वी, साधू (अनेकवचन)

**सुक्काइं** – वाळलेले

**गेहं** – घर

**सिलाअलं** – दगडाचा पृष्ठभाग

**पीआइं** – पिवळे

**चक्कवाया** – चक्रवाक पक्षी

**संवड्ढणं** – संवर्धन

**सअणं** – बिछाना, शय्या

**कयत्था** – धन्य, कृतार्थ

---

- **खालील कृती करा.**

१) गाथेमधील उपदेश स्पष्ट करा.

२) वन व पर्यावरण यांचा संबंध स्पष्ट करा.

३) वनसंवर्धनाचे फायदे सांगा.

❋❋❋

# ३. संकिण्ण-गाहाओ

संतगुणविप्पणासे असंतदोसुब्भवे वि जं दुक्खं।
तं सोसेइ समुद्दं, किं पुण हिअअं मणुस्साणं।।१।।

अत्थमणे छंडिज्जइ णूणं सूरो वि णिअअकिरणेहिं।
पुरिसस्स वसणकाले देहुप्पण्णा वि विहडंति।।२।।

वरिसंति ण मेहा गज्जिऊण पहुणो ण दिंति हसिऊण।
ण फलंति तरू जे फुल्लिऊण ते कहं ण लज्जंति।।३।।

विणए सीसपरिक्खा सुहडपरिक्खा य होइ संगामे।
वसणे मित्तपरिक्खा दाणपरिक्खा य दुक्काले।।४।।

सीलं च्चिय सव्वाणं भूसणं सीलमेव सव्वस्सं।
सीलं जीविअसरिसं, सीलाओ ण सुंदरं किंपि।।५।।

## सद्दत्था

**संकिण्ण** – मिश्र स्वरूपाच्या

**संत** – असलेला

**असंत** – नसलेला

**दुक्खं** – दुःख

**सोस** – शुष्क करणे

**अत्थमणे** – अस्त होताना

**छंडिज्जइ** – सोडतो, त्याग करतो

**वसण** – संकट

**देहुप्पण्णा** – देहापासून उत्पन्न झालेले

**विहड** – विघटित करणे, नष्ट करणे

**पहु** – राजा, स्वामी

**दिंति** – देतात

**फुल्ल** – फुलणे, विकसित होणे

**सुहड** – उत्तम योद्धा

**दुक्काल** – दुष्काळ

**सीलं** – शील, चारित्र्य

**भूसणं** – भूषण, अलंकार

- **खालील कृती करा.**

१) सूर्याच्या दृष्टान्ताने कवी काय स्पष्ट करू इच्छितो?

२) गर्जणारे मेघ व फळांनी लगडलेले वृक्ष या दृष्टान्तांद्वारे कवी काय सांगतो आहे.

३) शीलाचे महत्त्व स्पष्ट करा.

# ४. बुद्धिमंतो अमच्च-सुओ

अण्णदिणेऽमच्चसुओ बुद्धिपहाणो गओ णिवघरम्मि।
तत्थ विवाया वट्टंति बहुविहा भूरिकाला य।।१।।

तत्थ अ दो महिलाओ एअं पुत्तं उवट्ठिया घेत्तुं।
भणिओ ताहिममच्चो- ''भो सामिअ सुणसु विण्णत्तिं।।२।।

एत्थागयाणमम्हं दूरा देसंतराओ पइमरणं।
संजायं, दविणमिमं पुत्तो अ इमो समत्थि'' त्ति।।३।।

जीए अ एस पुत्तो दविणं पि हु तीएँ णिच्छियं होइ।
लग्गो य बहू कालो अम्हे तुम्हं सरंतीणं।।४।।

ता जह अज्ज विवाओ एसो परिछिज्जई तहा कुणसु।
'पुत्तं धणं च दाऊण' भासियं तो अमच्चेण।।५।।

''अव्वो! एस अउव्वो कह छिज्जिस्सइ सुहं विवाओ'' त्ति।
इअ भणिरम्मि अमच्चे भणिअ महामच्चपुत्तेण।।६।।

''जइ तुम्हाणमणुण्णा, विवायमेयं अहं तु छिंदामि''।
अणुमण्णिएण तेणं, भणिया महिलाओं ता दो वि।।७।।

''एत्थमुवट्ठवह धणं पुत्तं च'' तओ तहा कए ताहिं।
उवणीयं करवत्तं धणस्स भागा अ दो वि कया।।८।।

पुत्तस्स णाभिदेसे करवत्तं जा दुभागकरणट्ठं।
आरोविअं, ण अण्णह छिज्जइ एसो विवाउ'त्ति।।९।।

ता सुअ-जणणी णिक्कित्तिमेण णेहेण लंछिआ भणइ।
''दिज्जउ पुत्तो वित्तं इमाएँ, मा होउ सुअमरणं''।।१०।।

णायममच्चसुएणं जह एस सुओ इमाएँ, ण इमीए।
णिद्धाडिया तओ सा पुत्तधणं दिण्णमिअ राए।।११।।

## सद्दत्था

**अमच्च** – अमात्य, मंत्री

**सुओ** – मुलगा

**दूरा** – दूर, लांबून

**विवाओ** – विवाद, भांडण

**बहुविहा** – अनेक प्रकारचा

**भूरिकाला** – पुष्कळ काळ

**उवट्ठिया** – उपस्थित झालेला

**भणिरम्मि** – म्हणणारा, म्हटल्यानंतर

**अणुण्णा** – परवानगी

**अणुमण्णिएण** – परवानगी दिलेला

**उवणीअं** – आणलेला

**णिद्धाडिया** – हाकलून लावली

**विण्णत्तिं** – विज्ञप्ती, विनंती

**णिवघरम्मि** – राजवाड्यामध्ये

**दविणं** – द्रव्य

**समत्थि** – आहे

**णिच्छियं** – निश्चितपणे

**अव्वो** – आश्चर्यवाचक उद्गार

**सुहं** – सुखाने, सहज

**णिक्कित्तिमेण** – अकृत्रिम

**णेहेण** – स्नेहाने, प्रेमाने

**वित्तं** – संपत्ती, वित्त, धन

**इयर** – दुसरा

**करवत्तं** – करवत

---

- **निर्देश केल्याप्रमाणे कृती करा.**

१) राजदरबारात आलेल्या विवादाचे स्वरूप स्पष्ट करा.

२) विवाद सोडविण्यासाठी अमात्यसुताने वापरलेली युक्ती सांगा.

३) अमात्यसुताने बाळाची आई कशी ओळखली?

४) योग्य शब्द वापरून गाथा पूर्ण करा.

अ) जीए अ एसो ................ दविणं ................... हु ................णिच्छियं होइ ।
............... य .................. कालो अम्हे तुम्ह ....................।।
(पि, लग्गो, सरंतीणं, पुत्तो, पि, बहू)

ब) ..................... अज्ज विवाओ एसो .......................... तहा .......................।
पुत्तं धणं च ......................... भासियं तो ............................।।
(अमच्चेण, दाऊण, कुणसु, परिछिज्जई, ता जह)

५) वरील कथा गद्य स्वरूपात प्राकृतात लिहा.

# परिशिष्ट - २

## व्याकरण विवेचन

१. मराठी भाषेत आपण चाक, ताक, काम, तण, आग या सारखे शब्द वापरतो. यांच्याशी जवळीक साधणारे संस्कृत शब्द अनुक्रमे चक्र, तक्र, कर्मन्, तृण, अग्नि हेही आपल्या चांगल्या परिचयाचे आहेत. या दोन्ही गटांतील शब्दांचा एकमेकांशी संबंध असल्यासारखे वाटते. वरील दोन्ही गटांतील शब्दांना साधणारा एखादा दुवा असला पाहिजे असे लक्षात येते. या दोहोंना साधणाऱ्या भाषांनाच प्राकृत भाषा असा सामान्य शब्द वापरला जातो. वर सांगितलेल्या संस्कृत शब्दांची प्राकृत रूपे – चक्क, तक्क, कम्म, तण, अग्गि अशी होतात.

२. प्राकृत ही एकच भाषा नसून तिच्यात अर्धमागधी, महाराष्ट्री, जैन महाराष्ट्री, शौरसेनी, पैशाची, अपभ्रंश इ. स्थलकालपरत्वे प्रचारात आलेल्या अनेक भाषांचा समावेश होतो. प्राकृत म्हणजे सामान्य जनतेची भाषा. प्राकृत म्हणजे – 'प्राक् कृतं'। जी पूर्वी म्हणजे आधी केली गेली आहे ती. महाराष्ट्र प्रदेशात जी बोलली जात असे, वापरली जात असे ती महाराष्ट्री प्राकृत.

३. सामान्यपणे संस्कृत आणि प्राकृत यात मूलभूत फरक नाही. सध्याच्या मराठीत जसा नागर मराठी व ग्रामीण मराठी असा भेद दाखवता येईल, तसाच काहीसा प्रकार संस्कृत व प्राकृत यांच्यातील संबंधाबाबत आहे. संस्कृत ही अभिजनांची भाषा आहे असे म्हटल्यास प्राकृत भाषांना सर्वसामान्यांची भाषा असे स्थूलमानाने म्हणता येईल. भाषा या स्थल, काल आणि त्यांच्यावर होणारे संस्कार या कारणांमुळे बदलत असतात. संस्कृतचा जसा प्राकृत भाषांवर प्रभाव पडलेला दिसतो, तसाच प्राकृत भाषांचाही संस्कृत भाषेवर परिणाम झाल्याचे आढळते. म्हणून प्राकृतभाषांच्या अभ्यासाशिवाय आधुनिक भाषांची जडणघडण समजणार नाही.

४. महाराष्ट्री प्राकृतमध्ये शब्दसंपत्ती बहुतांशी संस्कृतप्रमाणेच आहे. या शब्दांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात येते.

१) **तत्सम शब्द** – त्या-समान, म्हणजे संस्कृतप्रमाणे असणारे शब्द. उदा. – कमल, परम, वीर, तीर, तरु, सार, संसार, फल, इ.

२) **तद्भव शब्द** – त्यापासून म्हणजे संस्कृतपासून निर्माण झालेले, त्यात नियमानुसार काही बदल होऊन निर्माण झालेले शब्द. उदा. – पूर्वी सांगितलेले चक्क, तक्क, कम्म, तण, अग्गि हे शब्द तद्भव आहेत.

३) या शिवाय मूळ स्थानिक बोली भाषेतून आलेले शब्द प्राकृत भाषांमध्ये आहेत. त्यांना **'देशी शब्द'** असे नाव आहे. यांचे मूळ संस्कृतात सापडत नाही किंवा काहींचे मूळ सहजासहजी संस्कृत शब्दांमध्ये दाखवता येत नाही. त्यांचा संबंध विविध प्रांतांतील बोली भाषांशी आहे. उदा. – गोस (सकाळ), चंग (चांगला), डाला (फांदी), बप्प (बाप), कोड्ड (कौतुक). या देशी शब्दांचे वैशिष्ट्य असे की त्यांपैकी कित्येक तसेच्या तसे किंवा परिवर्तित स्वरूपात आधुनिक भारतीय भाषांत आढळतात.

## देशी शब्दांचा संग्रह

### नाम

अक्का – बहीण, अक्का
जोवारी – ज्वारी, जोंधळा
आराडी – आरडाओरडा
डोलो – डोळा
उत्थलपत्थल – उलथापालथ
दवर – दोरा
कुल्ह – कोल्हा
बाउल्ली – बाहुली
गड्डी – गाडी
सूरण – सुरण (कंद)

छल्लि – साल, (हिंदी) छिलका
अत्ता – आत्या
टोल – टोळ
उज्जड – उजाड
तल्ल – तळे
कुड्ड/कोड्ड – कोडकौतुक, लाड
फुक्का – फुकट
खडक्की – खिडकी
वंग – वांगे
चाउल – तांदूळ, (हिं.) चावल

अग्घाड – आघाडा
झडी – वर्षाव, झड, (हिं.) झडी
उक्कुरुड – उकिरडा
ढंकुण – ढेकूण
उंदुर – उंदीर
पत्तल – पातळ, धारदार
कोइला – कोळसा,(हिं.) कोयला
मंगुस – मुंगूस
घोसाली – घोसाळे
हलबोल – गडबड-गोंधळ

### क्रियापद

अट्ट – आटणे
पज्झर – पाझरणे
घुसल – घुसळणे
फिट्ट – फिटणे
छुप्प – लपणे, (हिं.) छिपना
भुल्ल – चुकणे, विसरणे, (हिं.) भूलना

झूर – झुरणे
घुट्ठ – घोट घेणे
पोक्कर –हाक मारणे, (हिं.)पुकारना
छज्ज – शोभणे, साजणे
भुक्क – भुंकणे

कढ – काढणे
पट्ठव – पाठवणे
घोल – घोळणे
बुड्ड – बुडणे, (हिं.) डूबना
झप – झडणे
सिंप – शिंपडणे

५. प्राकृत साहित्य – जैनांचे ४५ धर्मग्रंथ अर्धमागधी भाषेत आहेत. महाराष्ट्री प्राकृत भाषेतही विपुल प्रमाणात साहित्य निर्माण झालेले आहे. त्यात पउमचरियं, सेतुबंध यासारखी महाकाव्ये, कर्पूरमंजरी, चंदलेहा यासारखे नाट्यवाङ्मय, कुवलयमालेसारखे कथावाङ्मय, गाहासत्तसई, वज्जालग्ग या सारखे मुक्तक काव्यांचे संग्रह, यांचा उल्लेख करता येईल. प्राकृत भाषांची व्याकरणे व शब्दकोशही रचण्यात आलेले आहेत.

प्राकृत भाषा ही एक प्राचीन भारतीय भाषांचा समूह आहे. यामध्ये अर्धमागधी, मागधी, महाराष्ट्री, शौरसेनी, पैशाची, चूलिका पैशाची, अपभ्रंश, इत्यादी १८ विविध बोलीभाषांचा समावेश होतो. या भाषेच्या अध्ययनाने प्राचीन भारतीय संस्कृतीचे, समाजाचे, बोलीभाषेचे, राजकीय घडामोडींचे दर्शन होण्यास मदत होते. एवढेच नव्हे तर आधुनिक भारतीय भाषा कसकशा विकसित होत गेल्या याचाही परिचय होण्यास मदत होते.

## महाराष्ट्री प्राकृत व मराठीचे व्याकरण : स्थूल तुलना

१. महाराष्ट्री प्राकृतचे व्याकरण हे जवळजवळ मराठी व्याकरणासारखेच आहे.

२. मराठीप्रमाणेच महाराष्ट्री प्राकृतात प्रथम पुरुष, द्वितीय पुरुष व तृतीय पुरुष असे तीन पुरुष; पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग ही तीन लिंगे; वर्तमान, भूत व भविष्य हे तीन काळ, एक व अनेक ही दोन वचने; आज्ञार्थ, विध्यर्थ व संकेतार्थ हे तीन अर्थ; सकर्मक व अकर्मक अशी दोन प्रकारची क्रियापदे, संधी, समास इत्यादी बाबींचा अंतर्भाव होतो.

३. चतुर्थी वगळून इतर सर्व विभक्ती महाराष्ट्री प्राकृतात मराठीप्रमाणेच आहेत. चतुर्थीचे कार्य षष्ठीने केले जाते. महाराष्ट्री प्राकृतात विभक्ति-प्रत्यय मात्र वेगळे आहेत.

४. काव्यरचनेच्या बाबतीत महाराष्ट्री प्राकृतात व मराठीमध्ये थोडा फरक आहे. उदाहरणार्थ - महाराष्ट्री प्राकृतात क्रियापदांची रूपे कर्त्याच्या लिंगाप्रमाणे बदलत नाहीत. मराठीत ती बदलतात. (या दोन भाषांच्या व्याकरणांमधील अन्य भेद शिक्षकांनी जरूरीप्रमाणे विद्यार्थ्यांच्या नजरेस आणून द्यावेत.)

५. महाराष्ट्री प्राकृत आणि मराठी वर्णमालेतही फरक आहे. तो पुढे सांगितला आहे.

## प्राकृत वर्णमाला

महाराष्ट्री प्राकृत भाषेतील वर्णमालेचा विद्यार्थ्यांना प्रथम परिचय व्हावा या अपेक्षेने प्राकृत भाषेतील वर्णमाला पुढीलप्रमाणे दिलेली आहे.




## १. प्राकृत भाषेतील स्वर, व्यंजन

१. ऱ्हस्व स्वर - अ, इ, उ

२. दीर्घ स्वर – आ, ई, ऊ, ए, ओ. मात्र ऐ, औ, अः, ऋ, ॠ , ऌ हे संस्कृतातील स्वर उच्चारण्यास कठीण असल्याने त्यांचा प्राकृत भाषेने स्वीकार केलेला नाही. परंतु या कठीण स्वरांमध्ये उच्चारण्यास सुलभ असे काही बदल करून ते प्राकृत भाषेत आलेले आहेत.

३. स्वरांची 'ऱ्हस्व-दीर्घ' आणि 'सजातीय-विजातीय स्वर' अशी विभागणी केलेली आहे.

४. ‘अ, इ, उ, एॅ, ऑ’ या स्वरांना ऱ्हस्व स्वर म्हणतात तर ‘आ, ई, ऊ, ए, ओ’ हे दीर्घ स्वर आहेत. (ऐ, औ हे प्राकृतात नाहीत.)

५. ‘अ-आ, इ-ई, उ-ऊ’ ह्या जोड्या सजातीय (समान) स्वरांच्या आहेत, तर ‘अ, इ, उ’ इत्यादी स्वरांना विजातीय (असमान) स्वर म्हणतात.

६. ‘ऐ, औ, अः, ऋ, ऌ’ हे स्वर प्राकृतात नसले तरी त्याचे सुलभीकरण करून ते प्राकृतात पुढीलप्रमाणे आलेले आहेत.

## (अ) स्वरांचे बदल

### १. ऐ = ए, अइ असा बदल होतो.

| | |
|---|---|
| कैलास = केलास, कइलास | मैत्री = मेत्ती, मइत्ती |
| कैकयी = केकइ, केअई, कइकई | दैव = देव, दइव |
| वैकुण्ठ = वेकुंठ, वइकुंठ | वैरि = वेरि, वइरि |
| सैन्य = सेण्ण, सइण्ण | मौन = मोण, मउण |

### २. औ = ओ, अउ असा बदल होतो.

| | |
|---|---|
| गौरी = गोरी, गउरी | गौरव = गोरव, गउरव |
| नौ = णो, णउ | पौर = पोर, पउर |
| नौका = णोका, णउआ, णावा | कौशांबी = कोसंबी, कउसंबी |
| औषध = ओसह, अउसह | कौतुक = कोउअ, कोउय, कउउअ |
| गौतम = गोतम, गोअम | यौवन = जोवण |
| गौड = गोड, गउड | कौमुदी = कोमुई, कउमुई |

### ३. ‘आ, ई, ऊ’ स्वरांवर अनुस्वार आल्यास तो स्वर ऱ्हस्व होतो.

| | |
|---|---|
| पांसु = पंसु | पांडित्य = पंडिच्च |
| पांडव = पंडव | मांस = मंस/मास |
| वांछिअ = वंछिअ | क्षांत = खंत |

### ४. ‘आ, ई, ऊ’ या स्वरांपुढे जोडाक्षर आल्यास तो स्वर ऱ्हस्व होतो.

| | |
|---|---|
| धान्य = धण्ण | भार्या = भज्जा |
| परीक्षा = परिक्खा | पूर्णिमा = पुण्णिमा |
| तीव्र = तिव्व | दीक्षा = दिक्खा |
| पूर्व = पुव्व | कीर्ति = कित्ति |
| राज्य = रज्ज | |

५. **संस्कृतातील विसर्गाऐवजी प्राकृतामध्ये ‘ओ’ चा उपयोग केला जातो.**

| | | |
|---|---|---|
| रामः = रामो | देवः = देवो | नृपः = णिवो |
| माला: = मालाओ | | |

६. **ऋ = अ, इ, उ, ए, रि होतो.**

१. **ऋ = अ**

| | | |
|---|---|---|
| मृत = मअ | घृत = घअ | मृदु = मउ |
| कृष्ण = कण्ह | कृत = कअ | तृण = तण |
| मृत्यु = मच्चु | तृष्णा = तण्हा | दृढ = दढ |

२. **ऋ = इ**

| | | |
|---|---|---|
| ऋषी = इसी | मृषा = मिसा | गृह = गिह |
| कृष्ण = किसण | मृग = मिअ | दृढ = दिढ |
| नृप = णिव | कृश = किस | |

३. **ऋ = उ**

| | | |
|---|---|---|
| ऋतु = उतु/उउ | मृषा = मुसा | वृद्ध = वुड्ढ |
| मातृ = माउ/मातु | प्रावृष = पाउस | भ्रातृ = भाउ |
| पितृ = पिउ/पितु | वृष्टि = वुट्ठि | पृथिवी = पुढवी |

४. **ऋ = ए**

| | |
|---|---|
| गृह = गेह | वृन्त = वेंट |

५. **ऋ = रि**

| | | |
|---|---|---|
| ऋण = रिण | ऋद्धि = रिद्धि | वृषभ = रिसह |
| ऋषि = रिसि | ऋषभ = रिसह | |

## (ब) प्राकृतातील व्यंजन

१. प्राकृतात ‘श, ष’ ऐवजी ‘स’ होतो.

| | | |
|---|---|---|
| शशी = ससी | शत = सअ/सय | भूषण = भूसण |
| कृषि = किसि | महिषी = महिसी | मूषक = मूसअ/मूसय |

२. प्राकृतात ळ, क्ष, ज्ञ ही व्यंजने उच्चारण्यास कठीण असल्याने त्यांच्या ऐवजी ळ = ल, क्ष = ख, क्ख, च्छ, छ आणि ज्ञ = ण किंवा ज चा वापर विकल्पाने केला जातो.

१. ळ = ल – कमळ = कमल, नळ = णल, फळ = फल

२. ज्ञ = ण – ज्ञान = णाण, ज्ञात = णाअ, णात, णाय, ज्ञानेश = णाणेस, ज्ञान = जाण

३. क्ष = ख, क्ख – वृक्ष = रुख, रुक्ख, वक्ख, भक्ष = भक्ख, अक्ष = अक्ख, आंख

क्षण = खण, क्षीर = खीर

क्ष = च्छ, छ – वृक्ष = रुच्छ, वच्छ वक्षस्थल = वछत्थल, वच्छत्थल

| उच्चारस्थान | वर्ग | व्यंजन |
|---|---|---|
| कंठ्य | क | क्, ख्, ग्, घ्, ङ् |
| तालव्य | च | च्, छ्, ज्, झ्, ञ् |
| मूर्धन्य | ट | ट्, ठ्, ड्, ढ्, ण् |
| दन्त्य | त | त्, थ्, द्, ध्, न् |
| ओष्ठ्य | प | प्, फ्, ब्, भ्, म् |
| अन्त:स्थ | | य्, र्, ल्, व् |
| ऊष्म वर्ण | | स् |
| महाप्राण | | ह् |

(अ) 'क् ते प्' वर्गातील पहिल्या चार व्यंजनांना स्पर्श व्यंजने म्हणतात. स्पर्श व्यंजनांच्या उच्चाराला अधिक बल लागते.

(ब) 'ङ्, ञ्, ण्, न्, म्' या व्यंजनांचा उच्चार काही प्रमाणात नाकातून होतो म्हणून यांना अनुनासिके म्हणतात. अनुनासिके बलाने दुसऱ्या क्रमांकाची म्हणजे स्पर्श व्यंजनाहून कमी बलाची असतात.

(क) 'य्, र्, ल्, व्' या व्यंजनांना अन्त:स्थ व्यंजने म्हणतात.

सर्व अन्तःस्थ व्यंजनांचे उच्चार, स्थान भिन्न भिन्न असून सर्व अन्तःस्थ व्यंजने बलाने तिसऱ्या म्हणजे सर्वात कमी बलाची असतात.

(ड) 'स्' हे ऊष्म व्यंजन आहे. याच्या उच्चारामध्ये इतर व्यंजनांच्या तुलनेने फुफुसातील हवा अधिक बाहेर पडते. म्हणून याला ऊष्म वर्ण म्हणतात. ऊष्म वर्ण बलाने कमी आहे.

(ई) 'ह्' या व्यंजनाचा उच्चार करत असताना फुफुसातील हवा अधिक प्रमाणात बाहेर पडते म्हणून यास महाप्राण म्हटले आहे. 'ह्' चे द्‌वित्व कधीच होत नाही.

## (१) मुळाक्षरांमधील बदल

व्यंजनांच्या बदलामध्ये प्रामुख्याने मुळाक्षरे आणि जोडाक्षरे असे दोन प्रकार आहेत. त्यामध्येही आद्य, मध्य, अन्त्य असे विभाग केलेले आहेत. आद्य म्हणजे अगोदरचे, अनाद्य म्हणजे आरंभी नसलेले. (मध्य, अन्त्य, ठिकाणी असलेल्यास अनाद्य असेही म्हणतात.)

१. शब्दाच्या आरंभी 'य' असेल तर त्याचा 'ज' होतो.

यात्रा = जत्ता यादव = जादव, जाअव यथा = जहा
योगी = जोगी यमुना = जमुणा, जउणा यम = जम

२. शब्दाच्या प्रारंभी असलेल्या 'क' चा कधी कधी 'ख' होतो.

कील = खील कुब्जा = खुज्जा, खुजा कर्पर = खप्पर, खापर

३. शब्दाच्या प्रारंभी असलेल्या 'प' चा कधी कधी 'फ' होतो.

परुष = फरुस    परशु = फरसु (कुऱ्हाड)    परिखा = फलिहा (खंदक)

परिघ = फरिह    पुट = फुट

४. शब्दाच्या प्रारंभी असलेल्या 'य' चा कधी कधी 'त' होतो.

युष्मद् = तुम्हे

५. शब्दाच्या प्रारंभी असलेल्या 'श, ष, स' चा कधी कधी 'छ' होतो.

शाव = छाव    सुधा = छुहा

षण्मुख = छम्मुह    षष्ठ = छट्ठ

६. आद्य 'क्ष' चा कधी कधी 'ख' होतो.

क्षीर = खीर    क्षण = खण

क्षेत्र = खेत्त    क्षत्रिय = खत्तिअ

७. कधी कधी आद्य 'ज' चा 'झ' होतो.

जटिल = झटिल, झडिल

८. कधी कधी आद्य 'च' चा 'त' होतो.

चिकित्सक = तिगिच्छग

९. कधी कधी आद्य 'त' चा 'च' किंवा 'छ' होतो.

तुच्छ = चुच्छ, छुच्छ    त्याग = चाय, छय

१०. कधी कधी आद्य 'त' चा 'ट' होतो.

तगर = टगर

११. कधी कधी आद्य 'द' चा 'ड' होतो.

दाह = डाह    दंश = डंस    दंभ = डंभ

दंड = डंड    दोला = डोला

१२. बहुधा 'न' चा 'ण' होतो.

नदी = णई    नर = णर    नमो = णमो    ज्ञान = णाण

नाम = णाम    नारी = णारी    नूणं = णूणं    नाना = णाणा

## (२) मध्य असंयुक्त व्यंजनांचे (मुळाक्षरांचे) बदल

१. 'य' श्रुती – केव्हां केव्हां अनाद्य (मध्य, अन्त्य) ठिकाणी असलेल्या 'क, ग, च, ज, त, द' या असंयुक्त व्यंजनांचा लोप होऊन 'अ' राहतो, केव्हा केव्हा 'अ' च्या जागी 'य' चा उच्चार होतो. यालाच 'य श्रुती' असे म्हणतात.

| | | | |
|---|---|---|---|
| १) क = य – | कणक = कणअ, कणय | उदक = उअअ, उयय | शोक = सोअ, सोय |
| | जनक = जणअ, जणय | नरक = णरअ, णरय | नाक = णाअ, णाय |
| | सकल = सअल, सयल | लोक = लोअ, लोय | काक = काअ, काय |
| २) ग = य – | नगर = णअर, णयर | सागर = साअर, सायर | मृग = मिअ, मिय |
| | मगर = मअर, मयर | आगर = आअर, आयर | साग = साअ, साय |
| ३) च = य – | आचार = आआर, आयार | उपचार = उवआर, उवयार | वचन = वअण, वयण |
| | कवच = कवअ, कवय | नीच = णीअ, णीय | |
| ४) ज = य – | सुजन = सुअण, सुयण | गज = गअ, गय | |
| | पूजा = पूआ, पूया | प्रजा = पआ, पया | राजा = राया, राआ |
| ५) त = य – | शीतल = सीअल, सीयल | गीत = गीअ, गीय | पिता = पिआ, पिया |
| | शीत = सीअ, सीत, सीय | मारुत = मारुअ, मारुय | माता = माआ, माया |
| ६) द = य – | पाद = पाअ, पाय | हृदय = हिअअ, हियय | |
| | वेद = वेअ, वेय | प्रसाद = पसाअ, पसाय | |

२. 'ह' श्रुती : 'ख, घ, थ, ध, फ, भ' ही व्यंजने अनाद्य व असंयुक्त असतील तर त्या व्यंजनाचा लोप होऊन 'ह' होतो. यालाच 'ह' श्रुती म्हणतात.

| | | | |
|---|---|---|---|
| १. ख = ह – | मेखला = मेहला | सुख = सुह | मुख = मुह |
| | नख = णह | शाखा = साहा | सखी = सही |
| २. घ = ह – | मेघ = मेह | राघव = राहव | लघु = लहु |
| ३. थ = ह – | रथ = रह | पथ = पह | कथा = कहा |
| | नाथ = णाह | यथा = जहा | |
| ४. ध = ह – | मधु = महु | मगध = मगह | बधिर = बहिर |
| | मधुर = महुर | दधि = दहि | विधि = विहि |
| ५. फ = ह – | विफल = विहल | मुक्ताफल = मुत्ताहल | सफल = सहल |
| ६. भ = ह – | स्वभाव = सहाव | लोभ = लोह | नभ = णह |
| | त्रिभुवन = तिहुयण | शुभ = सुह | प्रभू = पहू |

३. केव्हां केव्हां अनाद्य 'ट, ठ, थ, म' चा 'ढ' होतो.

| | | |
|---|---|---|
| ठ – पाठ = पाढ | पीठ = पीढ | कठोर = कढोर |
| थ – प्रथम = पढम | शिथिल = सिढिल | पृथ्वी = पुढवी |
| ट – शकट = सअढ/सयढ | विकट = विअढ/वियढ | |
| म – विषम = विसढ | | |

## (३) संयुक्त व्यंजनांचे (जोडाक्षरांचे) बदल

प्राचीन काळापासून महाराष्ट्री प्राकृत भाषेस सामान्यांची बोलीभाषा म्हणून संबोधले जाते. सामान्य लोकांना काही विशिष्ट व्यंजनांचे आणि जोडाक्षरांचे उच्चार करणे कठीण होते. त्यामुळे उच्चारणास सोप्या व्यंजनांचाच महाराष्ट्री प्राकृत भाषेत अधिक वापर केला गेलेला दिसून येतो. थोडक्यात उच्चारणास अवघड असलेल्या संस्कृतमधील व्यंजनाचा महाराष्ट्री प्राकृत भाषेत सोप्या वर्णामध्ये बदल केला जातो. त्यालाच व्यंजनांचे बदल म्हटले जाते. यामध्ये व्यंजनांचे द्‌वित्व करणे, सुलभीकरण करणे, अनुनासिकीकरण करणे, वर्णागम, वर्णलोप, वर्णबदल, वर्णविपर्यय, स्वरभक्ती इत्यादी अनेक प्रकारे जोडाक्षरांमध्ये बदल केला जातो.

१. **आद्य जोडाक्षरांचा लोप :** महाराष्ट्री प्राकृत भाषेत शब्दाच्या प्रारंभी केव्हाच जोडाक्षर येत नाही. जोडाक्षरातील कमी बलाच्या व्यंजनाचा लोप केला जातो.

| | | | |
|---|---|---|---|
| क्रम = कम | भ्रमण = भमण | प्रभात = पहाअ/पहाट | प्रथम = पढम |
| प्रभा = पहा | व्रत = वअ, वय | ध्वज = धअ | व्रण = वण |

२. **अनाद्य जोडाक्षरांतील** कमी बलाच्या व्यंजनांचा लोप करून कधी कधी अधिक बलाच्या व्यंजनाचे द्‌वित्व केले जाते. (अधिक बलाचे व्यंजन दोन वेळा लिहिले जाते.)

| | | | |
|---|---|---|---|
| भक्त = भत्त | भग्न = भग्ग/भाग | धर्म = धम्म/धाम | चक्र = चक्क/चाक |
| रक्त = रत्त | लग्न = लग्ग | कर्म = कम्म/काम | कर्ण = कण्ण/काण/कान |

३. **अनाद्य जोडाक्षरांतील** अधिक बलाच्या व्यंजनाचे द्‌वित्व न करता कधी कधी त्या वर्गातील प्रथम वर्णास द्‌वितीय आणि तृतीय वर्णास चतुर्थ व्यंजन जोडले जाते.

| | | | |
|---|---|---|---|
| व्याघ्र = वग्घ/वाघ | शब्द = सद्द | अर्थ = अत्थ | अर्ध = अद्ध |
| पथ्य = पत्थ | मुद्रा = मुद्दा | मूर्ख = मुक्ख | प्रस्तर = पत्थर |

४. **अनुनासिकीकरण :** महाराष्ट्री प्राकृतात केव्हा केव्हा जोडाक्षरांतील कमी बलाच्या व्यंजनाचा लोप करून (द्‌वित्व न करता) अनुस्वाराचा वापर केला जातो, याला अनुनासिकीकरण म्हणतात.

| | | |
|---|---|---|
| अश्रु = (अस्सु) अंसु | वक्र = (वक्क) वंक | वयस्स = वयं |

५. **तालव्यीकरण :** केव्हा केव्हा दंत्य (त्, थ्, द्, ध्) व्यंजनाऐवजी तालव्य (च्, छ्, ज्, झ्) व्यंजनाचा उपयोग केला जातो, त्यास तालव्यीकरण म्हणतात.

| | | |
|---|---|---|
| सत्य = (सत्त) सच्च | विद्या = विज्जा | पथ्य = पच्छ (पत्थ) |

६. **मूर्धन्यीकरण :** संयुक्त व्यंजनामध्ये दंत्य व्यंजने असतील तर त्यांच्या जागी मूर्धन्य व्यंजनांचा (ट्, ठ्, ड्, ढ्) वापर केला जातो. त्यास मूर्धन्यीकरण म्हणतात.

| | | |
|---|---|---|
| प्रतिमा = पडिमा | प्रथम = पढम | अर्ध = अड्ढ, अद्ध |
| प्रतिपन्न = पडिवण्ण | कृत = कड, कट | ऊर्ध्व = उड्ढ, उद्ध |

७. **वर्णागम :** संयुक्त व्यंजनाच्या उच्चार सुलभतेसाठी एखाद्या वर्णाचा लोप करून एखाद्या अ, इ, उ इत्यादींचे आगमन होते. त्यास वर्णागम म्हणतात.

| | | |
|---|---|---|
| स्त्री = इत्थी | इव = विय | उक्त = वुत्त |

८. **सवर्णलोप :** कधी कधी उच्चार सुलभतेसाठी समान उच्चारण असलेल्या वर्णातील (एकापुढे एक असतील तर) एकाचा लोप होतो. त्याला 'सवर्णलोप' म्हणतात.

हृदय = हिअय/हिअ/हिअअ | नववर = णवरा | नववरी = णवरी
उदुंबर = (उउंबर) उंबर | गुरराखी = गुराखी

९. **वर्णलोप :** घाईगडबडीने बोलत असताना केव्हा केव्हा (अनाद्य, आद्य) व्यंजनाचा लोप होतो.

देवकुल = (देवउल) देउल/देउळ | अरण्य = रण्ण/अरण्ण
राजकुल = (रायउल) राउल/राउळ | नूनं = नूणं, णूणं

१०. **वर्णविपर्यय :** केव्हा केव्हा बोलण्याच्या गडबडीत शब्दातील वर्णांचा क्रम बदलला जातो. त्याला वर्णविपर्यय म्हणतात.

वाराणसी = वाणारसी | अचलपुर = अलचपुर | आलाण = आणाल
महरट्ठ = मरहट्ठ | महारट्ठी = महरट्ठी/ मराठी/मऱ्हाटी

११. **स्वरभक्ति :** काही व्यंजनांचे उच्चारण करणे कठीण होते तेव्हा त्याच्या सुलभीकरणासाठी जोडाक्षर व्यंजने विभक्त केली जात. त्यास स्वरभक्ति म्हणतात.

रत्न = रयण | भार्या = भारिया | धर्म = धरम
कर्म = करम

१२. प्राकृतात केव्हा केव्हा ज्ञ = ण्ण होते.

संज्ञा = सण्णा | प्रज्ञा = पण्णा | सर्वज्ञ = सवण्णु

१३. प्राकृतात बहुधा 'श्न, स्न, ष्ण, त्स्न, न्ह = ण्ह' होतो.

प्रश्न = पण्ह | स्नान = ण्हाण | मध्यान्ह = मज्झण्ह
उष्ण = उण्ह | ज्योत्स्ना = जोण्हा

१४. केव्हा केव्हा प्राकृतात 'श्म, ष्म, ह्म, स्म, क्ष्म = म्ह' होतो.

काश्मीर = कम्हीर | उष्म = उम्ह | लक्ष्मण = लम्हण
विस्मय = विम्हअ | ब्राह्मण = बम्हण

१५. महाराष्ट्री प्राकृतात र्य, द्य = ज्ज होते.

आर्य = अज्ज | विद्या = विज्जा | कार्य = कज्ज
भार्या = भज्जा | मद्य = मज्ज | आद्य/अद्य = अज्ज

१६. प्राकृतात क्म, त्म = प्प होते.

रुक्मिन् = रुप्पिण | आत्मा = अप्पा

१७. प्राकृतात त्स, प्स = च्छ होतो.

वत्स = वच्छ | अप्सरा = अच्छरा | उत्सव = उच्छव

# २. संधी

**प्रस्तावना :**

प्रत्येक भाषेच्या व्याकरणामध्ये संधीस महत्त्वपूर्ण स्थान असते. संधीमुळे शब्दांचे आकार संक्षिप्त होण्यास मदत होते. तर संधिविग्रहामुळे शब्दोच्चारास सुलभता येते. संधिनियमानुसार संधीचे (१) स्वरसंधी, (२) प्रकृतिभावसंधी, (३) उद्वृत्तस्वरसंधी, (४) अव्ययस्वरसंधी, (५) व्यंजनसंधी असे पाच प्रकार (विभाग) पडतात.

दोन स्वर किंवा एक स्वर/ एक व्यंजन किंवा व्यंजन-व्यंजन एकत्रित आले तरी संधी होतो. तसेच संस्कृतमध्ये विसर्ग आणि स्वर किंवा व्यंजन, एकत्र आले तरीही संधी होते.

महाराष्ट्री प्राकृतात विसर्ग नसल्याने प्राकृतात विसर्गसंधी होत नाही. तसेच महाराष्ट्री प्राकृत ही बोलीभाषा असल्याने व सुलभीकरण हे बोली भाषेचे प्रमुख वैशिष्ट्य असल्याने महाराष्ट्री प्राकृतात बऱ्याच ठिकाणी संधी होतोच असे नाही. तरीही प्राकृतातील सर्व संधिनियमाचा परिचय करून घेणे आवश्यक आहे.

दोन वर्णांच्या एकत्रित येण्याने जो बदल होतो त्यास संधी असे म्हणतात.

## स्वर-संधी

स्वर-संधीचे (१) दीर्घसंधी, (२) गुणसंधी, (३) ऱ्हस्व-संधी, (४) संधि-निषेध, (५) स्वरलोप संधी इत्यादी प्रकार आहेत.

### (1) दीर्घसंधी

**अ)** दोन सजातीय स्वर एकत्र आले असता त्यांचे दीर्घ स्वरांमध्ये रूपांतर होते. म्हणजेच (अ) अ अथवा आ या स्वरापुढे अ किंवा आ हे स्वर आल्यास त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर 'आ' (दीर्घ) मध्ये होते. (अ + अ = अ/आ + आ = आ). उदा. –

जीव + अजीव = जीवाजीव
इह + आगमण = इहागमण
गाम + अणुग्गाम = गामाणुग्गाम
कला + आअरिय = कलाअरिय
रअण + आअरो = रअणाअरो
तहा + अवि = तहावि
राआ + अभिसेओ = राआभिसेओ
जहा + अवि = जहावि
दुह + आवह = दुहावह
जिण + आलअ = जिणालअ
धम्म + अधम्म = धम्माधम्म
गण + अहिवइ = गणाहिवइ
विज्जा + आलअ = विज्जालअ

अ + आ = आ होतो. परंतु दुसऱ्या शब्दातील स्वराच्या पुढे जर अनुस्वार किंवा जोडाक्षर असेल तर त्याचे दीर्घ स्वरात रूपांतर न होता ऱ्हस्व 'अ' होतो. उदा –

भिक्ख + अट्ठा = भिक्खट्ठा
दव + अग्गि = दवग्गि
जीविअ + अट्ठा = जीविअट्ठा
जम्म + अंतर = जम्मंतर
ण + अत्थि = णत्थि
रत्त + अच्छ = रत्तच्छ
मरण + अंतर = मरणंतर
कोह + अग्गि = कोहग्गि

**ब)** इ अथवा ई च्या पुढे इ किंवा ई आल्यास त्याचे रूपांतर दीर्घ 'ई' मध्ये होते. उदा. –

मुणि + ईसर = मुणीसर
णंदी + ईसर = णंदीसर
पुहवी + ईसर = पुहवीसर
मुणि + इणो = मुणीणो
दहि + ईसर = दहीसर
लच्छी + ईसरो = लच्छीसरो
कवि + ईसर = कवीसर

इ + ई = ई होतो. परंतु दुसऱ्या शब्दातील स्वराच्या पुढे जर अनुस्वार किंवा जोडाक्षर आले तर त्याचे दीर्घ स्वरात रूपांतर न होता ऱ्हस्व 'इ' होतो. उदा. –

मुणि + इन्द = मुणिन्द
कवि + इन्द = कविन्द
महि + इन्द = महिन्द

**क)** उ अथवा ऊ या स्वरापुढे 'उ किंवा ऊ' हे स्वर आले असता त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर दीर्घ (ऊ) स्वरामध्येच होते. उदा. – बहू + उवयार = बहूवयार

साहू + ऊसव = साहूसव
साहु + उत्तम = साहूत्तम
महू + ऊसव = महूसव
बहू + उदगं = बहूदगं
वहू + ऊसव = वहूसव
धेणु + ऊसवो = धेणूसवो

उ + ऊ = ऊ होतो. परंतु पहिल्या शब्दातील स्वराच्या पुढे जोडाक्षर किंवा अनुस्वार आल्यास त्याचे रूपांतर दीर्घ (ऊ) स्वरामध्ये न होता 'ऱ्हस्व' स्वरामध्ये (उ) च होते. उदा. –

साहू + उत्तं = साहुत्तं
दूर + उज्झिया = दूरुज्झिया

## (२) गुणसंधी

**अ)** अ अथवा आ या स्वराच्या पुढे 'इ किंवा ई' हे स्वर आल्यास त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर 'ए' मध्ये होते.

उदा. –

राअ + इसि = राएसि
जहा + इव = जहेव
महा + इसि = महेस
णर + ईसर = णरेसर
तेण + इव = तेणेव
दम + ईसर = दमेसर
इह + इव = इहेव
खअर + ईसर = खअरेसर

अ + इ = 'ए' होतो. परंतु पहिल्या शब्दातील स्वराच्या पुढे जोडाक्षर किंवा अनुस्वार असेल तर त्याचे रूपांतर 'ए' मध्ये न होता ऱ्हस्व 'इ' स्वरामध्ये रूपांतर होते.

उदा. –

णर + इंद = णरिंद (णरेंद)
ण + इच्छइ = णिच्छइ (णेच्छइ)
महा + इन्द = महिंद (महेंद)
जह + इच्छिइ = जहिच्छिइ
सुर + इन्द = सुरिंद
चरण + इंधण = चरणिंधण
देव + इन्द = देविंद
महा + इड्ढिय = महिड्ढिय
जिण + इन्द = जिणिंद

ब) अ अथवा आ या स्वरांच्या पुढे 'उ अथवा ऊ' हे स्वर आल्यास त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर 'ओ' मध्ये होते.

तस्स + उवरि = तस्सोवरि
किस + उअरी = किसोअरी
जहा + उइअं = जहोइअं
महा + उवआर = महोवआर
महा + ऊसव = महोसव
जहा + उचिअ = जहोचिअ
एक + ऊण = एकोण
णीसास + उसास = णीसासोसास
मास + उववास = मासोववास

अ + उ = ओ होतो. परंतु पहिल्या शब्दातील स्वराच्या पुढे जोडाक्षर किंवा अनुस्वार असेल तर 'ओ' न होता ऱ्हस्व (उ) स्वरात रूपांतर होईल.

उदा. –

णअर + उज्जाण = णअरुज्जाण
पुरिस + उत्तम = पुरिसुत्तम
भवण + उज्जाण = भवणुज्जाण
उत्तम + उत्तम = उत्तमुत्तम
रअण + उज्जल = रअणुज्जल
कुल + उब्भव = कुलुब्भव
तेण + उत्तं = तेणुत्तं
भअ + उव्विग्ग = भउव्विग्ग/भयुव्विग्ग
सव्व + उत्तम = सव्वुत्तम
रत्त + उप्पल = रत्तुप्पल

क) 'अ अथवा आ' या स्वराच्या पुढे 'ए' हा स्वर आल्यास त्याचे रूपांतर 'ए' मध्येच होते. उदा. –

जहा + एव = जहेव
च + एव = चेव
तहा + एव = तहेव
इह + एव = इहेव
एक + एक = एकेक
केण + एव = केणेव
ण + एव = णेव

पहिल्या शब्दातील शेवटच्या वर्णावर अनुस्वार असेल तर प्रथम त्याचा 'म'असा बदल करून नंतर संधिनियमानुसार संधी केला जातो.

उदा. –

एकं + एक = एकमेक
किं + अत्थ = किमत्थ/किमेत्थ
एक्कं + एक्क = एक्कमेक्क
तं + आसणं = तमासणं
किं + एस = किमेस
जुत्तं + एअं = जुत्तमेअं
तं + एव = तमेव
एवं + आइ = एवमाइ
जं + एव = जमेव
विवेगं + एउं = विवेगमेउं
अण्ण + अण्ण = अण्णमण्ण

## (३) स्वरलोप संधी

केव्हा केव्हा संधी करतेवेळी दुसऱ्या शब्दातील प्रथम स्वराचा लोप करून 'य, र, म' या बाह्य वर्णांचे आगम होऊन संधी केला जातो. यालाच स्वरलोप संधी म्हणतात.

अ) 'र' आगम संधी :

धि + अत्थु = धिरत्थु
पुण + अवि = पुणरवि
णि + अंतर = णिरंतर
दु + आचारिणी = दुराचारिणी
णि + आनंद = णिराणंद
दु + अंगुल = दुरंगुल
णि + अणुकंपा = णिराणुकंपा
चउ + अंगुलं = चउरंगुल
णि + उपमा = निरुपमा

ब) 'य' आगम संधी :

दु + अंगुल = दुयंगुल
त + अणंतरं = तयणंतर
त + आसन्ने = तयासन्ने

क) 'म' आगम संधी :

भवइ + आइणो = भवइमाइणो

## (४) अव्यय–स्वर–संधी

अव्ययात पहिला स्वर आल्यास त्याचा विकल्पाने लोप होतो.

केण + अपि = केणावि, केण वि, केणापि (येथे 'अ'चा लोप झाला.)

किं + अपि = किमवि, किं पि

सुअणा + अपि = सुअणा वि

तं + अपि = तं पि

पुरिसो + इति = पुरिसो त्ति

दिट्ठं + इति = दिट्ठं ति
पढमं + इति = पढमं ति
तहा + इति = तहत्ति
दोसइ + इति = दोसइ ति
णत्थि + इति = णत्थि त्ति
दिट्ठं + इति = दिट्ठं ति

## (५) द्वित्व संधी

त + कम्म = तक्कम्मं
णि + णेह = णिण्णेह
त + खणं = तक्खणं
णि + करुणा = णिक्करुणा
स + भिक्ख = सब्भिक्ख
दु + जणो = दुज्जणो
जाव + जीव = जावज्जीव

## ३. काळ (Tense)

महाराष्ट्री प्राकृत भाषेत वर्तमानकाळ, भूतकाळ आणि भविष्यकाळ हे तिन्ही काळ असले तरीही प्राकृतमध्ये वर्तमानकाळ आणि भविष्यकाळाचाच अधिक वापर होत असलेला दिसून येतो. भूतकाळ फार कमी प्रमाणात वापरला जातो. भूतकाळाऐवजी प्राधान्याने वर्तमानकाळाचाच उपयोग केला जातो.

### (१) वर्तमानकाळ (Present Tense)

१) महाराष्ट्री प्राकृत भाषेत मूळ क्रियांना काळाचे प्रत्यय जोडून क्रियापदाची विविध रूपे तयार केली जातात. त्यांना धातुसाधिते म्हणतात.

२) धातूंचे (१) अ, (२) आ, ए, ओकारांत असे दोन गट पाडण्यात आलेले दिसून येतात. धातूंच्या अन्त्य अक्षरामध्ये असणाऱ्या स्वरावरून धातूंचे हे गट पाडलेले दिसून येतात. उदा. –

भण (यातील अन्त्य 'ण' च्या उच्चारातून 'अ' स्वराचा उच्चार होतो म्हणून) हा धातू अकारान्त आहे

भण 'अ'कारान्त धातू आहे.

कर 'अ'कारान्त धातू आहे.

गा – (याच्या उच्चारात 'आ' हा स्वर आहे म्हणून) आकारान्त धातू

जा – आकारान्त धातू

दे – एकारान्त धातू

णे/ने – एकारान्त धातू

हो – ओकारान्त धातू

वरील धातूंना वर्तमान, भविष्यकाळाचे प्रत्यय जोडून क्रियापदाचे रूप तयार केले जाते.

**नियम :** अकारान्त धातूंना वर्तमानकाळाचे प्रथम पुरुषाचे प्रत्यय जोडतांना 'अकारान्ताचे आकारान्तामध्ये (अ=आ) रूपांतर करून नंतर प्रत्यय जोडले जातात. (मात्र इतर धातूंमध्ये असे होत नाही) उदा. पास = पासा= पासामि

**प्रत्यय**

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | मि (आहे) | मो (आहेत) |
| द्वितीय पुरुष | सि (आहेस) | ह (आहात) |
| तृतीय पुरुष | इ (आहे) | अन्ति/न्ति (आहेत) |

**'पास' (अकारान्त धातू) चालविणे**

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | पासामि (मी पाहतो) | पासामो (आम्ही पाहतो) |
| द्वितीय पुरुष | पाससि (तू पाहतोस) | पासह (तुम्ही पाहता) |
| तृतीय पुरुष | पासइ (तो पाहतो) | पासन्ति (ते पाहतात) |

(**सूचना :** भण, सुण, खण, पढ, गच्छ, रम, इ. सर्व अकारान्त धातू वरीलप्रमाणे चालतात)

### ‘जा’ (आकारान्त धातू)

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | जामि | जामो |
| द्‌वितीय पुरुष | जासि | जाह |
| तृतीय पुरुष | जाइ | जायन्ति/जाअंति |

### दे = एकारान्त धातू

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | देमि | देमो |
| द्‌वितीय पुरुष | देसि | देह |
| तृतीय पुरुष | देइ | देंति |

## (२) भविष्यकाळ (Future Tense)

**नियम :**

१) वर्तमानकाळाच्या प्रत्ययाच्या अगोदर ‘स्स’ चा वापर केला की भविष्यकाळाचे प्रत्यय तयार होतात. (उदा. स्सामि, स्सामो)

२) भविष्यकाळाचे प्रत्यय लावण्यापूर्वी अकारान्त धातूच्या शेवटच्या ‘अ’ चे इकारामध्ये रूपांतर केले जाते. (मात्र इतर धातूंना कोणताही बदल न करता प्रत्यय जोडले जातात.)

३) भविष्यकाळाचे प्रत्यय दोन प्रकारचे आहेत.

### i) पहिल्या गटाचे प्रत्यय :

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | स्सं, स्सामि | स्सामो |
| द्‌वितीय पुरुष | स्ससि | स्सह |
| तृतीय पुरुष | स्सइ | स्संति |

### ‘पास’ अकारान्त धातू चालविणे

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | पासिस्सं, पासिस्सामि | पासिस्सामो |
| द्‌वितीय पुरुष | पासिस्ससि | पासिस्सह |
| तृतीय पुरुष | पासिस्सइ | पासिस्संति |

(**सूचना :** कर, भण, खण, पढ, सुण, रम इ. धातू वरीलप्रमाणे चालतात.)

### 'जा' आकारान्त धातू चालविणे

| | | |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | जाइस्सं, जाइस्सामि | जाइस्सामो |
| द्‌वितीय पुरुष | जाइस्ससि | जाइस्सह |
| तृतीय पुरुष | जाइस्सइ | जाइस्संति |

(**सूचना :** गा, खा या धातूंना वरीलप्रमाणे (कोणताही बदल न होता सरळ) प्रत्यय लावून भविष्यकाळाची रूपे तयार केली जातात.)

### 'दे' एकारान्त धातू चालविणे

| | | |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | देस्सं, देस्सामि | देस्सामो |
| द्‌वितीय पुरुष | देस्ससि | देस्सह |
| तृतीय पुरुष | देस्सइ | देस्संति |

(**सूचना :** णे, घे, दे, हो या धातूंना वरीलप्रमाणे (कोणताही बदल न होता सरळ) प्रत्यय लावून भविष्यकाळाची रूपे तयार केली जातात.)

**ii) भविष्यकाळाचे दुसऱ्या गटाचे प्रत्यय :**

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | हामि, हिमि | हामो, हिमो |
| द्‌वितीय पुरुष | हिसि | हिह |
| तृतीय पुरुष | हिइ | हिन्ति/हिंति |

(**सूचना :** अकारान्त धातूचे इकारान्तामध्ये रूपांतर करून प्रत्यय जोडले जातात.)

## (३) भूतकाळ (Past Tense)

महाराष्ट्री प्राकृतमध्ये भूतकाळाचा उपयोग अत्यंत कमी प्रमाणात केला जातो. भूतकाळाऐवजी वर्तमानकाळाचाच वापर अधिक केलेला दिसून येतो.

### प्रत्यय

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | इत्था | इंसु |
| द्‌वितीय पुरुष | इत्था | इंसु |
| तृतीय पुरुष | इत्था | इंसु |

उदा. – भासित्था, गच्छित्था, गच्छिंसु, भक्खिंसु

१) वरील प्रत्ययाशिवाय ‘ईअ’ हा प्रत्यय अकारान्त धातूला लावूनही भूतकाळाची रूपे तयार करतात.

| | |
|---|---|
| उदा. पुच्छ + ईअ = पुच्छीअ | पास = पासीअ |
| हण = हणीअ | खण = खणीअ |

२) अकारान्तेतर म्हणजे आ, ए, ओ, या धातूंना ‘सी, ही, हीअ’ इत्यादी प्रत्यय लावून भूतकाळी रूप तयार करतात.

उदा. जा = जासी, जाही, जाहीअ

खा = खासी, खाही, खाहीअ

दे = देसी, देही, देहीअ

हो = होसि, होही, होहीअ

३) भूतकाळाची अनियमित रूपे : आसि, आसी

उदा. वय = वआसि, वआसी

## (४) आज्ञार्थ (Imperative)

१) आज्ञा, हुकूम, विनंती करतेवेळी आज्ञार्थाचा उपयोग केला जातो.

२) आज्ञार्थाच्या प्रत्ययांत ‘उकार’ आढळतो.

३) फक्त अकारान्त धातूला ‘मु, मो, हि’ हे आज्ञार्थांचे प्रत्यय लावतेवेळी अकाराचे आकारान्तमध्ये रूपांतर करून नंतर प्रत्यय जोडले जातात.

४) द्वितीय पुरुषाच्या एकवचनामध्ये विकल्पाने प्रत्ययाचा लोप होतो.

### प्रत्यय

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | मु | मो |
| द्वितीय पुरुष | (प्रत्यय लोप), सु, हि | ह |
| तृतीय पुरुष | उ | न्तु |

### ‘पास’ अकारान्त धातू चालविणे

| | | |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | पासामु | पासामो |
| द्वितीय पुरुष | पास, पाससु, पासाहि | पासह |
| तृतीय पुरुष | पासउ | पासंतु |

(**सूचना :** कर, हस, भण, सुण, खण, रम इ. अकारान्त धातूंची रूपे वरीलप्रमाणे चालतात.)

### 'जा' आकारान्त धातू चालविणे

| | | |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | जामु | जामो |
| द्वितीय पुरुष | जा, जासु, जाहि | जाह |
| तृतीय पुरुष | जाउ | जायंतु |

## (५) ल्यबंत (पूर्वकालवाचक) (Gerund)

१) जेव्हा, करून, घेऊन, खाऊन, जाऊन, येऊन अशा क्रियापदाचा उपयोग करून दोन वाक्ये जोडली जातात तेव्हा ल्यबंताचा उपयोग केला जातो.

२) पुरुष, लिंग, वचन यांमुळे ल्यबन्तात कोणतेही बदल होत नाहीत.

३) फक्त अकारान्त धातूलाच 'इऊण' हा प्रत्यय लावून ल्यबंताचे रूप तयार केले जाते.

| | | |
|---|---|---|
| उदा. पास + इऊण = पासिऊण | कह = कहिऊण | धर = धरिऊण |
| भण = भणिऊण | सुण = सुणिऊण | गच्छ = गच्छिऊण |
| खण = खणिऊण | पढ = पढिऊण | रम = रमिऊण |

उदा. रामो आमं भक्खिऊण गेहं गच्छइ। राम आंबा खाऊन घरी जातो.

४) आकारान्त, एकारान्त, ओकारान्त धातूना 'ऊण' प्रत्यय जोडून ल्यबंताचे रूप तयार केले जाते.

जा + ऊण = जाऊण

| | | |
|---|---|---|
| गा = गाऊण | खा = खाऊण | दे = देऊण |
| घे = घेऊण | णे = णेऊण | हो = होऊण |

## (६) तुमंत (हेत्वर्थ) (Infinitive)

१) तुमंताचा उपयोग वाक्यात 'साठी, करिता' या अर्थाने केला जातो.

२) तुमंतामध्ये लिंग, वचन, विभक्ती यांनुसार बदल होत नाहीत.

३) अकारान्त धातूला 'इउं' हा प्रत्यय लावून तुमंताचे रूप तयार केले जाते.

| | | |
|---|---|---|
| उदा. पास + इउं = पासिउं, | भण = भणिउं | सुण = सुणिउं |
| कर = करिउं | पढ = पढिउं | खण = खणिउं |

उदा. राम आंबा खाण्यासाठी बागेत जातो.

रामो आमं भक्खिउं उज्जाणं गच्छइ।

४) आकारान्त, एकारान्त, ओकारान्त धातूंना 'उं' हा प्रत्यय लावून तुमंताचे रूप केले जाते.

| | | |
|---|---|---|
| जा = जाउं | गा = गाउं | खा = खाउं |
| दे = देउं | घे = घेउं | हो = होउं |

## ४. विभक्तिप्रत्यय व उपयोग

**नियम :**

१) विभक्तिप्रत्यय फक्त नाम आणि सर्वनामांनाच लावले जातात.

२) विभक्तिप्रत्यय धातूंना (क्रियापदांना) लावले जात नाहीत.

३) प्राकृतात चतुर्थी/षष्ठीचे प्रत्यय समानच आहेत. चतुर्थीऐवजी षष्ठी विभक्ती प्रत्ययाचा उपयोग करतात.

### (I) विभक्तिप्रत्ययांचे उपयोग

१) **प्रथमा (कर्ता) विभक्ती :** वाक्यातील कर्ता प्रथमा विभक्तीने दर्शविला जातो. उदा. (१) **रामो** आमं खाइ। (२) **लया** पोत्थअं पढइ।

२) **द्विवितीया (कर्म) विभक्ती :** वाक्यातील कर्म द्विवितीया विभक्तीने दर्शविले जाते. उदा. रामो **आमं** खाइ।

३) **तृतीया (करण) विभक्ती :** वाक्यातील क्रिया कोणाकडून घडली ते दर्शविण्यासाठी तृतीया विभक्तीचा वापर केला जातो. याला कर्मणिप्रयोग असे म्हणतात. उदा. **रामेण** आमो खाइओ।

४) **चतुर्थी/षष्ठी (संप्रदान संबंध) विभक्ती :** (१) रामो **देवाणं** णमइ । (चतुर्थी)

संबंध दर्शविण्यासाठी षष्ठीचा उपयोग करतात. उदा. (१) रामो **दसरहस्स** पुत्तो । (२) रामो लक्खणस्स भाउ अत्थि ।

५) **पंचमी (अपादान) विभक्ती :** वाक्यांमध्ये 'पासून, ऊन-हून' असा अर्थ अपेक्षित असेल तेव्हा पंचमीचा उपयोग करतात. उदा. (१) रामो एगं **गामाउ/गामाओ** बीयं गामं गच्छइ।

(२) माला **गिहाउ/गिहाओ** गच्छइ।

६) **सप्तमी (अधिकरण) विभक्ती :** ठिकाण/स्थळ (मध्ये, आत) तसेच वेळ दर्शविण्यासाठी सप्तमीचा उपयोग केला जातो. उदा. (१) रामो **उज्जाणम्मि/उज्जाणे** चिट्ठइ। (२) सीमा **मंदिरम्मि** गच्छइ। (३) अग्गिमे **मासे** परिक्खा अत्थि।

७) **संबोधन विभक्ती :** हाक मारणे, निमंत्रण देणे, बोलावणे इ.साठी संबोधन विभक्तीचा उपयोग करतात. उदा. **हे राम, हे माला, हे माले**

### (II) प्राकृत वाक्यरचना

१) महाराष्ट्री प्राकृतभाषेत वाक्यरचना करण्यासाठी काळाचे प्रत्यय, सर्वनामाचे प्रत्यय, विभक्तीचे प्रत्यय आणि प्राकृत शब्दांचा संग्रह अत्यंत आवश्यक आहे.

२) कोणत्याही भाषेतील वाक्यरचना करतेवेळी कर्त्याचे जे लिंग, वचन असेल त्याप्रमाणे क्रियापदाचे लिंग, वचन वापरणे आवश्यक असते.

३) कर्त्याच्या लिंग-वचनानुसार कर्माला विभक्तिप्रत्यय जोडण्यात येतात.

४) वाक्यात व्यक्तीचे, वस्तूचे नाव असेल तेंव्हा तृतीयपुरुषी क्रियापदाचा वापर केला जातो.

उदा. राम अत्यंत पराक्रमी योद्धा आहे. **रामो अच्चंतो परक्कमी जोद्धो अत्थि।**

१) या वाक्यात 'राम' हा कर्ता आहे. त्याची प्रथमा विभक्ती (प्रत्यय) आहे.

## (III) विभक्ती प्रत्यय

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | ओ (कर्ता) | आ |
| द्‌वितीया | ं (अनुस्वार) (कर्म) | आ |
| तृतीया | एण, एणं<br>(ने, कडून, च्या करवी) | एहि, एहिं |
| चतुर्थी | स्स (करिता,साठी) | आण, आणं |
| पंचमी | आउ, आओ<br>(पासून, ऊन, हून) | आओ, एहिंतो |
| षष्ठी | स्स (चा, ची, चे) | आण, आणं |
| सप्तमी | ए, एम्मि (मध्ये, आत) | एसु, एसुं |
| संबोधन | अ | आ |

## ५. नाम

### (१) 'गणेस', अकारान्त पुल्लिंगी नाम

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | गणेसो | गणेसा |
| द्‌वितीया | गणेसं | गणेसा |
| तृतीया | गणेसेण, गणेसेणं | गणेसेहि, गणेसेहिं |
| पंचमी | गणेसाउ, गणेसाओ | गणेसाउ, गणेसाओ, गणेसाहिंतो |
| चतुर्थी/षष्ठी | गणेसस्स | गणेसाण, गणेसाणं |
| सप्तमी | गणेसे, गणेसम्मि, गणेसंसि | गणेसेसु, गणेसेसुं |
| संबोधन | गणेस | गणेसा |

(**सूचना :** देव, राम, साम, गोविंद, चंद इ. सर्व अकारान्त पुल्लिंगी नामे 'गणेस' या नामाप्रमाणे चालवावीत.)

### (२) 'वण', अकारान्त नपुंसकलिंगी नाम

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | वणं | वणाइं, वणाणि |
| द्‌वितीया | वणं | वणाइं, वणाणि |
| संबोधन | वणं | वणाइं, वणाणि |

(**सूचना :** (१) बाकीच्या विभक्ती पुल्लिंगी 'गणेस'प्रमाणे चालतात, (२) 'वण' या नपुंसकलिंगी नामाप्रमाणे इतर सर्व नपुंसकलिंगी नामे चालतात.)

(**सूचना :** पुप्फ, पण्ण, घर, पुण्ण, उज्जाण इत्यादी शब्द 'वण' प्रमाणे चालवावेत.)

### (३) 'माला', आकारान्त (स्त्रीलिंगी) नाम

| कारक | एकवचन | अनेकवचन |
| --- | --- | --- |
| प्रथमा | माला | माला, मालाओ |
| द्वितीया | मालं | माला, मालाओ |
| तृतीया | मालाए | मालाहि, मालाहिं |
| चतुर्थी | मालाए | मालाण, मालाणं |
| पंचमी | मालाए, मालाओ | मालाहिन्तो |
| षष्ठी | मालाए | मालाण, मालाणं |
| सप्तमी | मालाए | मालासु, मालासुं |
| संबोधन | माला, माले | माला, मालाओ |

(**सूचना :** याप्रमाणेच साला, बाला, पूया, देवया, गंगा इत्यादी आकारांत स्त्री शब्द चालवावेत.)

### (४) 'मुणि', इकारान्त पुल्लिंगी नाम

| कारक | एकवचन | अनेकवचन |
| --- | --- | --- |
| प्रथमा | मुणी | मुणिणो, मुणीओ |
| द्वितीया | मुणिं | मुणिणो, मुणीओ |
| तृतीया | मुणिणा | मुणीहि, मुणीहिं |
| चतुर्थी | मुणिणो, मुणिस्स | मुणीण, मुणीणं |
| पंचमी | मुणिणो, मुणिओ | मुणीहिन्तो |
| षष्ठी | मुणिणो, मुणिस्स | मुणीण, मुणीणं |
| सप्तमी | मुणिंसि, मुणिम्मि | मुणीसु, मुणीसुं |
| संबोधन | मुणि | मुणिणो, मुणीओ |

(**सूचना :** याप्रमाणेच गिरि, मणि, अग्गि, इसि, विहि, पइ, कइ इत्यादी इकारांत पुल्लिंग शब्द चालवावेत.)

### (५) 'साहु', उकारान्त पुल्लिंगी नाम

| कारक | एकवचन | अनेकवचन |
| --- | --- | --- |
| प्रथमा | साहू | साहुणो, साहवो |
| द्वितीया | साहुं | साहूणो, साहवो |
| तृतीया | साहूणा | साहूहि, साहूहिं |

| | | |
|---|---|---|
| चतुर्थी | साहुणो, साहुस्स | साहूण, साहूणं |
| पंचमी | साहुणो, साहुओ | साहूहिंतो |
| षष्ठी | साहुणो, साहुस्स | साहूण, साहूणं |
| सप्तमी | साहुंसि, साहुम्मि | साहुसु, साहुसुं |
| संबोधन | साहु | साहुणो, साहवो |

(**सूचना :** याप्रमाणेच वाउ, भाणु, पहु, मच्चु, बंधु इत्यादी अन्य उकारांत पुल्लिंग शब्द चालवावेत.)

## (६) अनियमित चालणारे शब्द

संस्कृतमधील ऋकारान्त व इतर व्यंजनान्त शब्दांवरून महाराष्ट्री प्राकृतात जे शब्द येतात त्यांना अनियमित शब्द म्हणतात. यामध्ये संबंधदर्शक गट आणि कर्तृवाचक शब्दांचा गट असे दोन प्रकार आहेत.

उदा. १) पितृ = पिउ  २) मातृ = माउ, माइ  ३) कर्तृ = कत्तु,  ४) दातृ = दाउ, दाइ

### i) राआ/राया (पु. नाम)

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | राआ, राया, राओ | राआणो, राइणो, रायाणो |
| द्‌वितीया | राआणं, रायं, राइणं | राआणो, राइणो, रण्णो |
| तृतीया | राइणा, रण्णा, राएण | राईहि, राईहिं |
| चतुर्थी | राइणो, रण्णो, राअस्स | राईण, राईणं |
| पंचमी | राइणो, रण्णो | राईहिंतो, राईसुंतो |
| षष्ठी | राइणो, रण्णो, राअस्स | राईण, राईणं |
| सप्तमी | राइम्मि, | राईसु, राईसुं |
| संबोधन | राआ, राअ, राअं | राआणो, राईणो |

### ii) माउ (स्त्री) नाम

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | माआ/माअरा | माअरा/माअराओ/माऊ |
| द्‌वितीया | माअरं/माअं | माअरा/माअराओ/माऊ |
| तृतीया | माआए, माऊए, माआइ | माआहि, माआहिं, माअराहिं |
| चतुर्थी | माआए, माउए, माअराअ | माउए, माईणं, माअराणं |
| पंचमी | माऊए, माऊइ, माआउ | माऊहिंतो, माईहिंतो, माऊसुंतो |

| | | |
|---|---|---|
| षष्ठी | माआए, माउए | माऊए, माईणं, माअराणं |
| सप्तमी | माआए, माउए | माउसुं, माईसुं |
| संबोधन | माआ/माया | माअरा, माआओ, माआ |

### iii) पिउ (पिता) पु. नाम

| **कारक** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | पिआ/पिया, पिअरो | पिअरा/पियरा, पिअओ |
| द्‌वितीया | पिअरं/पियरं | पिअरा, पियरे, पियरा, पिउणो |
| तृतीया | पिअरेण, पिअरेणं, पिउणा | पिअरेहि, हिं, पिउहि, पिइहिं |
| चतुर्थी | पिअरस्स, पिउस्स, पिउणो | पिअराण, णं, पिऊणं, पिईणं |
| पंचमी | पिआराओ, पिउणो | पिअराहिंतो, पिऊहिंतो, पिइहिंतो |
| षष्ठी | पिअरस्स, पिउस्स, पिउणो | पिअराण, णं, पिऊणं, पिईणं |
| सप्तमी | पिउम्मि, पिअरे, पियरम्मि | पिअरेसु, सुं, पिऊसुं, पिईसुं |
| संबोधन | पिअ, पिअर/पिय, पियर | पिअरो/पियरा |

(**सूचना :** भाउ, जामाउ, अम्मपिउ, मायापिउ, इ. शब्द 'पिउ' प्रमाणे चालतात.)

### iv) कत्तु (कर्तृ) पु. उकारान्त नाम

| **कारक** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | कत्ता, कत्तारो | कत्तारो, कत्तारा, कत्ता |
| द्‌वितीया | कत्तारं | कत्तारो, कत्तारा, कत्ता |
| तृतीया | कत्तारेण, कत्तारेणं | कत्तारेहि, कत्तारेहिं |
| चतुर्थी/षष्ठी | कत्तारस्स, कत्तुणो | कत्ताराण, णं |
| पंचमी | कत्ताराओ | कत्तारेहिंतो |
| षष्ठी | कत्तारस्स, कत्तुणो | कत्ताराण, णं |
| सप्तमी | कत्तारे, कत्तारम्मि | कत्तारेसु, सुं |
| संबोधन | कत्ता | कत्तारो, कत्तारा |

(**सूचना :** कत्तु, दाउ, नेउ हे शब्द 'साहु' प्रमाणे चालतात.)

# ६. सर्वनाम

प्राकृत, संस्कृत व मराठीतील सर्वनामे तुलनात्मक अशी पुढीलप्रमाणे.

| | एकवचन | अनेकवचन | |
|---|---|---|---|
| प्र.पु. | अहं, हं (अहम्)= मी | वयं, अम्हे (वयम्, आवाम्) आम्ही | |
| द्वि.पु. | तुं, तुमं (त्वम्) तू | तुम्हे, तुब्भे, तुज्झे (युवाम्, युयम्) तुम्ही | |
| तृ.पु. | सो (सः) तो (पुं.) | ते (तौ) ते | |
| | सा (सा) ती (स्त्री.) | ता (ताः) त्या | |
| | तं (तत्) ते (नपुं.) | ताणि (तानि) ती | |
| | को = कोण (पुं.) | काइं = कोणती | केरिसं = कशा प्रकारे |
| | का = कोण (स्त्री) | के = कोणते | |
| | तव = तुझा, तुझी, तुझे | मम = माझा, माझी, माझे | |
| | इमो, एसो = हा (पुं.) | इमं = हे (नपुं.) | एए = हे (पुं.) |
| | इमा, एसा = ही (स्त्री) | इमाइ = ही (स्त्री) | |
| | एयस्स = याचा (पुं.) | अम्हाणं = आमचा, आमची, आमचे | |
| | एयाए = हिचा (स्त्री) | | |

## (१) दर्शक सर्वनामे व विभक्ती

१) एय (एतद्) हा, ही, हे

२) इम (इदम्) हा, ही, हे

३) अमु (अदस्) हा, ही, हे

### एय (एतद्) हा (पुं.)

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | एस, एसो | एए |
| कर्म (द्वि.) | एअं/एयं | एए |
| करण (तृ.) | एएण, एएणं | एएहि, एएहिं |
| संप्रदान (च./ष.) | एअस्स | एएसिं, एआण, एयाणं |
| अपादान (पं.) | एआओ | एएहिन्तो |
| संबंध (ष.) | एअस्स | एएसिं, एआण, एयाणं |
| अधिकरण (स.) | एयंसि, एयम्मि | एएसु, एएसुं |

**एय (एतद्) स्त्री (ही)**

| | | |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | एसा | एआ, एया, एयाओ, एईओ |
| कर्म (द्वि.) | एयं | एआओ, एईओ |
| करण (तृ.) | एआए | एआहि, एआहिं |
| संप्रदान (च./ष.) | एअस्स | एएसिं, एआण, एआणं |
| अपादान (पं.) | एआओ | एयाहिन्तो |
| संबंध (ष.) | एअस्सं | एएसिं, एआण, एआणं |
| अधिकरण (स.) | एआए | एआसु, एआसुं |

**इम (इदम्) पुं. 'हा'**

| | | |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | अयं, इमो, मे | इमे |
| कर्म (द्वि.) | इमं | इमे, इमा |
| करण (तृ.) | इमेण, इमेणं, इमिणा, | इमेहि, इमेहिं |
| संप्रदान (च./ष.) | इमाए | इमाण, इमाणं |
| अपादान (पं.) | इमाए | इमाहिंतो |
| संबंध (ष.) | इमाए | इमाण, इमाणं |
| अधिकरण (स.) | इमाए | इमासु, इमासुं |

**इम (इदम्) स्त्री. 'ही'**

| | | |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | इय, इमा | इमा, इमाओ, इमी |
| कर्म (द्वि.) | इम | इमा, इमाओ, इमी |
| करण (तृ.) | इमाए, इमीए | इमाहि, इमाहिं, इमीहि |
| संप्रदान (च./ष.) | इमाए, इमीए, इमीसे | इमासिं, इमाणं, इमं |
| अपादान (पं.) | इमाओ, इमीओ | इमाहिन्तो |
| संबंध (ष.) | इमाए, इमीए, इमीसे | इमासिं, इमाणं, इमं |
| अधिकरण (सप्तमी) | इमाए, इमीए, इमीसे | इमासु, इमासुं, इमं |

**अमु (अदस्) पु.**

(**टीप :** 'अमु' या दर्शक सर्वनामाची रूपे प्राकृतात विशेष आढळत नाहीत. 'साहु' या उकारान्त पुल्लिंगी नामाप्रमाणे 'अमु'ची रूपे होतात. तरीही प्रथमा, द्वितीया आणि सप्तमीची रूपे खालीलप्रमाणे होतात.)

| | | |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | अह, अमू, असो | अमुणो, अमू |
| कर्म (द्वि.) | अमुं | अमुणो, अमू |
| अधिकरण (सप्तमी) | अयम्मि, इअम्मि<br>अअम्मि | अमूसु, अमु |

## (२) संबंधदर्शक सर्वनामे

### ज (यद्) जो, जी, जे

### ज (यद्) पुं. (संबंधदर्शक सर्वनामे)

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | जो | जे |
| कर्म (द्वि.) | जं | जे, जा |
| करण (तृ.) | जेण, जेणं | जेहि, जेहिं |
| संप्रदान (च./ष.) | जस्स | जेसिं, जाण, जाणं |
| अपादान (पं.) | जाओ | जेहिन्तो |
| संबंध (ष.) | जस्स | जेसिं, जाण, जाणं |
| अधिकरण (स.) | जंसि, जम्मि | जेसु, जेसुं |

### ज (यद्) स्त्री.

| | | |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | जा | जाओ, जीओ |
| कर्म (द्वि.) | जं | जाओ, जीओ |
| करण (तृ.) | जाए, जीए | जाहि, जाहिं, जीहि |
| संप्रदान (च./ष.) | जाए, जाओ, जीए, जीसे | जासिं, जाण |
| अपादान (पं.) | जाओ, जीओ | जाहिन्तो |
| संबंध (ष.) | जाए, जाओ, जीए, जीसे | जासिं, जाण |
| अधिकरण (स.) | जाए, जीए, जीसे | जासु, जासुं |

## (३) प्रश्नार्थक सर्वनामे

### क (किम्) पुं. (कोण)

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | को, के | के |
| कर्म (द्वि.) | कं | के, का |
| करण (तृ.) | केण, केणं | केहि, केहिं |
| संप्रदान (च./ष.) | कस्स | केसिं, काण, काणं |
| अपादान (पं.) | काओ | केहिन्तो |
| संबंध (ष.) | कस्स | केसिं, काण, काणं |
| अधिकरण (स.) | कंसि, कस्सिं, कम्मि | केसु, केसुं |

### क (किम्) स्त्री. (कोण)

| | | |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | का | काओ, कीओ |
| कर्म (द्वि.) | कं | काओ, कीओ |
| करण (तृ.) | काए | काहि, काहिं |
| संप्रदान (च./ष.) | काए | काण, काणं |
| अपादान (पं.) | काए, काओ | काहिन्तो |
| संबंध (ष.) | काए | काण, काणं |
| अधिकरण (स.) | काए, कीसे | कासु, कासुं |

## (४) प्रथम आणि द्वितीय पुरुषी सर्वनामे

### अहं (अस्मद्) मी, आम्ही

| | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | अहं, हं | अम्हे, वयं |
| कर्म (द्वि.) | मं, ममं, मे | अम्हे, वयं, णे |
| करण (तृ.) | मइ, मए, मे | अम्हेहि, अम्हेहिं |
| संप्रदान (च./ष.) | मम, मे, मह, मज्झ | अम्हाणं, अम्हाण, अम्हाणो |
| अपादान (पं.) | ममाओ, मत्तो | अम्हाओ, अम्हेहिन्तो |
| संबंध (ष.) | मम, मे, मह, मज्झ | अम्हाणं, अम्हाणं, अम्हाणो |
| अधिकरण (स.) | मइ, मए, ममंसि | अम्हेसु, अम्हेसुं |

### तुं, तुमं (त्वम् – यूयम्) तुम्हे, तुज्झे

| | | |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | तुं, तुमं, तुमे | तुब्भे, तुम्हे, तुज्झे |
| कर्म (द्वि.) | तुमं, ते | तुब्भे, तुम्हे, तुज्झे, भे |
| करण (तृ.) | तुए, तुमे, तए, तुमए | तुब्भेहि, तुम्हेहि, तुज्झेहि |
| संप्रदान (च./ष.) | तव, ते, तुह, तुम्ह, तुज्झ | तुम्हाण, णं, तुब्भाण, णं |
| अपादान (पं.) | तुमाओ, तुमंतो | तुब्भेहिन्तो, तुम्हेहिन्तो |
| संबंध (ष.) | तव, ते, तुह, तुम्ह, तुज्झ | तुम्हाण, णं, तुब्भाण, णं |
| अधिकरण (स.) | तुमंसि, तुमस्सि, तइ | तुब्भेसु, तुम्हेसु, तुज्झेसुं |

### (५) तृतीयपुरुषी सर्वनामे

**सो (सः, तद्) तो (पुं.)**

| | ए.व. | अ. व. |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | सो, से, स | ते |
| कर्म (द्वि.) | तं | ते, ता |
| करण (तृ.) | तेण, तेणं | तेहि, तेहिं |
| संप्रदान (च./ष.) | तस्स, से, ते | तेसिं, ताण, ताणं |
| अपादान (पं.) | ताओ | तेहिन्तो |
| संबंध (ष.) | तस्स, से, ते | तेसिं, ताण, ताणं |
| अधिकरण (स.) | तंसि, तम्मि | तेसु, तेसुं |

## ७. संख्या

१) 'एक = एक, एअ, इक्क, एग' या शब्दाचा उपयोग अनेकवचनी केला जातो तेव्हा त्याचा अर्थ थोडेसे, किंचितसे, काही असा होतो. उदा. एके, एए, एकेहि, एकेहिन्तो, एकेसिं, एकेसु.

२) दो, ति, चउ यांची अनेकवचनांची रूपे होतात. शिवाय तिन्ही लिंगांची रूपे समानच असतात.

३) 'पंच'पासून 'दस'पर्यंतची अंकांची तिन्ही लिंगांतील रूपे अनेकवचनातही समान असतात.

४) ११ ते १९ पर्यंत जे संख्यावाचक शब्द तयार होतात. त्यासंबंधीचे नियम :
दो = दु – दुवालस (बारा)
बे = बा – बावीस, बत्तीस, बयालीस, बावन्न, बासट्ठि, बावत्तरि, बासीइ, बेणउइ
ति = ते – तेरस, तेवीस, तेत्तीस

५) चउ = चो होऊन पुढील व्यंजनाचे द्वित्व होते. उदा. चउदस/चोद्दस,चोइस, चोत्तीस, चोयालीस

६) पंच = पण, पण्ण होते.– पण्णरस, पणवीस, पणतीस.

७) 'सत्त'मध्ये कोणताही बदल न होता आहे तसाच राहतो. सत्तरस, सत्ततीस, सत्तयालीस, सत्तहत्तरी, सत्तासीइ

८) अट्ठ = अट्ठा होते. केव्हा केव्हा 'अट्ठ' आहे तसेच राहते. अट्ठारस, अट्ठावीस, अट्ठतीस, अट्ठचत्तालीस, अट्ठसट्ठि, अट्ठासीइ

९) 'णव'मध्ये बदल न होता आहे तसेच राहते. णवणउइ इ.

१०) ११ ते १८ याची रूपे तिन्ही लिंगांत सारखीच होतात. तसेच त्यांची रूपे अनेकवचनी असतात.

११) १९ ते ४८ यांची रूपे एकवचनात असतात, प्रथमा व द्वितीया विभक्ती 'वण'प्रमाणे आणि बाकीच्या विभक्तीत आकारान्त किंवा इकारान्त स्त्रीलिंगी नामाप्रमाणे चालतात.

१२) पहिला दुसरा या अर्थाची विशेषणे १ ते ६ पर्यंत खालीलप्रमाणे होतात. ही सर्व विशेषणे अकारान्त विशेषणाप्रमाणे चालतात.

| | |
|---|---|
| पहिला = पढम, पढमो | पाचवा = पंचम, पंचमो |
| दुसरा = बीय, बिइय, दोच्च | सहावा = छट्ठ, छट्ठं |
| तिसरा = तइय, तच्च | चारांचा समूह = चउक्क |
| चवथा = चउत्थ | सहांचा समूह = छक |

१३) ६च्या पुढील संख्यावाचक शब्दांना 'म, इम व अम' लावून विशेषणे तयार होतात.

| | |
|---|---|
| सातवा = सत्तम | आठवा, नववा, दहावा = अट्ठम, नवम, दसम |
| अकरावा = एआरसम/एकारसम/इक्कारसम | २० वा = वीसइम |
| ८० वा = असीइम/असीअम | १०० वा = सयअम |
| १००० वा = सहस्सअम | |

वरील विशेषणांची स्त्रीलिंगी रूपे त्यांना 'ई' लावून होतात. उदा. सत्तमी, तेरसमी, बीसइमी.

१४) संख्यावाचक शब्दांपासून 'खुत्तो, हा, सो' हे प्रत्यय लावून अव्यये बनतात. उदा. –

| | |
|---|---|
| दोनदा = दुक्खुत्तो | तीन वेळा = तिखुत्ता/तिक्खुत्तो |
| चार वेळा = चउहा | सात वेळा = सत्तक्खुत्तो |
| शंभर वेळा = सयसो | हजार वेळा (प्रकारे) = सहस्ससो |

१५) पहिल्यावेळी, दुसऱ्यावेळी अशा प्रकारची अव्यये, नपुंसकलिंगी एकवचनात अनुस्वार देऊन होतात.
उदा. पढम = पढमं, बीय = बीयं, बिइयं. तसेच, तइयं, चउत्थं, पंचमं, दसमं इत्यादी

१६) 'एअ, एक, इक्क' हे शब्द फक्त एकवचनात आढळतात. ते पुढीलप्रमाणे –

| | पुल्लिंग | स्त्रीलिंग | | नपुंसकलिंग |
|---|---|---|---|---|
| प्रथमा | एओ/एको/इक्को/एगो | एआ/एका/एगा | | एअं/एकं/इक्कं/एगं |
| द्वितीया | एकं | एए | एकं | एकं |
| तृतीया | एकेण | एकेहि | एकाए | एकेण |
| पंचमी | एकाओ | एकेहिन्तो | एकाओ | एकाओ |
| चतुर्थी/षष्ठी | एअस्स/एकस्स एकेसि | एआए/एकाए | एअस्स/एकस्स | एआण, एकाणं |
| सप्तमी | एकम्मि | एकंसि, एकेसु | एआए/एकाए | एअम्मि, एकम्मि/ एकंसि |

**दो, ति, चउ (तिन्ही लिंगांमध्ये)**

| | दो | ति | चउ |
|---|---|---|---|
| प्रथमा | दो, दुवे, दोण्णि | तओ, तिण्णि | चत्तारो, चउरो, चत्तारि |
| द्वितीया | दो, दुवे, दोण्णि | तओ, तिण्णि | चत्तारो, चउरो, चत्तारि |
| तृतीया | दोहिं | तीहिं | चउहिं |
| चतुर्थी | दोण्हं | तिण्हं | चउण्हं |

| | | | |
|---|---|---|---|
| पंचमी | दोहिन्तो | तीहिन्तो | चउहिन्तो |
| षष्ठी | दोण्हं | तिण्हं | चउण्हं |
| सप्तमी | दोसु | तीसु | चउसु, चउसुं |

(**टीप –** 'दो, ति, चउ' ही संख्याविशेषणे फक्त अनेकवचनात चालतात)

### पंच (पाच) हे तिन्ही लिंगांमध्ये सारखेच चालते

| | |
|---|---|
| प्रथमा | पंच |
| द्वितीया | पंच |
| तृतीया | पंचहिं |
| चतुर्थी | पंचण्हं |
| पंचमी | पंचहिंतो |
| षष्ठी | पंचण्हं |
| सप्तमी | पंचसु |

१) सर्व अकारान्त संख्याशब्द 'पंच'प्रमाणे म्हणजेच अकारान्त पुल्लिंगी 'गणेस' या नामाप्रमाणे चालतात.

२) आकारान्त संख्याशब्द आकारान्त स्त्रीलिंगी 'माला' या नामाप्रमाणे चालतात.

### संख्यावाचक शब्द

| | अंक | क्रमवाचक विशेषणे |
|---|---|---|
| १ | एअ/एक/इक्क/एग | पढम, पढमो |
| २ | दो/दु/बे/बीअ | दोच्च, बीय, बिइय |
| ३ | ति/ते | तइय, तच्च, तिण्हं |
| ४ | चउ/चा/चो | चउत्थ, चउण्हं/चाउर/चोद्दस |
| ५ | पंच/पण्ण/पण | पंचम, पंचमी/पण्णरस |
| ६ | छ/छल | छट्ठ |
| ७ | सत्त | सत्तम, सत्तमी |
| ८ | अट्ठ/अट्ठा | अट्ठम, अट्ठमी |
| ९ | णव/णवण | णवम, णवमी |
| १० | दस/दह | दसम, दसमी |
| ११ | एआरस/एयारह/इक्कारस | एआरसम |
| १२ | दुवालस/बारस | बारसम |
| १३ | तेरस | तेरसम |
| १४ | चउदस/चोद्दस | चउरसम |
| १५ | पंचरह, पन्नरस/पण्णरस | पंचरसम |

| | | |
|---|---|---|
| १६ | सोलस | छोलसम |
| १७ | सत्तरस | सत्तरसम |
| १८ | अट्ठारस | अट्ठरसम |
| १९ | एकूणवीस/एऊणवीस | एकूणरसम |
| २० | वीस | वीसइम |
| २१ | एगवीस/एक्कवीस | |
| २२ | बाईस/बावीस | |
| २३ | तेईस/तेवीस | |
| २४ | चउवीस | |
| २५ | पणवीस | |
| २६ | छव्वीस | |
| २७ | सत्तावीस | |
| २८ | अट्ठावीस | |
| २९ | अउणतीस | |
| ३० | तीस | |
| ४० | चालीस/चत्तालीस | |
| ५० | पण्णास/पन्नास | |

# परिशिष्ट - ३

## लेखन कौशल्य

### (१) वाक्यरचना

१) अहं पोत्थअं पढामि।

२) छत्तो अज्झअणं करेइ।

३) सेवओ सामिं सेवइ।

४) सव्वे जणा सुहं इच्छंति ण दुक्खं।

५) अम्हे सच्चं वआमो।

६) जणणी सोहणं कहाणअं कहेइ।

७) अम्हे कण्णेहिं गीअं सुणामो।

८) बालो मोरस्स चित्तं पासइ।

९) अम्हे लड्डुं भक्खामो।

१०) णासिआ गंधस्स गहणं करेइ।

११) जीहा रसं आसाएइ।

१२) साहु तवं करेइ। जणाणं धम्मं उवएसइ।

१३) सव्वाणं मंगलं च इच्छइ।

१४) मुणी आभरणाइं चयइ।

१५) सीहो तिणं न भक्खइ।

१६) मेहा जलं वरिसंति।

१७) अग्गी वणं डहइ।

१८) णिवो गामं रक्खइ।

१९) सूरिओ सव्वत्थ पआसं पसारेइ।

२०) चंद-किरणा सअयं अमअं वरिसंति।

### (२) विभक्तींचे उपयोग

**प्रथमा विभक्ती -**




१) सो पोत्थगं पढेइ।

२) सा मालं गुंफेइ।

३) अहं गीयं गायामि।

४) अम्हे णच्चामो।

५) तुमं जलं पिवसि।

६) तुम्हे पासायं पविसह।

७) सव्वे अंबरसं खायंति।

८) णई पव्वआओ वहइ।

९) बालओ खीरं भक्खइ।

## द्‌वितीया विभक्ती –




१) अम्हे आवणं गच्छामो।
२) सो गामं पासइ।
३) अहं सामिं सेवेमि।
४) तुमं जलं पिबसि।
५) तुम्हे चित्तं लिखह।
६) सा मोयअं खायइ।
७) सव्वे पासायं सच्छं करेंति।
८) अम्हे गीयं गायामो।
९) घरिणी दहिं महइ।

## तृतीया विभक्ती –




१) अहं णेत्तेहिं पासामि।
२) अम्हे कण्णेहिं सुणेमो।
३) तुमं हत्थेण भुंजह।
४) रामेण सह सीया वणं गया।
५) अलं रोयणेण।
६) अंधस्स दप्पणेण किं?
७) पुत्तेण विणा सुहं ण लहइ।
८) रामेण बाणेण हओ वाली।
९) अहं पएहिं चलामि।

## पंचमी विभक्ती –




१) विरम राअदोसेहिंतो।
२) विज्जा रज्जाओ वरं।
३) कामा/कामाओ कोही संजाअइ।
४) णरस्स मरणाओ भअं अत्थि।
५) आमूलाओ कहं सोउं इच्छामि।
६) रुक्खेहिंतो फलाइं पडंति।
७) दक्खाफलाओ अंबफलं अहिअं महुरं।
८) वणेहिंतो जणाणं बहुलाहो हवइ।
९) कण्हो महुराओ बारआउरिं गच्छइ।

## षष्ठी विभक्ती –




१) रुक्खस्स उवरि किं अत्थि?

२) पाअवस्स हेट्ठा बालओ चिट्ठइ।

३) णिवस्स कए सेणावई पाणे चअइ।

४) पाअवस्स समीवं/समीवे वावी अत्थि।

५) जणयस्स पच्छा पुत्तो गच्छइ।

६) सा पाड्अभासाए अज्झाविआ।

७) रामस्स जणणी कोसल्ला।

८) घरस्स पुरओ कूवो अत्थि।

९) चंदस्स कोमुई सीयला।

– णमो, सत्थि, धी अशा अर्थाच्या अव्ययांना व रुअ, कुह, कुव, कह, पुह (स्पृह) या सारख्या धातूंना चतुर्थी विभक्तीची अपेक्षा असते. पण प्राकृत भाषेमध्ये चतुर्थीसाठी षष्ठी विभक्तीच वापरली जाते.

## सप्तमी विभक्ती –




१) गिहे साहारण–जणा वसंति।

२) सीसा गुरुउले वसंति।

३) तिलेसु तेल्लं विज्जइ।

४) रण्णे सीहा गज्जंति।

५) सत्तमंसि वरिसंसि अहं पुणो वि आगच्छामि।

६) कईसु कालिदासो सेट्ठो।

७) णईए णावाओ चलंति।

८) अहं घरे/घरम्मि/घरंसि पविसामि।

९) वणे सीहो चिट्ठइ।

## (३) संभाषण कौशल्य

### संवाद

नीला – तुह किं नाम अत्थि?

विमला – मज्झ/मम नामं विमला अत्थि।

नीला – तुज्झ जणअस्स किं नामं?

विमला – मम जणअस्स णामं अरविंदो अत्थि।

नीला – तुज्झ जणओ किं करेइ?

विमला – सो ववसाअं करेइ।

नीला – तुज्झ मायाए नामं किं अत्थि?

विमला – मम मायाए नामं कमला अत्थि।

नीला – सा किं करेइ?

विमला – सा गिहकज्जं करेइ।

नीला – तुज्झ कुडुंबे केत्तिय जणा संति।

विमला – मज्झ कुडुंबे छ जणा संति।
अहं एगा, मम भाऊ मिलिंदो विइओ,
माया, पिया, पियामहो, पियामही य मिलिऊण छ कुडुंबिअ-जणा एव संति।

नीला – विमले! तुमं अहुणा किं करेसि?

विमला – अहं विज्जालअम्मि अज्झअणं करेमि।

नीला – अज्झअणणंतरं तुमं किं काहिसी?

विमला – तआणंतरं अहं मम जणअस्स साहेज्जं काउं इच्छामि।

# परिशिष्ट - ४

## निबंध लेखन, रेखाजाल

### (१) मम परिचओ

अहं मेहा।
अहं पाइअं पढामि।

सो सुणीलो।
सो मम भाऊ।
अम्हे पढणं पाढणं करेमो।

सो मम पिया दिणयरो। सो अज्झावओ अत्थि।
सा मम माआ सविआ।
सा गिहिणी अत्थि।

एसो मम पिआमहो।
तस्स णाम पहाअरो।
सो पभाए खेत्तं गच्छइ किसिकम्मं च करेइ।

सा विमला।
सा मम अज्झाविआ अत्थि।
तीए समीवे अहं पाइअ-भासा सिक्खामि।

अहं सिरिकण्हस्स भत्तं अम्हि।
मम हिअए गुरुजणाणं कए आअरो अत्थि।
मज्झ देसे मम अहिमाणो गारवो अ अत्थि।

### (२) गणेसूसवो

महरट्ठदेसे गणेसो देवस्स बहु महत्तणं अत्थि। गणेसूसवो भद्दवए मासे सुक्कपक्खे चउत्थीए आरंभिऊण चोद्दसीए समत्तेइ । लोकमान्य टिळक महोदएण गणेसूसवो पुणे नअरीए आंरभिओ। पत्तेए गामे, णअरे, घरे, तिक्क-चउक्के इच्चाइ ठाणे गणवइस्स पडिमा संठाविज्जंति । एयाओ पडिमाओ विविहाणि आआरेसुं वट्टेंति। सव्वे कुडुंबिया जणा अ मिलिऊण गणेसस्स आरइं गायंति। पभाए संझाए अवि पूआ करेंति। गणेसस्स सरूवो सुहकरिणो दुहहरिणो एव अत्थि। एएण पआरेण एसो उस्सवो दहदिणपज्जंतं उस्साहेण परिपुज्जंति। मरहट्ठे गणेसूसवो अच्चंतो लोअप्पिओ हवइ ।

### (३) पाइअभासा

पाइआ भासा सामण्णजणाणं ववहारभासा अत्थि। सव्वे जणा पाइअ-भासाए एव बोल्लंति। पाइअभासा इइ ण एआ भासा परं तु अणेअ-भासाणं समूहो त्थि। महरट्ठे पएसे जा पाइअभासाए ववहरणमत्थि सा मरहट्ठी/महरट्ठी पाइअ त्ति। इयम्मि भासाए अणेअविहाइं साहिच्च-प्पआराइं संति । गाहासत्तसई त्ति मरहट्ठदेसस्स पढमं पाइअकव्वं अत्थि। पाइयभासाए

पमुहेण जइणधम्मिआणं धम्मगंथा संति । ते अद्धमागही, सोरसेणीए संति । मरहट्ठी पदेसे जो पसिद्धो जाणेस्सरी गंथो अत्थि, सो पि मरहट्ठी पाइए एव णिबद्धो अत्थि । मरहट्ठी पाइअभासाए अणेआ गंथा जइणमुणिणा रइआ संति । पाईणाहिंतो पाइअ-भासाहिंतो बंगाली, उडिया, आसामी इच्चाइआओ आहुणिआओ भासाओ उप्पण्णा । तम्हा पाइअभासाए सज्झाओ भासा-सरूव-जाणणत्थं अच्चंतो आवस्सओ अत्थि। जअउ पाअड-भासाए।

### (४) वत्तपत्तं

वत्तपत्तं णाम अम्हाणं परमं मित्तं एव । पभाए एयस्स दंसणेण विणा माणवो कसायपाणं काउमवि णेच्छइ। वत्तपत्ते देस-विएसेसु वा जं जं पइदिणं घडइ तस्स वत्ता अच्छइ । पअत्तेण विणा गिहे चिट्ठित्तेण एव अम्हाणं कए सव्वं णाणं सुलहइ । सच्चण्णेसणं, सच्चदंसणं, सम्मं भावेण कहणं एयं सव्वं वट्टपत्तस्स धम्मिआयरणं । वत्तमाणकाले दूरदंसणस्स मज्झमाणं सुकालं अत्थि तहवि वट्टपत्तं विणा पाढआणं समाहाणं ण हवइ इइ वट्टपत्तस्स महई । दूरदंसणं दंसिऊण अक्खिणा कए कदाचण आरुग्गहाणिं आयासवाणीए झुणिपऊसणं अवि संभाविज्जइ। परं वट्टपत्तमज्झमे ण एयसमा दोसा तहावि उ परुप्परेण सह संलावं वि ण हवइ इयं अणुहवं। परोप्परेण अओ वट्टपत्तं सच्चमेव भुवणमित्तं एव।

### रेखाजाल




वरील रेखाजालाच्या आधारे १० ते १२ अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.
टीप - भारहे, संति, अत्थि, हवित्था इत्यादी शब्दांचा उपयोग आवश्यकतेप्रमाणे करावा.
































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५





**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

महाराष्ट्री प्राकृत इयत्ता अकरावी

**किंमत:- ₹ 99.00**